CMYK

आजचा सामना
चेन्नई सुपरकिंग्ज वि. दिल्ली कॅपिटल्स
वेळ : दुपारी ३.३० वाजता
ठिकाण : चिदंबरम स्टेडियम, चेन्नई

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

आजचा सामना
पंजाब किंग्ज वि. राजस्थान रॉयल्स्
वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : चंदीगड

सोलापूर | शनिवार, ५ एप्रिल २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १४७ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



निसर्ग व्यक्ती आणि निसर्गाचा जो संबंध आहे, तोच संपूर्ण समाज आणि निसर्गाचाही आहे. समाजाला सर्व संसाधने निसर्गाकडून प्राप्त होतात. नैसर्गिक संसाधने अमर्यादित नाहीत. पाश्चिमात्यांच्या प्रभावाखाली येऊन आमचा असा समज झाला की, नैसर्गिक संसाधने अमर्यादित आहेत. त्याचा आपण अनेक प्रकारे उपभोग घेऊ शकतो. परंतु आता लोकांना हे स्पष्टपणे लक्षात येत आहे की, नैसर्गिक संसाधने अमर्याद नाहीत - ती मर्यादित आहेत. म्हणून आपल्याला जेवढ्याची गरज आहे, तेवढेच आपण निसर्गाकडून घेतले पाहिजे.

**- राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पाचवे सरसंघचालक कुप्पू. सी. सुदर्शनजी**

# हिंदूंवरील अत्याचाराची चौकशी करा

### पंतप्रधान मोदींनी बांगलादेशला सुनावले | अल्पसंख्यकांची सुरक्षा निश्चित करा | नरेंद्र मोदी-मोहम्मद युनूस यांच्यात बैठक

◆ **बँकॉक, ४ एप्रिल**

अल्पसंख्यक हिंदू आणि ख्रिश्चन समुदायांच्या नागरिकांवर होणारे हल्ले चिंतेचा विषय आहे. बांगलादेश सरकारने या नागरिकांवर होणाऱ्या अत्याचाराची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी आणि अल्पसंख्याक समुदायाच्या सुरक्षेसाठी उपाययोजना कराव्यात, अशा शब्दात आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांना खडे बोल सुनावले. बिमस्टेक शिखर परिषदेसाठी आलेले मोहम्मद युनूस यांनी शुक्रवारी पंतप्रधान मोदींची भेट घेऊन चर्चा केली.

मोदी आणि युनूस यांच्या भेटीसंदर्भात माहिती देताना परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी प्रसार माध्यमांना सांगितले की, बिमस्टेक शिखर परिषदेपूर्वी पंतप्रधान मोदी आणि बांगलादेशचे अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांची शुक्रवारी भेट झाली. यावेळी दोन्ही नेत्यांच्या झालेल्या बैठकीत मोदींनी अल्पसंख्यकांवर होणाऱ्या अत्याचाराचा मुद्दा उपस्थित करताना म्हटले की, बांगलादेशात अल्पसंख्यकांवर होणारे हल्ले चिंतेचा विषय आहे, त्यांच्या सुरक्षेची काळजी सरकारने घ्यायला हवी. बांगलादेश



बिमस्टेक शिखर परिषदेच्या दरम्यान बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांनी शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली.

सरकार हल्ल्यांच्या प्रकरणाची सखोल चौकशी करून त्यांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करेल, अशी अपेक्षा व्यक्त करतो. लोकशाही, स्थिरता, शांतता, विकास आणि सर्वसमावेशतेच्या मुद्यावर भारताचा बांगलादेशला कायम पाठिंबा राहणार असल्याचे मोदी यांनी सांगितले. दोन्ही देशांच्या दीर्घकाळातील सहकार्यावर प्रकाश टाकताना मोदी यांनी सांगितले की, दोन्ही देशाचे संबंध अनेक दशकापूर्वीचे असून याचा फायदा दोन्ही देशातील नागरिकांना झाला आहे. ◂(वृत्तसंस्था)

### घुसखोरीवर आक्षेप

बैठकीदरम्यान पंतप्रधानांनी सीमा सुरक्षा आणि आंतरराष्ट्रीय नियम व कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्याची अपेक्षा व्यक्त केली. भारतीय सीमेत बेकायदेशीर प्रवेश करणाऱ्यांवर अंकुश लावण्याचा मुद्यादेखील उपस्थित करण्यात आला. दोन्ही देशात दुरावा निर्माण होणार नाही, अशी टिप्पणी टाळण्याचे आवाहन यावेळी मोदी यांनी केले. ४० मिनिटापर्यंत झालेल्या बैठकीदरम्यान भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांची उपस्थिती होती. ■

### भारतविरोधी भूमिका कायम

बांगलादेशातील सत्तापालटानंतर युनूस यांच्याकडे अधिकार आल्यानंतर दोन्ही देशांत कटुता कायम आहे. युनूस यांच्या कार्यकाळात बांगलादेशात हिंदूंवर हल्ले वाढले, तसेच त्यांनी भारतविरोधी निर्णय घेतले. अलिकडेच युनूस यांनी चिकन नेकवर प्रश्न उपस्थित केला. ज्यावर भारताने तीव्र आक्षेप घेतला. भारताचा विरोध पाहून बांगलादेश सरकारने स्पष्टीकरण देत युनूस यांच्या विधानाचा विपर्यास करण्यात आल्याचे सांगितले. ■

# बिमस्टेक देशांसोबत युपीआय व्यवहाराचा प्रस्ताव

### २१ कलमी कृती कार्यक्रम

### व्यापार, पर्यटन वाढीसाठी मोदींनी दिला मंत्र

◆ **बँकॉक, ४ एप्रिल**

बिमस्टेक संघटनेच्या देशांसोबत युपीआयच्या माध्यमातून आर्थिक देवाणघेवाण करण्याचा प्रस्ताव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडला आहे. यामुळे देशांमधील व्यापार वाढून पर्यटन क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विकास होईल, अशी आशा मोदी यांनी व्यक्त केली. तसेच बंगाल खाडी क्षेत्रातील देशांमधील संबंध आणखी वाढण्यासाठी पंतप्रधानांनी २१ कलमी कृती कार्यक्रमाचा प्रस्तावही ठेवला आहे.

थायलंडमध्ये बिमस्टेक शिखर परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. भारत, बांगलादेश, नेपाळ, म्यानमार, श्रीलंका आणि भुतान हे देश या संघटनेचे सदस्य आहेत. या संघटनेच्या सहाव्या परिषदेला मोदी संबोधित करीत होते. बंगाल खाडी क्षेत्रातील देशांमध्ये स्थानिक चलनातून व्यापार वाढावा, यासाठी बिमस्टेक चेंबर ऑफ कॉमर्सची स्थापना करून दरवर्षी बैठक घेण्याचा प्रस्तावही पंतप्रधानांनी ठेवला आहे. २८ मार्चला म्यानमार आणि थायलंडमध्ये आलेल्या भूकंपात बळी गेलेल्या नागरिकांना मोदींनी श्रद्धांजली अर्पण केली. बंगाल खाडी क्षेत्रात क्षेत्रीय दळणवळण, सुरक्षा आणि संपन्नता यावी यासाठी परिषदेने बँकॉक व्हिजन-२०३० स्वीकारला आहे. ◂(वृत्तसंस्था)

### २१ कलमी कार्यक्रमातील महत्त्वाचे मुद्दे

- बिमस्टेक देशांमध्ये युपीआयममार्फत व्यवहार
- बोधी अथवा बिमस्टेक अंतर्गत दरवर्षी ३०० युवकांना भारतात प्रशिक्षण
- डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर संदर्भात माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी पायलट स्टडी कार्यक्रमाचे आयोजन
- आपतकालीन व्यवस्थापन क्षेत्रात एकत्रपणे काम करण्यासाठी बिमस्टेक सेंटर ऑफ एक्सेलेन्स स्थापन करणे
- दरवर्षी व्यापार परिषदेचे आयोजन ■

## महत्त्वाचे

### शेअर बाजारात मोठी पडझड

**मुंबई :** ट्रम्प टॅरिफचे हादरे अजूनही जगभरात जाणवत असताना देशांतर्गत शेअर बाजारावरही याचा परिणाम दिसून आला. ट्रम्प यांची टॅरिफबाबतची भूमिका जगासमोर येताच मंदीच्या विचाराने गुंतवणूकदार धास्तावले आणि बाजारात



विक्रीचा जोर वाढला. मुंबई बाजारातील निर्देशांक दिवसअखेर ९३० अंकांनी खाली येत ७५,३६५ वर बंद झाला. निफ्टीतही १.४९ टक्क्याची मोठी घसरण होऊन तो २२,९०४ वर बंद झाला. या सततच्या घसरणीमुळे बाजार भांडवल १० लाख कोटींनी कमी झाले. अमेरिकी शेअर बाजारातील घसरण जगाच्या अपेक्षेपेक्षा जास्त होती, याचाही देशांतर्गत बाजारावर परिणाम झाला. आतापर्यंत टॅरिफच्या कक्षेबाहेर असणाऱ्या फार्मा क्षेत्रावरही शुल्क लागू होण्याची भीती गुंतवणूकदारांमध्ये दिसून आली. ■

# 'वक्फ'ला काँग्रेस आव्हान देणार!

**नवी दिल्ली, ४ एप्रिल**

वक्फ दुरुस्ती विधेयकाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याची तयारी सुरू झाली आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांच्यानंतर आता काँग्रेसने शुक्रवारी म्हटले आहे की, ते संसदेत मंजूर झालेल्या वक्फ (दुरुस्ती) विधेयक, २०२४ च्या घटनात्मकतेला लवकरच सर्वोच्च न्यायालयात आव्हान देतील. शुक्रवारी सकाळी संसदेने या विधेयकाला मंजुरी दिली.

प्रथम ते लोकसभेने आणि नंतर राज्यसभेने मंजूर केले. यापूर्वी स्टॅलिन यांनी वक्फ विधेयकाबाबत न्यायालयात जाण्याची घोषणा केली होती. तामिळनाडूचे मुख्यमंत्री आणि द्रमुकचे अध्यक्ष एम.के. स्टॅलिन यांनी गुरुवारी सांगितले होते की, त्यांचा पक्ष या विधेयकाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करेल. लोकसभेत विधेयक मंजूर झाल्याच्या निषेधार्थ स्टॅलिन काळी पट्टी घालून विधानसभेत पोहोचले. यावेळी त्यांनी म्हटले होते की, भारतातील म ोठ्या संख्येने पक्षांच्या विरोधाला न जुमानता





काही मित्रपक्षांच्या आदेशानुसार रात्री २ वाजता घटनादुरुस्ती स्वीकारणे हा संविधानाच्या रचनेवर हल्ला आहे. वक्फ विधेयकाविरोधात ओवैसी सर्वोच्च न्यायालयात वक्फ विधेयक लोकसभेनंतर आता राज्यसभेतही पास झाले आहे. तर दुसरीकडे या विधेयकाला काँग्रेस खासदार मोहम्मद जावेद यांनी शुक्रवारी आव्हान देत सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. विधेयक घटनात्मक तरतुदींचे उल्लंघन करत असल्याचा दावा केला. दरम्यान, एआयएम आयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनीही या विधेयकाविरुद्ध याचिका दाखल केली आह

# चीन, कॅनडाचा अमेरिकेवर पलटवार

◆ **बीजिंग, ४ एप्रिल**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २ एप्रिल रोजी जगातील ६० देशांवर परस्पर शुल्काची घोषणा केल्यानंतर शुक्रवारी चीनने अमेरिकन वस्तूंवर ३४ टक्के अतिरिक्त शुल्क तर कॅनडाने अमेरिकन उत्पादित वाहनांवर २५ टक्के व्यापार शुल्क लावण्याची घोषणा केली. परस्पर शुल्कामुळे महागाईसह जागतिक व्यापार युद्धाचा भडका उडाल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. अमेरिकेने चीनवर एकूण ५४ टक्के तर कॅनडावर ५० टक्के शुल्क लादले असून प्रत्युत्तरात दोन्ही देशांनी अमेरिकेवर व्यापार शुल्क लादण्याची घोषणा केली.

चीनच्या अर्थ मंत्रालयाने शुक्रवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, १० एप्रिलपासून



अमेरिकेतून आयात होणाऱ्या सर्व वस्तूंवर ३४ टक्के अतिरिक्त शुल्क आकारले जाणार आहे. अमेरिकन सरकारने देशात आयात होणाऱ्या सर्व चिनी वस्तूंवर परस्पर शुल्क लागू केले. अमेरिकेचे हे पाऊल आंतरराष्ट्रीय व्यापार नियमांच्या विरोधात आणि चीनच्या कायदेशीर अधिकारांना हानी पोहोचवणारे आहे. अमेरिकेचे कृत्य दोन्ही देशांच्या हितांना बाधा निर्माण करणारे आहे. यामुळे जागतिक आर्थिक वाढ, उत्पादन स्थिरता आणि पुरवठा साखळी धोक्यात येईल. दरम्यान ट्रम्प यांनी याआधीच अमेरिकेत आयात होणाऱ्या चिनी वस्तूंवर २० टक्के शुल्क लावले होते. २ एप्रिल रोजी त्यांनी पुन्हा चीनवर ३४ टक्के परस्पर शुल्क लादल्याने चिनी वस्तूंवरील अमेरिकेचे शुल्क ५४ टक्क्यापर्यंत वाढले आहे. ◂(वृत्तसंस्था)

### भारताला दिलासा

अमेरिकेत भारताकडून आयात करण्यात येणाऱ्या वस्तूंवर २७ टक्के व्यापार शुल्क लावण्यात आल्याची माहिती समोर आली होती. मात्र व्हाईट हाऊसच्या प्रवक्त्याने शुक्रवारी यासंदर्भात माहिती देत सांगितले की, भारतावर २७ नव्हे तर २६ टक्केच आयात शुल्क लावले जाणार आहे. निश्चित केलेल्या शुल्कात एक टक्क्याने कपात करण्यात आली. त्यामुळे इतर देशांच्या तुलनेत भारताला निर्यात क्षेत्रात दिलासा मिळाला आहे. ■

### व्यापारयुद्धाचा भडका, आयातकराविरोधात जशास तसे प्रत्युत्तर

**५४ टक्के** व्यापार शुल्क **अमेरिकेने** चिनी वस्तूंवर लादले

**३४ टक्के** व्यापार शुल्क प्रत्युत्तरात **चीनने** अमेरिकेवर लावले

**५० टक्के** व्यापार शुल्क **अमेरिकेने** कॅनडावर लादले

**२५ टक्के** व्यापार शुल्क प्रत्युत्तरात **कॅनडाने** अमेरिकन वाहनांवर लावले

### बेकायदेशीर सावकारी प्रकरणी अमली पदार्थ सूत्रधाराला अटक

**नवी दिल्ली :** बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्यांतर्गत आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ सिंडिकेटच्या पंजाबमधील सूत्रधाराला अटक करण्यात आली आहे, असे अंमलबजावणी संचालनालय अर्थात ईडीने शुक्रवारी सांगितले. अक्षय छाब्राला २ एप्रिल रोजी जालंधर येथून बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्यांतर्गत ताब्यात घेण्यात आले. तो सध्या ईडीच्या ताब्यात आहे. ईडीने गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये छाब्राच्या ठिकाणांवर छापे टाकले होते. छाब्रा हा पंजाबमधील लुधियाना येथून चालवल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय ड्रग्ज सिंडिकेटचा सूत्रधार होता. तो शेल/बनावट संस्थांच्या नावाखाली अफगाणिस्तानमधून ड्रग्ज आयात करण्यात आणि त्यांना पुढे पुरवण्यात यशस्वी झाला. ■



### लखनऊने मुंबईला १२ धावांनी हरवले

**लखनऊ :** आयपीएलच्या सोळाव्या सामन्यात लखनऊ सुपरजायंट्सने मुंबई इंडियन्सचा १२ धावांनी पराभव केला. एकाना स्टेडियमवर मुंबईने गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. लखनऊने निर्धारित २० षटकांत ८ बाद २०३ धावा केल्या. लखनऊकडून मिचेल मार्शने ६० आणि एडेन मार्करमने ५३ धावा केल्या. मुंबईकडून हार्दिक पांड्याने ५ बळी टिपले. प्रत्युत्तरात मुंबई संघाला फक्त १९१ धावा करता आल्या. मुंबईचा कर्णधार हार्दिक पंड्या शेवटच्या षटकात २२ धावा काढू शकला नाही. तो २८ धावांवर नाबाद राहिला. सूर्यकुमार यादवने ६७ आणि नमन धीरने ४६ धावा केल्या. लखनौकडून शार्दूल ठाकूर, आकाशदीप, आवेश खान व दिग्वेश सिंग यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला.

# संसद अधिवेशन संस्थगित

◆ **नवी दिल्ली, ४ एप्रिल**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे आज सुप वाजले. अर्थसंकल्पीय अधिवेशन दोन टप्प्यांत होत असते. पहिल्या टप्प्यात ३१ जानेवारीला सुरू झालेले अधिवेशन १० फेब्रुवारीपर्यंत चालले. त्यानंतर जवळपास महिनाभराची सुटी होती. अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्याला १० मार्चला प्रारंभ झाला, ४ एप्रिलला या अधिवेशनाची सांगता झाली.

१८ व्या लोकसभेच्या चौथ्या सत्रात सभागृहाच्या २६ बैठका झाल्या. कामकाजाची उत्पादकता ११८ टक्के राहिली, असे बिर्ला म्हणाले.

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावरील चर्चेत १७३ सदस्य सहभागी झाले होते. केंद्रीय अर्थसंकल्पावरील चर्चेत १६९ सदस्यांनी भाग घेतला. वक्फ दुरुस्ती विधेयकासह १६ विधेयक या अधिवेशनात पारित करण्यात आली, तर १० विधेयके पुनर्स्थापित करण्यात आली, असे बिर्ला म्हणाले. ३ एप्रिलला शून्य तासात २०२ सदस्यांना बोलण्याची संधी मिळाली. आतापर्यंतच्या शून्य तासातील कामकाजाचा हा विक्रम होता, असे बिर्ला म्हणाले.

**राज्यसभाही संस्थगित**

राज्यसभेचे कामकाजही आज अनिश्चितकाळासाठी स्थगित करण्यात आले. राज्यसभेच्या कामकाजाची उत्पादकता ११९ टक्के होती, असे अध्यक्ष जगदीप धनकड यांनी म्हटले. या अधिवेशनात ३ एप्रिलला राज्यसभेत विक्रमी कामकाज झाले. सकाळी ११ वाजता कामकाजाला सुरुवात झाली आणि दुसऱ्या दिवशी पहाटे ४ पर्यंत कामकाज चालले, वक्फ दुरुस्ती विधेयकावर प्रदीर्घ काळ चर्चा झाली, असे धनकड यांनी स्पष्ट केले. ◂(तभा वृत्तसेवा)

# नेपाळमध्ये भूकंपाचा धक्का! उत्तर भारतातही हादरे

**नेपाळ, ४ एप्रिल**

नेपाळमध्ये काल संध्याकाळी ७:५२ मिनिटांनी भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. भूकंपाची तीव्रता ५.0 रिश्टर स्केल इतकी होती. याबाबतची माहिती एएनआय या वृत्तसंस्थेनं दिली आहे. सध्या या भूकंपामुळं कोणतीही जीवितहानी झाली नाही.

दरम्यान, उत्तर भारतातही या भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले आहेत. नॅशनल सिस्मॉलॉजिकल सेंटरनुसार, भूकंप २0 किमी खोलीवर झाला आहे. उत्तराखंडमधील पिथौरागढ हे भूकंपाचे केंद्र होते.

नेपाळ हा जगातील सर्वात सक्रिय भूकंपप्रवण प्रदेशांपैकी एक आहे, जेथे भूकंपाचा धोका कायम आहे. शुक्रवारी (२८ मार्च २०२५) म्यानमार आणि थायलंडची राजधानी बँकॉकमध्ये शक्तिशाली भूकंपामुळे मोठा विध्वंस झाला. त्या दिवशी सकाळी नेपाळमध्ये ६.१ रिश्टर स्केलचा भूकंप झाला, ज्याचे धक्के बिहार, सिलीगुडी आणि भारताच्या इतर शेजारच्या भागात जाणवले.

**म्यानमारमध्ये प्रचंड हाहाकार**

म्यानमारमध्ये भूकंप होण्यापूर्वी, त्याच दिवशी, भारत आणि तिबेटच्या सीमावर्ती भागातील रहिवाशांनीही भूकंपाचे धक्के जाणवल्याचे सांगितले. भूकंपामुळे थायलंडची राजधानी बँकॉकमध्ये निर्माणाधीन एक बहुमजली इमारत कोसळली, तर म्यानमारमधील लाखो लोक बेघर झाले. भारत सरकारने म्यानमारमधील भूकंपामुळे प्रभावित झालेल्या लोकांच्या मदतीसाठी एक मिशन सुरु केले, ज्याला ऑपरेशन ब्रह्मा असे नाव देण्यात आले.


# अभिनेता मनोज कुमार काळाच्या पडद्याआड

### मुंबईत घेतला शेवटचा श्वास, आज अन्त्यसंस्कार

◆ **मुंबई, ४ एप्रिल**

सिनेसृष्टीला अनेक देशभक्तिपर चित्रपट आणि राष्ट्राभिमानाने भारलेली अजरामर गीते देणारे चित्रपट निर्माता, दिग्दर्शक अभिनेता मनोज कुमार यांचे शुक्रवारी सकाळी मुंबईतील कोकिलाबेन रुग्णालयात निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक मान्यवरांनी मनोज कुमार यांच्या निधनावर दु:ख व्यक्त केले आहे.

त्यांच्या पश्चात पत्नी शशी गोस्वामी आणि मुलगा कुणाल गोस्वामी आहेत. मनोज कुमार विशेषतः त्यांच्या देशभक्तिपर चित्रपटांसाठी ओळखले जात. ते साईबाबांचे निस्सीम भक्त होते. त्यांनी काढलेला साईबाबांवरील चित्रपटही अजोड ठरला. देशभक्तिपर चित्रपटांमुळे ते भारत कुमार म्हणूनही ओळखले जायचे. उपकार, पूरब-पश्चिम, क्रांती, रोटी-कपडा और मकान हे त्यांचे यशस्वी चित्रपट होते. मनोज कुमार यांना सात फिल्मफेअर पुरस्कार मिळाले. पहिला फिल्मफेअर



पुरस्कार १९६८ मध्ये 'उपकार' चित्रपटासाठी मिळाला. उपकार ला सर्वोत्कृष्ट चित्रपट, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, सर्वोत्कृष्ट कथा आणि सर्वोत्कृष्ट संवाद असे चार फिल्मफेअर पुरस्कार मिळाले. १९९२ मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २०१६ मध्ये त्यांना दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

मनोज कुमार यांचे खरे नाव हरिकृष्ण गोस्वामी होते. त्यांचा जन्म २४ जुलै १९३७ रोजी ब्रिटिश भारतातील अबोटाबाद (आता खैबर पख्तूनख्वा, पाकिस्तान) येथे झाला. ◂(वृत्तसंस्था)

### देशभक्तिपर चित्रपटांद्वारे अमिट छाप

**रा. स्व. संघाकडून शोकसंदेश**

आपल्या देशभक्तिपर चित्रपटांद्वारे मनोज कुमार यांनी सिनेसृष्टीत आपली अमिट छाप सोडली आहे. या कर्तृत्वासाठी कायम त्यांना लक्षात ठेवले जाईल, अशा शब्दात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने मनोज कुमार यांच्या निधनावर शोक संवेदना व्यक्त केली आहे. रा. स्व. संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी एक्सवर यासंदर्भात पोस्ट केली आहे. त्यात त्यांनी म्हटले की, पद्मश्री मनोज कुमार यांचे निधन ही फारच दु:खद वार्ता आहे. दादासाहेब फाळके पुरस्कार विजेत्या या अभिनेत्याने आपल्या देशभक्तिपर चित्रपटांनी स्वत:चा असा ठसा उमटविला. त्यांचे हे चित्रपट कायम लक्षात ठेवले जातील. त्यांना सद्गती मिळो, ही ईश्वरचरणी प्रार्थना. ■

# ट्रॅक्टर-ट्रॉली विहिरीत पडून सात महिला शेतमजुरांचा मृत्यू

- तीन जणांना वाचविण्यात यश
- पंतप्रधानांनी व्यक्त केला शोक

**छ. संभाजीनगर, ४ एप्रिल**

नांदेड जिल्ह्यात शुक्रवारी सकाळी शेतात घेऊन जाणारी ट्रॅक्टर-ट्रॉली विहिरीत पडल्याने सात महिला शेतमजुरांचा मृत्यू झाला. त्यापैकी दोन १८ वर्षांच्या होत्या, असे अधिकाऱ्याने सांगितले. लिंबगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या आसेगाव गावात सकाळी ७.३० च्या सुमारास हा अपघात झाला. वाहन रस्त्याने उलटून पाण्याने विहिरीत पडले, असे जिल्हा माहिती अधिकारी प्रवीण टाके यांनी सांगितले. पोलिस आणि स्थानिक प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी तत्काळ बचावकार्य सुरू केले.

विहिरीतून मोठ्या प्रमाणात पाणी बाहेर



काढण्यात आले. त्यानंतर सात महिलांचे मृतदेह विहिरीतून बाहेर काढण्यात आले, तर तीन जणांना वाचविण्यात यश आले, असे टाके यांनी सांगितले. या महिला शेतात हळद कापण्यासाठी जात होत्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अपघातातील जीवितहानीबद्दल शोक व्यक्त केला. तसेच प्रत्येक मृतांच्या कुटुंबीयांना पंतप्रधानांच्या राष्ट्रीय मदत निधीतून दोन लाख रुपयांची मदत जाहीर केली, तर जखमींना प्रत्येकी ५0 हजार रुपये देण्यात येणार असल्याचे जाहीर केले. महाराष्ट्रातील नांदेड येथे झालेल्या अपघातात जीवितहानीबद्दल दु:ख झाले. ज्यांनी आपले प्रियजन गमावले त्यांच्याबद्दल शोक व्यक्त करतो. जखमी लवकर बरे व्हावेत. स्थानिक प्रशासन पीडीतांना मदत करत आहे, असे पंतप्रधान म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतमजुरांच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त करत प्रत्येक मृतांच्या कुटुंबाला स्वतंत्रपणे पाच लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली.

### अमेरिकेत ई-मेल पाठवून शेकडो परदेशी विद्यार्थ्यांचे व्हिसा रद्द

◆ **न्यूयॉर्क, ४ एप्रिल**

अमेरिकेत शिक्षण घेणाऱ्या शेकडो परदेशी विद्यार्थ्यांना अचानक त्यांचा एफ-१ व्हिसा म्हणजेच विद्यार्थी व्हिसा रद्द करण्याबाबतचा ईमेल आला आहे. हा मेल मार्चच्या शेवटच्या आठवड्यात अमेरिकन परराष्ट्र विभागाने पाठवला आहे.

हे ईमेल कॅम्पस ॲक्टिव्हिटीमध्ये म्हणजेच कॅम्पसमध्ये होणाऱ्या निदर्शनांमध्ये सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांना पाठवण्यात आले आहे. अहवालांनुसार, असे ईमेल अशा विद्यार्थ्यांना देखील पाठवण्यात आले आहेत जे कॅम्पस ॲक्टिव्हिटीमध्ये सहभागी नव्हते परंतु सोशल मीडियावर इस्रायलविरोधी पोस्ट शेअर, लाईक किंवा कमेंट केल्या होत्या. ◂(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्वाचे...



## अनंत जाधव यांच्या कार्यालयास पालकमंत्री गोरे यांनी दिली भेट

**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे हे सोलापूर दौऱ्यावर होते त्यावेळी त्यांनी माजी नगरसेवक तथा भाजपाचे नेते आनंत जाधव यांच्या कार्यालयात सदिच्छा भेट दिली. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा सत्कार जाधव यांनी केला यावेळी आमदार देवेंद्र कोठे उपस्थित होते त्यांचाही सत्कार जाधव यांनी केला. यावेळी माजी नगरसेवक आनंद जाधव यांनी सोलापूर शहरातील अनेक सामाजिक प्रश्न, मराठा समाजातील युवकांच्या रोजगाराचा प्रश्न मांडत अनेक समस्या पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासमोर मांडल्या यावर पालकमंत्री गोरे म्हणाले आपले सर्व प्रश्न मार्गी लावू अशी ग्वाही दिली. यावेळी भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे, माजी नगरसेवक अविनाश पाटील, विनायक विटकर उपस्थित होते.



## पु. अहिल्यादेवी होळकर प्रसुतीगृहास चांगल्या आरोग्य सुविधा द्या

**महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या सूचना**

**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रसुतीगृह तसेच या आवारातील विभागीय कार्यालय ६ व ७, जन्म मृत्यू नोंदणी विभागास महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी भेट दिली. प्रसुतीगृहात दाखल होणा-या मातांना वरील सर्व सुविधा मोफत देण्यात येत आहे. अजून चांगल्या प्रकारे आरोग्य सुविधा महिलांना देण्यात याव्यात, अशा सचुना आयुक्त यांनी संबंधितीत अधिकाऱ्यांना दिल्या. त्यानंतर आयुक्त यांनी विभागीय कार्यालय ६ व ७, जन्म मृत्यू नोंदणी विभागासा भेट देऊन त्या विभागाची सविस्तर माहिती घेतली.यावेळी शहर लेखा व्यवस्थापक सिद्धेश्वर बोरगे, विभागीय अधिकारी हिदायत मुजावर, विभागीय अधिकारी जावेद पानगल, नियंत्रण अधिकारी डॉ. ज्योत्स्ना कोरे, डॉ. अरुंधती हराळकर, डॉ. दीपिका चिचोळी, डॉ. तन्वगी जोग, डॉ.मंजिरी कुलकर्णी, डॉ. चाफळकर ,डॉ. प्रसाद कुमार ,डॉ. मिनल चिडगुपकर, क्षमा डबीर, संगिता गुरव आदी उपस्थित होते.

## सुत गिरणी बचाव संघर्ष समितीची सोमवारी बैठक

**सोलापूर, दि.४ एप्रिल-**

विरवडे (ता. मोहोळ) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय सहकारी सुत गिरणीच्या सर्व सभासदांनी नुकतीच संघर्ष कृती समितीची स्थापना केली आहे. या समितीच्या वतीने सोमवारी दि.७ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता सोलापूर येथील पांजरापोळ चौक, एस.टी. स्टॅण्ड जवळील कमल हॉटेल येथे बैठक आयोजित केलेली आहे. सर्व सभासदांनी बैठकीसाठी येताना सभासद पावती, आधार कार्ड व मयत सभासदांचे वारसांचे अर्ज व आधारकार्ड व तीन फोटो आणावेत असे आवाहन करण्यात आले आहे. याबाबत अधिक माहितीसाठी पुढील मोबाईल नंबरवर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. संपर्क - शशिकांत रोकडे (९१३०६१५४५५) व्ही. डी. गायकवाड (९९२३९४७२४९) राजरत्न फडतरे (९२८४३५७०७९)

## शहरातून दोन दुचाकी व एक मोबाईल चोरीस

**सोलापूर, दि. ४ एप्रिल -**

शहरात विविध ठिकाणाहून दोन दुचाकी व एक मोबाईल चोरीस गेल्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत. अभिजित मोहन सगर (वय ५०, रा. अभिषेक अपार्टमेंट, किनारा हॉटेलजवळ, सोलापूर) हे २० मार्च रोजी त्यांच्या पत्नीस सिव्हील हॉस्पीटल येथे कामासाठी सोडण्यासाठी गेले असता सिव्हील हॉस्पीटलमधील १७ नंबर गेटजवळ गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने त्यांचा १० हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरून नेल्याची नोंद सदर बझार पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार पापडे पुढील तपास करीत आहेत. गेनसिध्द मलकारी कोटे (वय ५०, रा. इंगळगी, ता. दक्षिण सोलापूर) यांनी १४ मार्च रोजी मार्केट यार्ड येथे त्यांची एमएच १३ बीएल ५३५६ क्रमांकाची दुचाकी पार्क करून यार्डात गेले होते. त्यावेळी ती दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जेलरोड पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार जाधव पुढील तपास करीत आहेत. वेणुगोपाल श्रीनिवास जिल्हा (वय ४५, रा. दत्त नगर, मार्कंडेय हॉस्पीटलमागे, सोलापूर) यांनी ३ एप्रिल रोजी सायंकाळी भवानी पेठेतील वीरतपस्वी शाळा येथे त्यांची एमएच १३ सीएम ८६८० क्रमांकाची दुचाकी हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार आरेनवरू पुढील तपास करीत आहेत.

## गोल्डन स्पून नवीन ब्रँड बाजारात

**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

भारतात आईस्क्रीम श्रेणीचा झपाट्याने विस्तार होत आहे.क्वालिटी वॉल्सने ही श्रेणी सर्वांसाठी आनंददायी बनवण्याच्या महत्त्वाकांक्षेसह गोल्डन स्पून ही घरात उपलब्ध असलेल्या स्वादिष्ट मिष्टान्नांची एक सुलभ श्रेणी आणली आहे. क्लासिक व्हॅनिला; मिठाई मॅजिक.ही बुंदी घातलेल्या पारंपारिक भारतीय मिठाईचे आधुनिक रूप आहे; २-इन-१ चॉकलेट व्हॅनिला आणि २-इन-१ मँगो व्हॅनिला, जे ग्राहकांना त्यांच्या घरच्या घरी एकाच स्कूपमध्ये दोन फ्लेवर्सचा अनुभव देतात.एचयूएलच्या आईस्क्रीम व्यवसायाचे प्रमुख तोलोय तानरीदागली म्हणाले,आमचा नवीन ब्रँड गोल्डन स्पून भारतीय कुटुंबे आणि मित्रांमध्ये एकता वाढवण्याचा उद्देश ठेवतो.

# सोलापूर रेल्वे विभागातून थेट रेल्वे गाड्या नाहीच !

- पुणे किंवा मुंबई वारी केल्यानंतरच जाणे होते शक्य
- लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी प्रवाशांचा अधिक वेळ आणि पैशांचा होतोय खर्च

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ एप्रिल-**

सोलापूर रेल्वे स्थानक हे दक्षिण भारताचे प्रवेशद्वार म्हणून ओळखले जाते. सोलापूरहून पुणे, मुंबई, हैदराबाद, गुजरात येथे जाण्यासाठी थेट रेल्वे सेवा आहे. परंतु, सोलापुरातून उत्तर पूर्व आणि पश्चिम भारतात जाण्यासाठी विशेष थेट रेल्वे नाहीत. नागपूर, हावडा (कोलकता), माता वैष्णोदेवी कटरा, गोवा, नाशिक, हरिद्वार, कालका, गुवाहाटी, लखनऊ, गोरखपूर, केरळ येथे जाणारी प्रवासी संख्या जास्त आहे. तेथे जाण्यासाठी सोलापूरकरांना पुणे, मुंबई आणि मनमाड या शहरातील रेल्वे गाड्यांचा आधार घ्यावा लागतो. त्याने अधिक वेळ आणि पैसा खर्च होतो. सोलापुरातून याठिकाणी जाण्यासाठी रेल्वे सुरू करावी, अशी मागणी प्रवाशांमधून होत आहे.

### सोलापूर रेल्वे प्रशासनाने लांब पल्ल्याच्या गाड्या सुरू कराव्यात

सोलापूर रेल्वे स्थानकावरून सध्या देशातील अनेक महत्वाच्या ठिकाणी बेट रेल्वेगाड्या उपलब्ध नाहीत. त्यामुळे सोलापूरकरांना पुणे किवा मुंबईला दुसऱ्या रेल्वेने जावे लागते. जर सोलापूरहून थेट लांब पल्ल्यांच्या रेल्वेगाड्या सोडल्या, तर याचा फायदा सोलापूर रेल्वे विभागाच्या उत्पन्न आणि व्यापाराला होईल. तसेच, पुणे विभागातून प्रवास करणाऱ्या व प्रतीक्षा यादीत असलेल्या प्रवाशांनाही याचा लाभमिळेल. टिकेकरवाडी टर्मिनस लवकरात लवकर सुरू करण्यासाठी लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांनी एकत्रितपणे रेल्वे मंत्रालय व रेल्वे बोर्डाकडे प्रयत्न करायला हवेत.

**- राजा जाधव, अध्यक्ष रेल्वे प्रवासी संघटना**

दरम्यान, सोलापूर रेल्वे स्थानकावरून दररोज ११० रेल्वेगाड्या ये-जा करतात. सोलापूर रेल्वे स्थानकाचा अमृत भारत योजनेत समावेश झाला आहे. स्थानकाचा करोडो रुपये खर्चुन विकास केला जात आहे. परंतु, केवळ विकास न करता नवीन गाड्या महत्त्वाच्या शहराला जाण्यासाठी सुरू कराव्यात, अशी मागणी प्रवाशांमधून होत आहे. सोलापूरहून थेट रेल्वे सेवा नसल्याने प्रवाशांना फटका बसत आहे. त्यामुळे सोलापुरातून मनमाडला जातात. त्यामुळे आर्थिक भारासह मानसिक त्रास सहन करावा लागतो. त्यातही काहीवेळा रेल्वेच्या कामामुळे ब्लॉक घेतला जातो. रेल्वे गाड्या कोणत्या ना कोणत्या कारणामुळे उशिरा किंवा रद्द होतात. त्याचा मनस्ताप प्रवाशांना सहन करावा लागतो. सोलापूरमधून थेट रेल्वे सेवा सुरू झाल्यास प्रवाशांना दिलासा मिळू शकेल. लांबपल्ल्याची रेल्वे सेवा सुरू होण्यासाठी आणखीन किती दिवस सोलापूरकरांना वाट पाहावी लागणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### काही प्रमुख शहरांसाठी सोलापूरहून थेट रेल्वे नसलेली शहरे (तिकिटांचे दर)

नागपूर: पुणे ते नागपूर स्लीपर ४७५, वातानुकूलित तृतीय श्रेणी : १२५५, वातानुकूलित द्वितीय श्रेणी: १७२५. हावडा (कोलकाता) पुणे ते हावडा : स्लीपर : ७९०, वातानुकूलित तृतीय श्रेणी : २०६५, वातानुकूलित द्वितीय श्रेणी २९८०. माता वैष्णो देवी कटरा (भोपाळ, झाशी, आग्रा, दिल्ली, अंबाला, लुधियाना, जम्मूमार्गे), मुंबई बांद्रा टर्मिनस ते कटरा स्लीपर : ७९५, वातानुकूलित तृतीय श्रेणी २०७५, वातानुकूलित द्वितीय श्रेणी २९९५. गोवा पुणे ते वास्को: स्लीपर : ३६५, वातानुकूलित तृतीय श्रेणी : ९५५, वातानुकूलित द्वितीय श्रेणी १३४०. नाशिक: कल्याण ते नाशिक स्लीपर : १७५, वातानुकूलित तृतीय श्रेणी: ५५५, वातानुकूलित द्वितीय श्रेणी ७६०. हरिद्वार/ऋषिकेश मुंबई बांद्रा टर्मिनस ते हरिद्वार/योग नगरी ऋषिकेश स्लीपर ६५५, वातानुकूलित तृतीय श्रेणी १७४०, वातानुकूलित द्वितीय श्रेणी २५२५. कालका मनमाड ते कालका स्लीपर ६७०, वातानुकूलित तृतीय श्रेणी १७५५, वातानुकूलित द्वितीय श्रेणी २५२०. गुवाहाटी/कामाख्या मुंबई ते गुवाहाटी स्लीपर ८६५, वातानुकूलित तृतीय श्रेणी २२६५, वातानुकूलित द्वितीय श्रेणी: ३३२०. लखनऊ पुणे ते लखनऊ: स्लीपर ६४०, वातानुकूलित तृतीय श्रेणी: १६८०, वातानुकूलित द्वितीय श्रेणी: २४१०.

# प्रभु श्रीरामाला विविध अवताराने अलंकृत

- 'श्री'च्या दर्शनाने भक्तगण होताहेत कृतकृत्य
- धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल
- रविवारी जन्मोत्सव, कल्याणोत्सव, रथोत्सव

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

पूर्वविभागातील श्री राम मंदिरच्या वतीने गुढीपाडवा ते श्री राम नवमीपर्यत 'श्री' स अनुक्रमे मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, बलराम, बुध्द, कल्की असे दररोज एका अवताराने अलंकत केले जात आहे. विविध अवतारातील 'श्रीं'च्या दर्शनाने भक्तगण कृतकृत्य होत असल्याचे दिसून येत आहे.

प्रभू श्री राम नवमीनिमित्त पूर्व विभाग श्री राम मंदिरच्या वतीने ७ एप्रिल पर्यत महाभिषेक, श्री राम सहस्त्रनामस्त्रोत, पारायण, षोडशोपचार पूजा, विष्णू सहस्त्रनाम, कुंकुम अर्चना, दशावतार प्रवचन, पालखी सेवा, भजन असे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने या मंदिरात धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल सुरु आहे. ह.भ.प. अंजनेयलू दुस्सा यांच्या नेतृत्वाखाली श्री राम रक्षा स्तोत्र, श्री विष्णुसहस्त्रनाम स्तोत्र पारायण होत आहे. भावनाऋषी भजन मंडळ, श्री सत्यसाई भजनी मंडळ, महेश गोली भरतनाट्यम, भारुड, श्रीनिअंबा नृत्यालय भरतनाट्यम, स्वरांजली संगीत विद्यालय, रघुनाथ गड्डम भरतनाट्यम आदी कार्यक्रम होत आहेत.

राम नवमीदिनी (रविवार, ६ एप्रिल) सुप्रभातम्, बालभोग, तुलसी पुष्पार्चना, विष्णू पंचायतन पूजा, गुलाल कीर्तन, श्री राम जन्मोत्सव, दोलोत्सव, नक्षत्र आरती, हरिद्रा लेपनम्, देवकार्य, सीतामाई प्रतानम, सीता राम कल्याणोत्सव, रथोत्सव, राजोपचार पूजा, शयन आरती अस विविध कार्यक्रम होणार आहेत, असे सांगण्यात आले.

गुढीपाडवा ते राम नवमी या कालावधीत आयोजित उत्सवांतर्गत दोलोत्सव विधीत सहभागी घेतल्यास संतानप्राप्ती, ओटीभरण विधीत सहभागी घेतल्यास मनोरथ पूर्ण, अवतार महापुजेत सहभागी घेतल्यास अनुग्रह प्राप्ती, कल्योणात्सवमध्ये आहेर दिल्यास ऋण मुक्ती, होमहवन विधीमध्ये सहभागी घेतल्यास पापविमोचन असे लाभ मिळतात, असे मंदिराचे पुजारी श्रीनिवास चिप्पा यांनी सांगितले.

# सरपंच परिषदेच्या पदाधिकाऱ्यासाठी मंत्रालयात बैठक घेऊ : ग्रामविकास मंत्री गोरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

राज्यातील सरपंच परिषदेच्या पदाधिकाऱ्याकरिता मंत्रालयामध्ये एक बैठकीचा आयोजन करून सरपंचाच्या प्रश्नाला न्याय दिला जाईल असे आश्वासन राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सरपंच परिषदेच्या शिष्टमंडळांना दिले.



राज्यांचे ग्राम विकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री ना.जयकुमार गोरे यांना सरपंच परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. विकास जाधव यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर येथे शासकीय विश्रामगृहात देण्यात आले यावेळी सरपंच परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी ग्रामविकास मंत्री यांचा यथोचित सत्कार केला व ग्रामीण भागाच्या विकासासाठी सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्यांना सक्षम करण्यासाठी ग्रामीण भागाशी निगडित अशा अनेक मागण्यांचे निवेदन ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांना दिले.

या शिष्टमंडळात सरपंच परिषदेचे जिल्हाध्यक्ष आदिनाथ देशमुख, महिला जिल्हाध्यक्षा कविता घोडके-पाटील, मिरा साळुंखे, उमेश भगत, बालाजी येलगुंडे, नागनाथ माने,अंजली क्षिरसागर, परिनीता शिंदे, आशिष क्षीरसागर, ज्ञानेश्वर पाटील, महेंद्र खटके उपस्थित होते

मुंबईत सरपंच भवन,राज्यातील सर्व जिल्हा परिषदेत व पंचायत समितीमध्ये सरपंच कक्ष स्थापन करण्यात यावे, सरपंच उपसरपंचांचे जाहीर केलेले वाढीव मानधन अद्याप सुरू झालेले नाही ते तात्काळ सुरू करावे, गायरान व गावठाण मधील रहिवासी अतिक्रमण नियमाधीन करावे, सरपंचांना मोफत एस.टी.पास द्यावा या प्रमुख मागण्या सरपंच परिषदेच्या वतीने ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे केल्या.

या सर्व मागण्यावर चर्चा करण्यासाठी लवकरच मंत्रालयात सरपंच परिषदेच्या प्रदेश पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करून सर्व मागण्या मार्गी लावू, असा शब्द ग्रामविकास मंत्र्यांनी सरपंच परिषदेच्या शिष्टमंडळास दिला.

# पूर्वविभाग श्री राम मंदिर : शिखर, कोरीव मुर्त्या आणि दैवदुर्लभ योग


- रामनवमी विशेष
- एकाच वेळी होते सूर्य, शिखर व मूर्तीचे दर्शन
- ३७ पूट उंच शिखर, ३२० कोरीव मूर्त्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

पूर्वविभागातील दाजी पेठ येथील श्री राम मंदिराचे शिखर, त्यावरील कोरीव मूर्त्या आणि दैवदुर्लभ योगसंदर्भात सर्वदूर ख्याती आहे. दररोज सूर्योदयाच्या वेळी मंदिरसमोरील मुख्य चौकात उभे राहिल्यास एकाच वेळी सूर्य, शिखर व मुर्तीचे दर्शन घडते.

साधारणपणे ९० वर्षांपूर्वी तत्कालिन समाजधुरिण एकत्रित येत बलोपासनेसाठी हिरा मारुती या नावाने याठिकाणी मंदिराची स्थापना केली. तसेच मोकळ्या जागेत विठ्ठल-रुक्मिणी किंवा राम मंदिर उभारण्याचा संकल्प सोडत त्यादृष्टीने कामाला लागले होते.

तत्कालिन समाजधुरिणांसह या भागातील कारखानदार, व्यापारी, लोकप्रतिनिधी, सामाजिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मंदिर निर्माणसाठी सढळ हाताने मदत केली. सर्वसंमतीने याठिकाणी प्रभू श्रीरामाचे मंदिर उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. सोमवार, १९ मार्च १९५६ रोजी राम, सीता, लक्ष्मण यांच्या मुर्तीची विधीवत स्थापना करण्यात आली. १९८३ साली शिखर बांधण्यात आले. ३७ फूट उंच अशा शिखराच्या चारही बाजूंना प्रभु रामचंद्राच्या जीवन चरित्रावर आधारित ३२० कोरीव मूर्त्या आहेत. दरवर्षी गुढीपाडवा ते श्री राम नवमीपर्यंत या मंदिरातील 'श्री'स मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, बलराम, बुध्द, कल्की असे दररोज एका अवताराने अलंकत केले जाते. दाक्षिणात्य शैलीचे व अद्वितीय कलापूर्णतेने बांधलेले शिखर म्हणून या मंदिराच्या शिखराकडे पाहिले जाते. सुर्योदयाच्या वेळी सूर्य, शिखर व मुर्ती असा दैवदुर्लभ दर्शन घेण्यासाठी महाराष्ट्रासह तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक आदी राज्यातून भाविक याठिकाणी येत असतात.



# हातभट्टी व अवैध मद्य वाहतूकीवर कारवाई

## ६ लाख ६४ हजारांचा मुद्देमाल जप्त

### राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल -**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्यावतीने अवैध हातभट्टी निर्मिती केंद्रावर तसेच अवैध देशी-विदेशी दारूची होणारी वाहतूक पकडून ६ लाख ६४ हजार ५६७ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्यावतीने सोलापूर शहर व जिल्ह्यातील विविध ठिकाणी असलेल्या हातभट्टयांवर कारवाई करून ११ हजार ६५० लिटर रसायन, १७५ लिटर हातभट्टी दारू नष्ट केली. तसेच सोलापूर ते बार्शी रोडवर अवैध देशी-विदेशी दारूची वाहतूक करणारी एक चारचाकी कार गाडी पकडून त्यातून १५८.१ बल्क लिटर देशी मद्य, ४४.४४ बल्क लिटर विदेशी मद्य आणि ९.९ लिटर बिअर आणि एक चारचाकी वाहन असा १ लाख ६४ हजार ३६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.





### २०२४-२५ या आर्थिक वर्षात २६०३ गुन्हे दाखल

१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या आर्थिक वर्षात राज्य उत्पादन शुल्क विभागाने सोलापूर शहर व जिल्ह्यात केलेल्या अवैध हातभट्टी निर्मिती केंद्रावर तसेच अवैध देशी-विदेशी मद्य व ताडी विक्रि तसेच वाहतूकीवर केलेल्या धडक कारवाईत एकूण २६०३ गुन्हे नोंद करण्यात आले असून २१९६ जणांवर कारवाई करून ३०३ वाहनांसह ८ कोटी ५६ लाख ३५ हजार १२६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सन २०२३-२४ च्या तुलनेत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात जप्त मुद्देमालात ४२ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. तसेच करण्यात आलेल्या गुन्ह्यांच्या कारवाईत २६ टक्क्यांनी वाढ झालेली आहे.

### ● विनापरवाना मद्य विक्री करणाऱ्या २८५ ढाब्यांवर तसेच ३३२ मद्यपींवर कारवाई...

सन २०२४-२५ या कालावधीत अवैध मद्य विक्रि करणाऱ्या व मद्य पिण्यास परवानगी देणाऱ्या एकूण २८५ ढाब्यांवर गुन्हे नोंदविण्यात आले असून ३३२ मद्यपींवर कारवाई करण्यात आली आहे. त्यापैकी ४१ ढाब्यांवर कलम ६८ व ८४ अन्वये १६२ जणांवर कारवाई करण्यात आली असून न्यायालयाने श्री ढाबा, जय मल्हार ढावा, द सॅम हॉटेल, मातोश्री ढाबा, सम्राट ढाबा, सुमित कोल्ड्रींक्स हाऊस, सावजी ढाबा, जय भवानी ढाबा, शरणबसवेश्वर ढाबा, वैष्णवी ढाबा, रॉयल ढाबा, मैत्री ढाबा, कोळीवाडा ढाबा अशा ढाब्यांचे मालक व मद्यपी ग्राहकांना ११ लाख रुपयांचा दंड ठोठावला.

### १८ जणांकडून घेतले ३० लाख २५ हजारांचे बंधपत्रे

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात राज्य उत्पादन शुल्क विभागाने दारूबंदी कायद्यातील कलम ९३ नुसार १८ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करून त्यांच्याकडून ३० लाख २५ हजार रुपये इतक्या रकमेचे बंधपत्रे घेण्यात आली.

सदरची कारवाई विभागीय उपायुक्त सागर धोमकर, अधिक्षक श्रीमती भाग्यश्री जाधव, उपअधिक्षक एस आर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक आर एम चवरे, जे एन पाटील, ए व्हि घाटगे, राकेश पवार, पंकज कुंभार, दुय्यम निरीक्षक एस डी कांबळे, आर एम कोलते, धनाजी पोवार, समाधान शेळके, सुखदेव सिद, नांगरे, पडवळ, अंजली सरवदे, श्रीमती बहुधन, सहायक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, मोहन जाधव, संजय चव्हाण, विजय पवार, जवान आण्णा करचे, नंदकुमार वेळापूरे, शोएक बेगमपुरे, वसंत राठोड, चेतन व्हनगुंटी, इस्माईल गोडीकट, कपील स्वामी, प्रशांत इंगोले, अनिल पांढरे, विनायक काळे, आर पी कांबळे, योगीराज तोग्गी, रशीद शेख, दीपक वाघमारे यांनी केली.

# मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागातून अल्पवयीन मुलीस फुस लावून पळविले

**अज्ञाताविरुध्द गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.४ एप्रिल**




मंगळवेढा तालुक्याच्या ग्रामीण भागातून एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीस कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरुन फुस लावून पळवून नेण्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,दि.३ रोजी रात्री १० वाजता यातील फिर्यादी व त्यांचे कुटूंबिय नेहमीप्रमाणे जेवणखाण करुन घरी झोपले होते. रात्री ११.३० वाजता पाऊस आल्याने सदर मुलीचे आई वडील जागे झाले त्यावेळेस ती अल्पवयीन मुलगी झोपल्या जागी दिसून आली नाही. आई वडीलांनी आजूबाजूस सर्वत्र नातेवाईकाकडे फोनव्दारे चौकशी केली असता आमच्याकडे आली नसल्याचे सांगितले. ती मिळून न आल्याने अल्पवयीन असल्याचा फायदा घेवून तिला फुस लावून कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अमिष दाखवून कायदेशीर रखवालीतून पळवून नेले असल्याचे वडीलांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...

### सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले आज जिल्हा दौऱ्यावर

**सोलापूर दि. ४ एप्रिल-**

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून)महाराष्ट्रराज्य मंत्री शिवेंद्रराजे भोसले, हे सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे. शनिवार दि.५ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ५.00 वा. चिंचणी भावळवणी ता. पंढरपूर येथे आगमण व कृषी पर्यटन केंद्रास भेट. व सायं. ५.१५ वा. चिंचणी भावळवणी येथून सह्याद्री इसबावी कडे प्रयाण. सायं. ६.१५ वा. सह्याद्री इसबावी येथे आगमन व शेलार कॉम्प्लेक्स व हॉटेल स्प्री उद्घाटन सोहळ्यास उपस्थिती. सायं. ७.१५ वा. सह्याद्री इसबावी येथून श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर पंढरपूर कडे प्रयाण. व सायं. ७.३० ते ८ वाजेपर्यंत श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर पंढरपूर येथे आगमन व दर्शन. रात्री ८ वा. श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर पंढरपूर येथून सह्याद्रीनगर इसबावी कडे प्रयाण. रात्री ८.१५ वा सह्याद्रीनगर इसबावी येथे आगमण व राखीव. रात्री ९ वा. सह्याद्रीनगर इसबावी येथून सुरूची निवासस्थान साताराकडे प्रयाण करतील.

### वक्फ सुधारणा विधेयकाला पाठिंबा देणे सत्तेसाठी लाचारी : हर्षवर्धन सपकाळ

**मुंबई दि. ४ एप्रिल-**

भारतीय जनता पक्षाला पाठिंबा देत सरकार मध्ये सहभागी झालो तरी शिव, शाहु, फुले, आंबेडकरांच्या विचाराचा वारसा सोडला नाही असे सांगणाऱ्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा खरा चेहरा उघडा पडला आहे. भाजपा सरकारने आणलेल्या वक्फ सुधारणा विधेयकाला पाठिंबा देऊन अजित पवार यांनी सत्तेसाठी लोटांगणच घातले असल्याचा घणाघाती हल्ला प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. वक्फ विधेयक हे केवळ मुस्लीम समाजात दहशत बसवून लाखो एकर जमीन ताब्यात घेण्याचा भाजपा सरकारचा डाव आहे. मुंबईत धारावीसह अनेक महत्वाच्या जमिनी एका विशेष उद्योगपतीला देण्याचा सपाटा भाजपा सरकारने लावला आहे. उद्या वक्फच्या जमिनी ताब्यात घेऊन त्या जमिनी हे सरकार लाडक्या उद्योगपतींच्या घशातच घालणार आहे हे अजित पवार यांच्यासारख्या नेत्याला माहित नाही असे नाही पण सत्तेशिवाय राहून शकणाऱ्या अजित पवारांनी खुर्चीसाठी भाजपासमोर लाचार होऊन विधेयकाला पाठिंबा दिला आहे. अजित पवार यांनी हा मुस्लीम समाजाला दिलेला धोका आहे. त्यामुळे अजित पवार यांचे खायचे दात व दाखवायचे दात वेगळे आहेत हे जनतेने लक्षात घेऊन सावध व्हावे, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

### मंगेशकर रुग्णालयावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा : अतुल लोंढे

**मुंबई दि. ४ एप्रिल-**

पुण्यात सात महिन्याच्या गर्भवती महिलेचा दिनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या मुजोरपणामुळे बळी गेला, ही घटना हृदय पिळवटून टाकणारी आहे. जनतेत रुग्णालयाच्या मुजोरीपणा विरुद्ध तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. पण ना सरकार ना पोलीस प्रशासन कोणीही योग्य ती कारवाई केलेली नाही. या मातेचा मृत्यू दिनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या हलगर्जीपणा व मुजोरपणाचा बळी असून संबंधित डॉक्टर व रुग्णालयावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केली आहे. यासंदर्भात संताप व्यक्त करत अतुल लोंढे म्हणाले की, मंगेशकर रुग्णालय हे धर्मादाय नोंदणी असलेले रुग्णालय आहे, जनतेच्या कराच्या पैशातून ते उभे राहिले आहे, सरकारने या रुग्णालयाला एक रुपयाने जमीन दिली आहे. पण या रुग्णालयात सामान्य लोकांना लुटण्याचे काम होत आहे. मयत तनिषा भिसे यांच्या नातेवाईकांना रुग्णालयाने २० लाख रुपयांचा खर्च येईल व १० लाख रुपये आधी भरा ,असे सांगितल्याचे समजते. २० लाख मध्यमवर्गीय कुटुंबालाही परवडणारी नाही. पैशासाठी या रुग्णालयाने एका मातेचा बळी घेतला आहे, दोन बाळं आईच्या प्रेमाला व दुधाला मुकली आहेत, हे अत्यंत गंभीर आहे.या प्रकरणाची अंतर्गत चौकशी करण्याचा कांगावा रुग्णालय प्रशासन करत आहे, त्यातून काहीच निष्पन्न होणार नाही. अशा मुजोर रुग्णालयावर कठोर कारवाई झाली पाहिजे जेणेकरून पुन्हा कोणते बाळ आईच्या मायेला पोरके होणार नाही, अशी कडक कारवाई करण्याची धमक देवेंद्र फडणवीस सरकारने दाखवावी, अशीही मागणी त्यांनी केली आहे.

# पुण्यातील मंगेशकर रुग्णालयातील प्रकरणाची मुख्यमंत्र्यांकडून गंभीर दखल

**● धर्मादाय सहआयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठित करण्याचे आदेश**

**तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.४ एप्रिल**

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेतली आहे. या घटनेची चौकशी करण्यासाठी पुण्याच्या धर्मादाय सहआयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठित करण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत.

त्याचप्रमाणे उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार तयार करण्यात आलेल्या धर्मादाय रुग्ण योजनेची धर्मादाय रुग्णालयांकडून अंमलबजावणी होत नसल्यास, त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, असे निर्देशही दिले आहेत. अत्यंत अल्प दरात शासनाकडून भाडेतत्त्वावर भूखंड मिळवून उभारण्यात आलेल्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात प्रशासनाने एका गर्भवती महिलेला दाखल करून घेण्यापूर्वी दहा लाख रुपये जमा करण्याच्या सूचना केल्या होत्या. पैसे न भरल्याने त्यांनी तिला ऍडमिट करून न घेतल्याने तिची प्रकृती बिघडली. त्यानंतर नातेवाईकाने तिला अन्य रुग्णालयात नेत असताना तिचा दुर्दैवपणे




मृत्यू झाला. या प्रकरणामुळे रुग्णालयातील प्रशासनाच्या निष्काळजीपणाबद्दल सर्व सामान्यतून तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत आज सर्व पक्षाच्या वतीने प्रशासनाचा निदर्शनात रुग्णालयावर मोर्चा काढण्यात आला होता या सर्व प्रकाराची मुख्यमंत्र्यांनी गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणाची पुण्याच्या धर्मादाय सहआयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समितीकडून चौकशी करण्यात येईल. या समितीत उपसचिव, सह कक्षप्रमुख तथा कक्ष अधिकारी, धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष - मुख्यमंत्री सचिवालय यांचे प्रतिनिधी, मुंबईतील सर जे. जे. रुग्णालय समूहाचे अधीक्षक, तसेच विधि व न्याय विभागाचे उपसचिव/अवर सचिव हे या चौकशी समितीचे सदस्य सचिव असतील.

धर्मादाय रूग्णालयातील आरक्षित खाटा निर्धन व दुर्बल घटकातील रूग्णांसाठी उपलब्ध करुन देण्यासाठी सर्व धर्मादाय रुग्णालयांनी ऑनलाईन प्रणालीद्वारे 'धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची' मान्यता घ्यावी. याबाबत धर्मादाय रुग्णालयांना तत्काळ निर्देश देण्यात यावेत. विधी व न्याय विभागामार्फत गठीत करण्यात आलेल्या तपासणी पथकामार्फत तपासणी अहवाल व समितीच्या शिफारशी सादर केल्या आहेत. त्या शिफारशींवर तत्काळ कार्यवाही करावी. शासनामार्फत धर्मादाय रुग्णालयांमध्ये १८६ धर्मादाय आरोग्य सेवकांच्या सेवा घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

या पदांवरील भरती तत्काळ करण्यात यावी. निर्धन रुग्णनिधी खात्याबाबतची अद्ययावत माहिती धर्मादाय रुग्णालयांकडून घेवून ती धर्मादाय आयुक्त यांच्या संकेतस्थळावर अद्ययावत करावी. योजनेची अंमलबजावणी न करणाऱ्या रुणालयांवर उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कठोर कारवाई करावी.

## सोलापूर विद्यापीठाच्या प्रलंबित प्रश्नांसंदर्भात ८ एप्रिलला मुंबईत बैठक

**▸▸सोलापूर भेटीनंतर विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांची तातडीची कार्यवाही**

**मुंबई दि. ४ एप्रिल,**

महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार ८ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता विधान भवन, मुंबई येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या विविध प्रलंबित प्रश्नांसंदर्भात उच्चस्तरीय बैठक विधान भवन मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे.

३१ मार्चरोजी महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी विद्यापीठास प्रत्यक्ष भेट देऊन विद्यापीठ विकासासंदर्भात विविध विषयांवर कुलगुरु प्रा.डॉ. प्रकाश महानवर यांच्याशी चर्चा केली होती. त्यावेळी येत्या १५ दिवसात यासंदर्भात मुंबईत बैठक घेऊन प्रश्नांची सोडवणूक करण्याबाबत त्यांनी आश्वासीत केले होते, त्यानुसार ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. कुलगुरु, संबंधीत खात्यांचे मंत्री, सचिव तसेच जिल्हाधिकारी, सोलापूर हे या बैठकीस उपस्थित राहणार असून प्रलंबित प्रश्न मार्गी लागणार असल्याने या बैठकीकडे सोलापूर जिल्हावासिय तसेच विद्यार्थी - पालकांचे लक्ष वेधले गेले आहे. सोलापूर दौऱ्यात महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी विद्यापीठातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक, विस्तारीत प्रशासकीय इमारत आणि परीक्षा भवन येथे प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली होती. विद्यापीठाने संपादित केलेल्या जमिनीवर माळढोक पक्षी अभयारण्य, पर्यावरण संवेदनशील क्षेत्र आणि राखीव वनक्षेत्र असे विविध आरक्षण आहे. विद्यापीठ क्षेत्राच्या चारही बाजूस आरक्षण असल्याने येण्या-जाण्यासाठी रस्ता उपलब्ध नाही.

## पुण्यात वेळेत उपचार न मिळाल्याने महिलेचा मृत्यू

**● अजित पवारांचे चौकशीचे आदेश**

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. ४ एप्रिल -**

पुणे येथील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात तातडीने उपचार न मिळाल्याने तनिषा भिसे या गर्भवती महिलेला आपला प्राण गमवावा लागला. ही घटना अत्यंत दुर्दैवी असून या प्रकरणाची सखोल चौकशी तज्ज्ञ डॉक्टरांच्या समितीद्वारे करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत.

पवार यांनी पुणे जिल्हाधिकाऱ्यांकडून याबाबतची संपूर्ण माहिती घेतली आहे. आरोग्य विभागाने तातडीने, पारदर्शक आणि निष्पक्षपणे चौकशी पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. रुग्णालय प्रशासनाने माध्यमांसमोर त्यांचे म्हणणे मांडले असलेतरी शासन या प्रकरणाचा सर्व संबंधित घटकांची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करेल. या घटनेबाबत आंदोलन करणाऱ्या व्यक्ती, संस्था आणि संघटनांच्या भावना शासनाने समजून घेतल्या आहेत. चौकशीच्या निष्कर्षानुसार दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल. तसेच अशा घटना भविष्यात घडू नयेत यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या स्पष्ट सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. सर्व नागरिकांनी संयम बाळगावा आणि प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

## धीरेंद्र शास्त्री अंबानींच्या पदयात्रेत सहभागी

**जामनगर :** रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांचे पुत्र अनंत अंबानी सध्या जामनगर ते द्वारका १४० किलोमीटर चालत आहेत. गुरुवारी अंबानींच्या पदयात्रेचा आठवा दिवस होता. या वेळी बागेश्वर धाम पीठाधीश्वर पंडित धीरेंद्र शास्त्री हेही पदयात्रेत सहभागी झाले होते.

धीरेंद्र शास्त्री यांनी अनेक किलोमीटर अनवाणी प्रवास केला. अनंत यांनी आतापर्यंत ८१ किलोमीटर अंतर कापले आहे. ते दररोज १० ते १२ किमी चालतात. ते फक्त रात्रीच प्रवास करतात जेणेकरून त्यांच्या ताफ्यामुळे तेथून जाणाऱ्या लोकांना कोणताही त्रास होऊ नये. अनंत अंबानी १० एप्रिल रोजी द्वारकाधीशांचे आशीर्वाद घेऊन त्यांचा वाढदिवस साजरा करतील

## तंत्रज्ञानाचा वापर करा, पण काळजी सुरक्षितता घ्या : संदीप गाडीया

**सायबर फॉरेन्सिक तज्ञ : सायबर क्राइम जनजागृती आणि प्रतिबंधवर सेमिनार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

तंत्रज्ञानाचा अति वापर हा धोक्याचे आहे,मात्र पूर्णता तंत्रज्ञानाचा वापर बंद करणे चुकीचे आहे. तंत्रज्ञानाचा वापर करा, पण काळजी व सुरक्षितता याची जाणीव ठेवूनच वापर केला पाहीजे. ऑनलाईन फसवणूक सारख्या घटनांपासून वाचण्यास मदत होईल, असे प्रतिपादन सायबर फॉरेन्सिक तज्ञ संदीप गाडिया यांनी व्यक्त केले

इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशन सोलापूर, कॉलेज फामर्स आणि सोलापूर केमिस्ट ॲड ड्रगिस्ट असोसिएशनतर्फे सायबर क्राइम जनजागृती व



प्रतिबंध याविषयावर शुक्रवारी दुपारी हुतात्मा स्मृती मंदिरात सेमिनारचे आयोजन केले होते. त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना संदिप गाडिया बोलत होते. सायबर क्राईम जनजागृती आणि प्रतिबंध हा त्याचा व्याख्यानाचा विषय होता. कार्यक्रमाचे उद्घाटन पोलिस आयुक्त एम. राजकुमार, अप्पर पोलिस अधीक्षक प्रितम यावलकर, उपायुक्त रवी पवार, राजशेखर शिवदारे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिप प्रज्वलन व धन्वंतरी पूजनाने करण्यात आले. या सेमीनारमध्ये मोबाईल फोन किंवा संदेशाच्या माध्यमातून लिंक शेअर करून कसे जाळ्यात ओढतात याविषयी व्हिडिओच्या माध्यमातून माहिती दिली. गाडिया म्हणाले, मोबाइल फोन, सोशल मीडिया, संगणक आणि भौगोलिक स्थान ट्रॅकिंग हे विशेषतः महामारीच्या काळात खरे ठरले आहे. कार्यक्रमाचे स्वागत व फार्मासिस्ट शपथ डॉ. आर. वाय पाटील यांनी घेतली. बसवराज मणुरे यांनी पाहुण्याचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन डॉ. शुभदा उपासे यांनी केले. आभार वर्षा तेगेळी यानी मानले.

# नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीतून गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवा : मुख्यमंत्री

**▸ न्याय वैद्यक (फॉरेन्सिक) प्रयोगशाळांचे जाळे सक्षम करण्याच्या दिल्या सूचना**

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. ४ एप्रिल**

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, भारतीय न्याय संहिता आणि भारतीय पुरावा कायदा हे तीन नवीन फौजदारी कायदे लागू झालेले आहेत. या कायद्यांच्या अंमलबजावणीतून गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्देश देत न्याय वैद्यक (फॉरेन्सिक) प्रयोगशाळांचे जाळे सक्षम करण्याच्या सूचना शुक्रवारी दिल्या.

पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत फडणवीस म्हणाले, या कायद्यांचे पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात येणारे सर्व प्रशिक्षण पूर्ण करावे. तसेच याबाबत नवीन ' रिफ्रेश कोर्सेस'ही सुरू करावे. नवीन कायद्यांमध्ये गुन्हे सिद्ध करण्यात आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळे गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण वाढणार असून त्यामुळे राज्याच्या गुन्हे सिद्धता दर निश्चितच वाढणार आहे.

गुन्हे सिद्धते कामी बऱ्याचदा दवाखाने, वैद्यकीय महाविद्यालय येथून न्याय वैद्यक पुरावे



गोळा करण्यात येतात. त्यामुळे अशा ठिकाणी न्यायवैद्यक प्रयोगशाळांची सुविधा निर्माण करण्यात यावी. सीसीटीएनएस २.० (क्राइम अँड क्रिमिनल ट्रेकिंग नेटवर्क सिस्टिम) मध्ये ' बँड विथ'ची क्षमता वाढविण्यात यावी. त्यामुळे देशपातळीवर सबंध असलेल्या गुन्ह्यांमध्ये गुन्हे सिद्धता वाढेल. राज्यात सात वर्षांपेक्षा जास्त शिक्षा असलेल्या गुन्ह्यांमध्ये न्यायवैद्यक पुरावे तपासणे सक्तीचे करण्यात आले आहे. अशा प्रकरणांमध्ये न्यायवैद्यक पुराव्यांचा उपयोग करण्यामध्ये राज्याचे प्रमाण ६५ टक्के आहे. तसेच सात वर्षाहून कमी शिक्षा असलेल्या प्रकारांमध्ये न्यायवैद्यक पुरावांचा उपयोग करण्याचे प्रमाणही वाढवण्यात यावे. गुन्हे सिद्धतेमध्ये न्यायवैद्यक पुराव्यांचा प्रभावी उपयोग करण्यासाठी तपासणी अधिकाऱ्यांना टॅब देण्यात यावे टॅब खरेदी करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

न्यायालयीन प्रक्रियेमध्ये गतिमानता आणण्यासाठी या कायद्यांच्या अनुषंगाने ई समन्स, ई-साक्ष उपक्रम न्यायालयाच्या परवानगीने राबविण्यात यावे. तसेच कारागृहांमधील कैद्यांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून कुटुंबीयांशी संवादाची अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून द्यावी. जलद न्याय निवाड्यांसाठी न्यायालयाच्या परवानगीने ई कोर्ट सुरू करण्याबाबत पडताळणी करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

बैठकीस गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बाल सिंग चहल, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, विधी व न्याय विभागाच्या प्रधान सचिव सुवर्णा केवले. मुख्यमंत्री यांचे सचिव श्रीकर परदेशी, कारागृह व सुधारण विभागाचे अपर पोलीस महांचालक सुहास वारके आदी उपस्थित होते.

## परिवहन विभागाच्या जमीनीवरील अतिक्रमण हटवा

**● प्रताप सरनाईक यांचे निर्देश**

**मुंबई, दि. ४ एप्रिल :**

राज्यभरात परिवहन विभागाच्या जिथे, जिथे जमिनी आहेत, त्या बहुतेक जमिनीवर अतिक्रमण झाले आहे. ते अतिक्रमण काढून टाकून, तेथे कुंपण भिंत घालावी, तसेच नामफलक लावण्यात यावा. असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी परिवहन विभागाला दिले आहेत.

परिवहन आयुक्त कार्यालयात बोलावलेल्या परिवहन विभागाच्या आढावा बैठकीमध्ये ते बोलत होते. यावेळी परिवहन आयुक्त विवेक भीमनवार व सर्व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.यावेळी बोलताना मंत्री सरनाईक म्हणाले की, राज्यभरात परिवहन विभागाची जमीन आहे. त्या जमिनीवर कित्येक वर्षापासून अनधिकृत अतिक्रमण झालेले दिसून येते. याबाबत स्थानिक अधिकाऱ्यांनी सर्वेक्षण करून सदर जमिनी अतिक्रमण मुक्त करुन तेथे कुंपण भिंत करावी .तसेच आपल्या विभागाचा नामफलक प्रदर्शित करावा व यापुढे त्या ठिकाणी अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी.परिवहन विभागाच्या विविध पदांच्या बदल्या या २०२३ पासून ऑनलाइन पद्धतीने होत आहेत.

## विश्वासाला तडा देणाऱ्या चुकीला माफी नाही : बावनकुळे

**पुणे, दि.४ एप्रिल**

तलाठ्यांपासून मंत्रालयातून राज्याचा कारभार चालवणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत आपण एक परिवार आहोत, हे ध्यानात ठेवून न घाबरता जनतेची कामे करावी. अनावधानाने झालेली चूक माफ करता येते, पण जनतेच्या विश्वासाला तडा जाईल, अशी चूक माफ होणार नाही, असा इशारावजा कानमंत्र महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महाराष्ट्रातील सर्व वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांना दिला.



पुणे येथे दोन दिवस महसूल परिषद होत आहे. या परिषदेचे उद्घाटन करताना बावनकुळे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विकसित महाराष्ट्राची रूपरेषा आखली आहे. ती पूर्णत्वास नेण्यासाठी कष्ट करा. महसूल विभागाला प्रशासनाचा कणा म्हणतात. त्यामुळे लोककल्याणकारी योजना राबविताना समाजाच्या शेवटच्या माणसाची काळजी घ्या, त्याचा कणा ताठ राहिला पाहिजे यासाठी जिवाचे रान करा. राज्याचा कारभार पारदर्शी आणि गतिमान करण्याचे काम महसूल विभागच करू शकतो, हा विश्वास मला आहे. शेतकऱ्यांना पाणी, वीज, रस्ते द्या पुढील दोन वर्षांत एकाही व्यक्तीची सुनावणी बाकी राहता कामा नये, असा संकल्प करून महसूल विभागाचा देशात आदर्श निर्माण करावा. शेतकऱ्यांच्या आत्महत्या अतिशय दुर्दैवी आहेत. आपण त्या थांबल्या पाहिजे, यासाठी काम करण्याची गरज आहे. शेतीला पाणी, पाणंद रस्ते, वीज देण्यासाठी पुढाकार घेऊन शेतकऱ्याला सुखी करण्याचे प्रयत्न व्हावे. आम्ही लोकप्रतिनिधी आहोत. जनतेला उत्तरदायी आहोत. जनतेने दिलेली मते आम्ही कर्ज समजतो. त्यासाठी जनतेला उत्तरदायी राहणे आमचे कर्तव्य आहे. महसूल विभागाने लोकाभिमुख निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. कामात आधुनिकीकरण आणि एआयचा वापर झाला, तर महसूल विभाग अधिक चांगले काम करीत आहे, हे लक्षात येईल. कुटुंब प्रमुख म्हणून मुख्यमंत्री फडणवीस आणि मी कायम तुमच्या पाठीशी आहे. आता नव्याने वाळू धोरण, देवस्थान जमिनी, भोगवटा दोनच्या जमिनी एक करणे, स्वामित्व योजना, पाणंद रस्ते अशा पद्धतीची कामे केली जाणार आहेत. ही कामे करताना अधिकाऱ्यांनी मानसिकता बदलली पाहिजे.

# सोनिया गांधींच्या विधानावरून गदारोळ, कामकाज स्थगित

**वक्फ दुरुस्ती विधेयक संसदेत मनमानी पद्धतीने पारित केल्याचे वक्तव्य**



### ओम बिर्ला यांनी व्यक्त केली नाराजी

कोणाचेही नाव न घेता बिर्ला म्हणाले की, या सभागृहाचे सदस्य राहून चुकलेल्या आणि आता दुसऱ्या सभागृहाचे सदस्य असलेल्याने या सभागृहाच्या कामकाज प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे योग्य नाही. ही संसदीय परंपरा नाही. बिर्ला आपली भूमिका मांडत असताना काँग्रेस सदस्यांचा गोंधळ सुरूच होता. या गोंधळातच बिर्ला यांनी सभागृहाचे कामकाज अनिश्चितकाळासाठी स्थगित केले.

**◆ नवी दिल्ली, ४ एप्रिल**

वक्फ दुरुस्ती विधेयक सरकारने संसदेत मनमानी पद्धतीने पारित करून घेतले, या काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांनी केलेल्या आरोपावरून आज लोकसभेत गदारोळ झाला. यामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित करावे लागले.

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यातील कामकाजाचा आज शेवटचा दिवस होता. सोनिया गांधींच्या विधानावरून गदारोळ झाल्यामुळे सभागृहाचे कामकाज दुपारी १२ पर्यंत स्थगित करण्यात आले. कामकाज पुन्हा सुरू होताच सभापती ओम बिर्ला यांच्या अनुमतीने संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सोनिया गांधींच्या विधानाचा मुद्दा उपस्थित केला. त्यांचे विधान दुर्भाग्यपूर्ण आहे, त्यांच्या विधानाचा निषेध करायला पाहिजे, असे ते म्हणाले. या सभागृहाच्या ज्येष्ठ सदस्य राहिलेल्या, पण आता दुसऱ्या सभागृहाच्या सदस्य असलेल्या सोनिया गांधी यांनी संसदभवन परिसरात असे म्हटले की, सरकारने संसदेत मनमानी (बुलडोझ) पद्धतीने वक्फ दुरुस्ती विधेयक पारित करून घेतले. त्यामुळे यावर सभापतींनी आपला निर्णय द्यावा, असे रिजिजू यांनी म्हटले.

वक्फ दुरुस्ती विधेयकावर रात्री उशिरापर्यत सभागृहात सुरू असलेल्या चर्चेत भाग घेतल्याबद्दल मी सदस्यांचा आभारी आहे, मात्र, विधेयक पारित झाल्याबद्दल ज्येष्ठ सदस्याने ज्या भावना व्यक्त केल्या, त्या योग्य नाही, असे ते म्हणाले. वक्फ विधेयकावर सभागृहात १३ तास ५४ मिनिटे चर्चा झाली आणि हे विधेयक नियमानुसार पारित करण्यात आले. विधेयकावर सभागृहात तीन वेळा मतविभागणी घेण्यात आली, असे ओम बिर्ला यांनी म्हटले. ◂*(तभा वृत्तसेवा)*

## जलजीवन मिशन कामाच्या चौकशीसाठी सीईओंच्या कार्यालयासमोर उपोषण

**तभा, वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल,**

बार्शी तालुक्यातील बावी गावातील जलजीवन मिशन कामांची चौकशी करून कारवाई करण्याच्या मागणीसाठी बार्शी येथील शरद भालेकर यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या कार्यालयासमोर उपोषण सुरू केले होते. पोलिसांनी मध्यस्थी करून उपोषणकर्ता आणि सीईओ यांची भेट घालून दिली.

त्यावेळी उपोषणकर्ते भालेकर यांनी कार्यालयासमोरील उपोषण मागे घेतले. बावी गावात जलजीवन मिशनचे बोगस काम झाले आहे. त्या कामांची चौकशी करून कारवाई करावे, यासाठी राज्य पाणी पुरवठा विभागाचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र आले आहे. मात्र, जिल्हा परिषद प्रशासन ठेकेदारांवर कारवाई करण्यासाठी टाळाटाळ करीत असल्यामुळे गुरुवारीपासून जिल्हा परिषदेच्या पूनम गेटवर उपोषण सुरू केले आहे. उपोषणस्थळी जिल्हा परिषदेच्या अधिकार्यांनी भेट दिली नाही. त्यामुळे शुक्रवारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यालयासमोर उपोषणास बसल्याची माहिती उपोषणकर्ता भालेकर यांनी दिली आहे.बार्शी तालुक्यातील बावी गावात जलजीवन मिशनचे बोगस कामे झाल्याची तक्रारी प्राप्त झाली होती, त्या गावास दोन उप अभियंत्यांनी भेट देऊन कामांची चौकशी केली. त्यावेळी ८० टक्के कामे पूर्ण झाल्याचे दिसून आले. तसेच ही कामे उत्कृष्ट असल्याचे दिसून आले. त्यामुळे त्या तक्रारीमध्ये कोणत्याही प्रकारचे तथ्य नसल्याचा चौकशी अहवाल माढा आणि मोहोळ येथील उप अभियंतांनी दिल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पुरवठा विभागाने दिली आहे.

## अग्रलेख...

# हेच आहेत मुस्लिम समाजाचे खरे शत्रू

समाजाच्या आणि देशाच्या व्यापक हिताचे तसेच मुस्लिम समाजातील तळागाळातील वर्गाच्या कल्याणाचे प्रवेशद्वार असलेल्या वक्फ दुरुस्ती विधेयकाला संसदेच्या दोन्ही सभागृहांची मान्यता मिळाल्यामुळे त्याचे आता कायद्यात रूपांतर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. लोकसभेत हे विधेयक पारित होण्यात काहीच अडचण नव्हती. कारण सभागृहात भाजपाजवळ स्पष्ट बहुमत आहे, पण राज्यसभेत भाजपाजवळ स्पष्ट नाही तर काठावरचे बहुमत होते. त्यातच काही पक्षांनी ऐनवेळेवर विधेयकाला विरोध करण्याची भूमिका घेतल्यामुळे सरकार अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, भाजपातील तसेच मोदी सरकारमधील चाणक्यांनी या पेचप्रसंगातून यशस्वीपणे मार्ग काढला आणि कोणत्याही अडथळ्याशिवाय हे विधेयक पारित झाले. लोकसभेत विधेयकाच्या बाजूने २८८ तर विरोधात २३२ मते पडली. राज्यसभेत विधेयकाच्या समर्थनार्थ १२८ तर विरोधात ९५ मते पडली. एखाददुसरा अपवाद वगळता रालोआतील पक्षांनी विधेयकाच्या बाजूने तर इंडिया आघाडीतील पक्षांनी विरोधात मतदान केले. लोकसभेत २८८ सदस्यांनी विधेयकाच्या बाजूने मतदान केले असले, तरी २३२ जणांनी विरोधात मतदान केले, ही वस्तुस्थिती आहे. या २३२ सदस्यांनी असे करत वक्फ दुरुस्ती विधेयकाच्या विरोधात नाही तर व्यापक राष्ट्रहिताच्या विरोधात मतदान केले, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. राष्ट्रवादी मुस्लिमांचा या सदस्यांनी एकप्रकारे विश्वासघात केला, हे नाकारता येणार नाही. संसदेत या विधेयकाला कडाडून विरोध करीत काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी मुस्लिमांच्या लांगूलचालनासाठी आपण कुठल्याही थराला जाऊ शकतो; वेळप्रसंगी हिंदूंच्या पाठीत खंजीरही खूपसू शकतो, हे दाखवून दिले. या विधेयकावरून काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी मोठ्या प्रमाणात अपप्रचार केला तसेच मुस्लिम समाजाची दिशाभूल करण्याचाही प्रयत्न केला. वक्फ दुरुस्ती विधेयकाच्या माध्यमातून मुस्लिमांच्या धार्मिक व्यवहारात हस्तक्षेप करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचा तसेच मुस्लिम समाजाचे अधिकार हिरावणारे हे विधेयक असल्याचा धादांत खोटा आणि खोडसाळ प्रचार काँग्रेस आणि अन्य विरोधक करीत होते. मुस्लिम समाजाच्या धार्मिक व्यवहारात हस्तक्षेप करणारे हे विधेयक नाही तर संपत्तीच्या सुयोग्य व्यवस्थापनाचे विधेयक असल्याचा खुलासा सरकारने वेळोवेळी केला. यावर काँग्रेस आणि विरोधी पक्षांनी विश्वास ठेवला नसला, तरी सुदैवाने मुस्लिम समाजाने विश्वास ठेवला. झोपेत असलेल्याला उठवणे सोप असते, पण झोपेचे सोंग घेतलेल्यांना उठवणे कठीण असते, असे म्हटले जाते. काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांची अवस्था अशीच झाली आहे. काँग्रेसने आपल्या राजकीय स्वार्थासाठी मुस्लिम समाजाचा व्होट बँक म्हणून पुरेपूर उपयोग करून घेतला. असे करताना त्याने मुस्लिम समाजाच्या कल्याणासाठी तसेच विकासासाठी काहीच केले नाही. मुस्लिम लोकांना जाणीवपूर्वक देशात दुय्यम नागरिकत्व दिले. या देशात मुस्लिमांचे जेवढे नुकसान काँग्रेसने केले तेवढे दुसरे कोणीच केले नाही. तरी मुस्लिम समाजाचे डोळे उघडत नाही, याचे आश्चर्य वाटते. याचे कारण देशातील मुस्लिमांनी आतापर्यंत डोळे बंद करून काँग्रेसवर विश्वास ठेवला होता.

भाजपा मुस्लिम समाजाच्या विरोधात असल्याचा अपप्रचार काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्ष आधीपासूनच करीत होते. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशात भाजपाचे सरकार आल्यानंतर या अपप्रचाराला जोर आला. भाजपा मुस्लिम समाजाचा शत्रू नाही तर खरा मित्र आहे, हे भाजपाचे राधामोहनदास अग्रवाल यांनी राज्यसभेतील आपल्या भाषणातून स्पष्ट केले. मोदी सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचे सर्वांत जास्त लाभार्थी मुस्लिम बांधव असल्याचे त्यांनी पुराव्यानिशी दाखवून दिले. काँग्रेस आणि अन्य विरोधकांनी वक्फ दुरुस्ती विधेयकातील तरतुदी काळजीपूर्वक वाचल्या असत्या, थोडा अभ्यास केला असता, आपल्या डोळ्यावरील राजकीय हेतूचा चष्मा काढला असता तर या विधेयकाला विरोध करण्याची त्यांची हिंमतही झाली नसती. या विधेयकावर काँग्रेस, राजद, तृणमूल काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि आपसह अन्य पक्षांच्या नेत्यांनी केलेली भाषणे ऐकल्यावर तर माणसाने खोटे तरी किती बोलावे, असे वाटून गेले. या सर्व पक्षांच्या नेत्यांची भाषणे खोटे बोल पण रेटून बोल अशी होती. सर्वांत आश्चर्य वाटले शिवसेना उबाठाच्या भूमिकेचे. उबाठाच्या खासदारांनी या विधेयकाच्या विरोधात मतदान करीत आपल्या अकलेचे दिवाळे निघाल्याचे दाखवून दिले. आज बाळासाहेब ठाकरे जिवंत असते तर आपल्या दिवट्या चिरंजीवाचे राजकीय प्रताप पाहून त्यांनी आपले डोके पिटून घेतले असते. याचसाठी मी शिवसेना काढली का, असा प्रश्न त्यांना पडला असता. या विधेयकाला आमचा विरोध नव्हता, तर नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्या विरोधामुळे आम्ही विधेयकाला विरोध करण्याची भूमिका घेतल्याचा हास्यास्पद दावा उबाठाने केला आहे. असा दावा करीत मोदी आणि शाहांच्या द्वेषाने आपण आंधळे झाल्याचे त्यांनी दाखवून दिले. असे करीत आपल्या भूमिकेचे समर्थन उद्धव ठाकरे यांना करता येणार नाही. उद्धव ठाकरे स्वत:च्या नाही तर दुसऱ्याच्या म्हणजे स्वत:ला अतिशय शहाणे समजणाऱ्या, पण प्रत्यक्षात दीडशहाणे असलेल्या सोंगाड्याच्या ओंजळीने पाणी पितात, त्यामुळे त्यांची स्वत:ची आणि शिवसेनेची ही अवस्था झाली आहे. विशेष म्हणजे सकाळी उठल्याबरोबर भोंगा लावणाऱ्या सोंगाड्याने शिवसेना संपवण्याची सुपारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्याकडून घेतली आहे. स्वत:ला डोके नसले की असेच होत असते. उद्धव बाळासाहेब ठाकरे हिंदुत्वापासून दूर गेल्यामुळे तसेच बाळासाहेबांच्या मार्गावर चालण्यासाठी आपल्याला शिवसेना सोडावी लागली, असा जो दावा शिवसेनेचे एकनाथ शिंदे वारंवार करत आहेत, त्यांचा हा निर्णय योग्य असल्याची खात्री यातून पटते. उद्धव ठाकरे यांचे वर्णन आधुनिक काळातील जिना असे केले तर ते चुकीचे ठरणार नाही. मोदी आणि शाह यांच्या आंधळ्या द्वेषातून तसेच हिंदुत्वाच्या विरोधात घेतलेल्या भूमिकेमुळे उद्या उद्धव ठाकरे यांनी आपली आणि आपल्या आदुबाळाची सुंता करून घेतली तरी आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

संसदेच्या दोन्ही सभागृहांत मोदी सरकारला अपशकुन करण्यासाठी टपून बसलेल्या काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी आता तोंडावर पडल्यानंतर वक्फ दुरुस्ती विधेयकाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याचा इशारा दिला आहे. यासोबत काँग्रेसने देशातील मुस्लिमांना रस्त्यावर उतरण्यासाठी भडकावणे सुरू केले असे दिसते. अन्यथा शुक्रवारच्या नमाजानंतर देशाच्या काही भागात मुस्लिम समाज रस्त्यावर उतरला नसता. अजूनही वेळ गेली नाही. विधेयकात नेमके काय आहे, याबाबत काँग्रेस नेते जे सांगतात, त्यावर विश्वास न ठेवता मुस्लिम समाजातील विचारवंतांनी स्वत: या विधेयकाचा अभ्यास करावा आणि त्यानंतर आपले मत बनवावे. आज देशात रेल्वे आणि संरक्षण विभागानंतर सर्वांत जास्त जमीन वक्फ मंडळाकडे आहे. रेल्वे आणि संरक्षण विभागाजवळ असलेल्या जमिनी ही सरकारची म्हणजे पर्यायाने देशातील जनतेची संपत्ती आहे. पण वक्फ मंडळाकडे असलेल्या जमिनीची मालकी काही मूठभर लोकांकडे आहे, जिचा मुस्लिम समाजातील सर्वसामान्य गरीब लोकांना कोणताही फायदा होत नाही. वक्फच्या ताब्यात असलेल्या जमिनीचा मुस्लिम समाजातील गरीब वर्गाला फायदा व्हावा म्हणून तसेच या जमिनीवर नागासारखा फणा काढून बसलेल्या मूठभर लोकांच्या भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी सरकारने हे विधेयक आणले आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. तीन तलाकनंतर मोदी सरकारचा हा दुसरा मोठा ऐतिहासिक निर्णय म्हटला पाहिजे. तीन तलाक रद्द करण्याचा निर्णय जसा मुस्लिम समाजातील महिलांच्या व्यापक हिताचा होता, तसा वक्फ दुरुस्ती विधेयक मुस्लिम समाजातील शोषित, वंचित, पीडित वर्गासाठी आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. या मुद्यावरून राजकारण करणाऱ्यांना, मुस्लिम समाजाची दिशाभूल करणाऱ्यांना, त्यांना भडकवणाऱ्या काँग्रेस आणि अन्य विरोधकांना त्यांची जागा आणि लायकी नेहमीसाठी दाखवून देण्याची वेळ आली आहे. ▮

---

## यंगिस्तान

# हिंदुत्वाच्या मिशा कशा असतात?

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

सर्वप्रथम यंदाच्या लोकसभेच्या निवडणुकीत भाजपाला पूर्ण बहुमत मिळालेले नसतानाही वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक लोकसभेत मंजूर झाले याबद्दल सर्व भारतीयांचे अभिनंदन! पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांचा संघ (टीम) एक मिशन घेऊन चालत आहेत, हे स्पष्ट आहे. आपल्याला कोणत्याही नेत्याचे महानत्व मोजायचे असेल तर एक प्रश्न आपल्याला विचारता आला पाहिजे. ''जर अमुक अमुक नेता नसता तर काय झालं असतं?'' मोदींच्या राजकारणाचा आढावा घेताना मला हा प्रश्न नेहमीच पडतो की ''जर मोदी नसते तर काय झालं असतं?'' जर मोदी नसते तर सर्जिकल स्ट्राईक झालं नसतं. पाकिस्तानची दादागिरी सुरूच राहिली असती. जर मोदी नसते तर काश्मीरमधून ३७० हटवलं गेलं नसतं. हिंदूंचा बळी पडत राहिला असता. जर मोदी नसते तर तिहेरी तलाक कायदा आला नसता. मुस्लिम माता-भगिनींची किंकाळी कुणीच ऐकली नसती. जर मोदी नसते तर ठिकठिकाणी शौचालये बांधली गेली नसती. माता-भगिनींची समस्या कोणालाच कळली नसती. जर मोदी नसते तर अमेरिकेसारखा बलाढ्य देश आपला मित्र झाला नसता. अमेरिकेने नेहमीच आपल्यावर दादागिरी केली असती. जर मोदी नसते तर राम मंदिर निर्माण झालं नसतं. हिंदूंच्या आस्था पायदळी तुडवल्या गेल्या असत्या. जर मोदी नसते तर वक्फ बिल सुधारणा कायदा आलाच नसता. हिंदू आणि मुसलमान दोघांनाही फसवून वक्फने जमिनी घशात घातल्या असत्या. ही यादी मोठी आहे. मी फक्त वरवर दिसणारे मुद्दे इथे मांडलेत. अंतर्गत, सूक्ष्मात आणखी बदल घडलेले आहेत. नरेंद्र मोदी हे भारताला पडलेलं सुंदर स्वप्न आहे.

विशेष म्हणजे नरेंद्र मोदींची जडणघडण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून झालेली आहे. संघ स्वयंसेवक ते भाजपा कार्यकर्ते व पुढे मुख्यमंत्री आणि आता पंतप्रधान असा त्यांचा चित्तवेधक प्रवास आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही केवळ एक संघटना नसून तो एक विचार आहे. या विचारावर आणिबाणी लादली गेली, बंदी घालण्यात आली. मात्र फॅसिस्ट लोकांना संघाचा आवाज दाबता आला नाही. उलट हा आवाज आता गर्जना झालेली आहे. डॉ. हेडगेवार यांनी शंभर वर्षांपूर्वी हिंदुत्वाच्या विचारांचं बीजारोपण केलं. आता या विचारांचा वटवृक्ष झालेला आहे. नरेंद्र मोदी याच विचारप्रवाहातून निर्माण झालेले आहेत. २०२५ च्या विजयादशमीला संघ १०० वर्षांचा होणार आहे. संघाच्या हिंदुत्व या विचारासोबत संघाचं सेवाकार्यही महान आहे.



सर्व समाजाचा सर्वांगीण विकास हे संघाचं ध्येय आहे. मदतकार्य राबवताना संघ जात-धर्म बघत नाही. मोदींनी देखील आपलं राजकारण याच सूत्राने केलेलं आहे. हिंदुत्वाचा पाया भक्कम ठेवत सबका साथ सबका विकास ते साधत आहेत. या सर्व गोष्टींची आठवण होण्याचं कारण म्हणजे उबाठा गटाचे सकाळचे प्रवक्ते संजय राऊत यांनी ''भारतीय जनता पक्षाला आणि देवेंद्र फडणवीसांना मिशा फुटल्या नव्हत्या तेव्हापासून आम्ही हिंदुत्वाच्या मिशीला पीळ देत आहोत. त्यामुळे त्यांनी आम्हाला हिंदुत्व शिकवू नये.'' असं विधान केलं आहे. गंमत म्हणजे उबाठा गटाने वक्फ सुधारणा विधेयकाच्या विरुद्ध मतदान केले आहे. अरविंद सावंत तर हिरवे कपडे घालून आले होते. उबाठा गट इतका गोंधळलेला आहे की त्यांना या विधेयकाला विरोध करायचा की सहकार्य करायचं हेच कळत नव्हतं. उद्धव ठाकरेंची पत्रकार परिषद देखील गोंधळलेली होती. त्यांना नेमकं काय म्हणायचं होतं हेच कळत नव्हतं. ''आज वक्फ बोर्डावर नियंत्रण आणताय. ठीक आहे. त्याचं स्वागत पण ज्या पद्धतीने भाजपची पावलं पडताहेत... उद्या तुम्ही हिंदूंवर पण आणाल, आधीच देवस्थानांची जागा हडपली गेली आहे... हिंदुत्वाचे राखणदार आहात तर मुसलमानांची इतकी बाजू घेताहात... हिंदूंमध्ये गरीब नाही का.. मुस्लिम गरिबांना काय फायदा होणार आहे? तुम्ही मुसलमानांचे लांगूलचालन करत असताना आम्ही त्याला विरोध करत असू तर हिंदुत्व आम्ही सोडलं की तुम्ही? भाजपचे आभार मानेन... वक्फ बोर्डाचा विषय घेतला त्यामुळे भाजपचं खरं रूप काय हे कळालं.'' या सगळ्या बोलण्याला कोणताच आधार, आगा-पीछा नसल्यामुळे हे सबंध बोलणं वायफळ ठरलं आहे.

उद्धव ठाकरे आणि त्यांचा सबंध उबाठा गट इतका गोंधळलेला आहे की नेमकी भूमिका काय घ्यायची हे त्यांना कळत नाही. ज्याप्रमाणे अजय देवगण चित्रपटांत दोन बाईक्सवर पाय ठेवून हिरोगिरी दाखवतो त्याप्रमाणे हे दोन दगडांवर पाय ठेवून उभे आहेत. पण त्यांचा सारखा सारखा तोल जातोय. तरी आपण ठामपणे उभं असल्याचा अभिनय ते करत आहेत. गोंधळलेलं राजकारण, त्यात दिशा आणि सुशांतच्या प्रकरणात त्यांचा पाय खूप खोलात जात आहे. हायकमांडने नुसतं मनात आणलं तरी गंभीर परिणाम दिसू शकतात. एवढे असून देखील त्यांचा बाणा कमी झालेला नाही. एकनाथ शिंदेंसोबतच्या बैठकीत आदित्य ठाकरे उभे राहिले नाहीत आणि शिंदेंकडे ज्या पद्धतीत रोखून पाहत होते, त्याला काय म्हणायचं? राजकारण करताना डोक्यावर बर्फ ठेवायचा असतो. याची जाणीव या ठाकरे पिता-पुत्रांना कधीच झाली नाही. आज राजकीयदृष्ट्या त्यांची परिस्थिती फार चांगली नाही. पण तरीही त्यांना ही जाणीव होत नाही.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेबांची पुण्याई किती दिवस कामी येईल? त्यालाही मर्यादा आहेत ना! वर आपणच हिंदुत्ववादी असल्याचा आव आणत आहेत. म्हणूनच मी वर मोदी आणि संघाचं उदाहरण दिलं आहे. नितेश राणे यांनी त्यांच्या शैलीत राऊतांना उत्तर दिलेलं आहे. फडणवीसांनी तर ''कोण आहे राऊत?'' म्हणत त्यांना झटकून टाकलं. परंतु राऊत आपण खूप मोठे नेते आहोत अशा थाटात वावरत आहेत. त्यांची भाषा महाराष्ट्राच्या संस्कृतीला शोभणारी नाही. ते हिंदुत्वाच्या मिशांना पीळ देण्याच्या गोष्टी करतात. परंतु त्यांच्या मिशा कधी हिरव्या तर कधी पिंगळ्या भासतात, ज्यास ते भगवा म्हणतात. बोलाचा भात आणि बोलाची कढी हे हिंदुत्व नाही. हिंदुत्व कृतीत आहे. ती कृती मोदी करत आहेत. त्याची बीजे संघाने पेरलेली आहेत. ही प्रेरणा छत्रपतींकडून घेतलेली आहे. राऊतांना हिंदुत्वाच्या मिशा बघायच्याच असतील तर मोदींच्या मिशा बघता येतील. नागपुरातही त्यांना हिंदुत्वाच्या मिशा पाहता येतील. हे अगदीच शक्य नसेल तर हिंदुहृदयसम्राट बाळासाहेबांच्या मिशा पाहता येतील. हिंदुत्वाच्या मिशा अशा असतात मिस्टर राऊत. पराक्रमी, शूर, महिलांचा आदर करणाऱ्या, सभ्य आणि सज्जन! नव्हे बोलबच्चन! ▮

writerjayeshmestry@gmail.com

---

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# दयाभाव जागृत अभियान काळाची गरज!

माणसे जन्माला येतात, परंतु माणुसकी निर्माण करावी लागते. आज आपण कलियुगात वावरत आहोत. यामुळे प्रत्येकाकडून चांगल्या गोष्टींची अपेक्षा करणे व्यर्थ असल्याचा समज बहुतांश लोकांचा झाला आहे. ती बाब काही प्रमाणात सत्य असली तरी माझ्या मते प्रत्येकाच्या मनातील सुप्तावस्थेत दयाभाव असतो. निसर्गाने मानवी मेंदू तयार करताना त्यात दयाभाव अंतर्भूत केलेला आहे. फक्त त्या दयाभावाला जागृत करण्याची गरज असते. आता तीच गरज लक्षात घेता त्यानुसार दयाभाव जागृत अभियान देशपातळीवर सुरू करण्याची गरज आहे. 'चंद्र तिथे चंद्रिका, संत तिथे विवेका असणे किजे' त्यानुसार प्रत्येक माणसाकडून माणुसकी अपेक्षित मानली जाते. पण प्रत्यक्षात तसे चित्र दिसत नाही. याची अनेक कारणे असली तरी त्यावर उपाय योजण्याची गरज आहे. वस्तुत: माणूस असेल जिथे, माणुसकी असावी तिथे हा फॉर्म्युला प्रत्येकाच्या संदर्भात लागू पडायलाच हवा. नव्हे तशीच शिकवण, तसेच शिक्षण, तसेच वातावरण संपूर्ण देशात तयार व्हायला हवे. ज्याचा जन्म झाला, त्याचा मृत्यू अटळ आहे. मग जन्म आणि मृत्यूच्या मधल्या काळात माणूस म्हणून जन्माला आलेली व्यक्ती एवढी अहंकारी, क्रूर, दयाभाव न दाखविता का जगते, याचे उत्तर शोधावे लागेल किंवा साम, दाम, दंड आणि भेद वापरून दयाभाव मनामनावर बिंबवावा लागेल. अपघात झाल्यानंतर जखमींना सोडून पळणाऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. पैशासाठी भावाचा,पित्याचा खून करणाऱ्या घटनाही वाढल्या आहेत. गरज नसतानाही हिस्सा हवा म्हणून बहिणी थेट भावांच्या विरोधात कोर्टात जात आहेत. चिमुकल्या मुलीवर निस्सीम प्रेम करायचे सोडून तिच्यावर अत्याचार करणारेही वाढले आहेत. एखाद्याने आपले दु:ख सांगितले तर त्यावर मलम लावण्याऐवजी मीठ चोळणारेच वाढले आहेत. एवढी निष्ठुरता मानवात आलीच कशी? देवाने माणसाला तयार करताना असा विचारच केलेला नव्हता. तरीही माणसाने सरड्याप्रमाणे रंग बदलण्याचे कसब आत्मसात केले अन् सुरू झाला कलियुगातील दयाभाव संपविण्याचा प्रकार. सामान्य जीवन जगताना केवळ स्वत:चा विचार माणसाकरिता कर्दनकाळ ठरला आहे. आपल्यामुळे इतरांना त्रास होईल याचीही तमा बाळगली जात नाही. पूर्वी तहानेने व्याकुळ माणसाला पाणी पाजा अशी शिकवण दिली जायची. नव्हे आई वडील तशी कृती मुलामुलींकडून करून घ्यायचे. तसे पाहता परोपकार हाच आपल्या संस्कृतीचा मजबूत पाया मानला जातो. म्हणूनच आपण वसुधैव कुटुंबकम् ही संकल्पना जगाला दिली. हीच आपली संस्कृती आहे. भूक लागली असताना खाणे म्हणजे प्रकृती. भूक लागली नसताना खाणे म्हणजे विकृती. भूक लागली असताना दुसऱ्यांना देत खाणे म्हणजे संस्कृती होय. आता आपल्याला प्रकृती, विकृती आणि संस्कृती यातील भेद समजून संस्कृती जपावीच लागेल. एक सांगतो, रिकाम्या भांड्यावर झाकण आणि चुकीच्या विचारांची पाठराखण काही उपयोगाची नसते. दगड एकदाच मंदिरात जातो अन् भगवंत होतो. माणूस मात्र वारंवार मंदिरात जातो पण दगडच राहतो. आपल्याला पाषाणाप्रमाणे कठोर राहायचे की, सहृदयी होऊन पृथ्वीवरील आपल्या जन्माचे सार्थक लावायचे याचा विचार आजच करावा लागेल. अहो, या जगात

''बेईमानी से पैसे कमाने वाले भी, इमानदार चौकीदार ढूंढते है।'' याचा अर्थ सर्वांनाच प्रामाणिकपणा, दयाभाव हवा आहे. पण तो स्वत:पासून सुरू करावा हे धारिष्ट्य करण्याचे सामर्थ्य १०० पैकी ९९ लोकांजवळ नाही. हेच धारिष्ट्य करणाऱ्यांची संख्या वाढावी याकरिता दयाभाव जागृत अभियान घराघरात सुरू व्हायला हवा. याकरिता लहान मुलांना नर्सरीपासून दयाभाव कसा लाभदायक असतो, हे पटवून द्यावे लागेल. शेवटी, नका देवाते विसरू, नका देशाते विसरू । कष्ट सोसा देशासाठी, काही जोडा पुण्यगाठी।। हे सेनापती बापट यांचे वाक्यही मुलांच्या मनात रुजवावे लागेल. ओल्या मातीला सहजतेने आकार देता येतो, अगदी तोच मूलमंत्र जपत मुला-मुलींना गर्भसंस्कारापासून दयाभाव सांगावा लागेल. कोरोना काळात गरजवंत देशांना मोफत लस वाटून भारत सरकारचा दयाभाव जगाने अनुभवला. परिणामी 'बलसागर भारत होवो, विश्वात शोभूनी राहो' याचीही प्रचीती आता हळूहळू भारतीयांना येऊ लागली आहे. हा सर्व चमत्कार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दाखविलेल्या दयाभाव वृत्तीमुळे घडला, हे नाकारता येणार आहे का? मग हीच दयाभावाची वृत्ती वृद्धिंगत करण्यासाठी भेद सारे मावळू द्या, वैर साऱ्या भावना । मानवाच्या एकतेची पूर्ण होवो कल्पना।। मुक्त आम्ही फक्त मानू बंधतेच्या बंधना।। सत्य-सुंदर-मंगलाची नित्य ही आराधना।। ▮

९८८१७१७८५९

---

## मुंबई वार्तापत्र

# ताकाला जाऊन भांडं कशाला लपवता?

**नागेश दाचेवार**

भाजपा मुस्लिमांचे लांगूलचालन करत आहे. हे वक्फ बिलावरून स्पष्ट झाले आहे. बिलात काही चांगल्या गोष्टी आहेत. त्यामुळे आमचा बिलाला विरोध नाही. तर, भाजपाच्या ढोंगाला आमचा विरोध असल्याची भूमिका उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरेंनी विशेष पत्रकार परिषद घेऊन स्पष्ट केली. अर्थात त्यांना ती करावी लागली, त्यांचा नाईलाज होता. ठाकरेंनी केलेला हा प्रकार म्हणजे शुद्ध सोयीस्कर अशी पळवाट असल्याचे अबोध बालकदेखील सांगेल. धरले की चावते आणि सोडले की पळते, अशा अवस्थेतून जाण्यापेक्षा ठाकरेंनी जर मुस्लिमांची साथ घेतली आणि बाजू घेतलीच आहेत तर, ती छातीठोकपणे, उघडपणे घ्यावी ना... 'ताकाला जाऊन भांडं कशाला लपवायचं?'

खुर्चीच्या मोहापोटी भाजपासोबतची युती तोडली. याबद्दल सामान्य मराठी माणूस, हिंदू समाजाची तुमच्याबद्दल कधीही फार अशी विशेष तक्रार नव्हती. तुम्ही मुंबई महापालिकेत ३० वर्षे राज्य करून मुंबई लुटली, स्वत:ची दोन आलिशान घरं बांधली, विदेशात आणखी काय काय केले तो भाग सोडाच, मात्र, मराठी माणसाला मुंबई बाहेर हुसकावून लावलं. पण सामान्य मराठी माणूस, मुंबईकर किंवा हिंदू समाजाने कधीही आक्षेप तुमच्यावर घेतल्याचे ऐकिवात नाही. कदाचित यामुळेच की काय तुमची हिंमत वाढली असावी. मग तुमची मजल एका उच्चशिक्षित डॉक्टर महिलेला, प्रसिद्ध अभिनेत्रीला, विद्यमान महिला खासदाराला अश्लील शिवीगाळ करण्यापर्यंत गेली. कोणीतरी समाज माध्यमावर व्यक्त झालं, कोणाची तरी पोस्ट कोणीतरी शेअर केली म्हणून, मग ती महिला, पुरुष, मराठी माणूस, नेव्ही ऑफिसर, मराठी अभिनेत्री, मराठी विद्यार्थी, मराठी पत्रकार कोणीही असू द्यात, अशा कोणाचीही हयगय न करता, कोणाला तुरुंगात डांबले तर, कोणाला भर रस्त्यावर मारहाण करण्यात आली आणि एकाला तर, थेट मंत्र्यांच्या बंगल्यावर नेऊन बेदम मारहाण करण्यात आली.

आम्ही हिंदुत्व सोडलं नाही म्हणाऱ्यांच्या सत्ताकाळात हनुमान चालिसा म्हणतो म्हणणाऱ्यांना अडविण्यात आले. नव्हे तर, थेट देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून तुरुंगात डांबण्यात आले. 'सर तन से जुदा'चा नारा देत एका विशिष्ट समुदायाने अत्यंत क्रूरपणे हत्या केल्या, त्याला पोलिसांवर दबाव टाकून, दरोड्याचा मुलामा चढवत हिंदूवर होत असलेल्या धार्मिक अत्याचाराच्या घटनेला दाबण्याचा प्रयत्न केला. कोट्यवधीची




खंडणी गोळा करून घर भरणाऱ्या पोलिसाने एका निरपराध व्यक्तीची हत्या करूनदेखील त्याला पाठीशी घालण्याचे काम यांच्या सत्ताकाळात झाले. साधुसंतांच्या हत्या होऊ लागल्या आणि त्यावर पांघरूण घालण्याचं पाप देखील हिंदुत्व न सोडलेल्या ठाकरेंच्याच काळात झाले. मतांसाठी मुस्लिमांचे लांगूलचालन करणं, लाचारी पत्करणं कमी पडले म्हणून की काय? निवडणुकांमध्ये ठाकरेंच्या उमेदवाराच्या प्रचार रॅलीमध्ये पाकिस्तानी झेंडे फडकविण्यात आले, मुंबईकरांच्या रक्ताने हात माखले असणाऱ्या साखळी बॉम्बस्फोटाचा आरोपी यांच्या उमेदवाराच्या प्रचार रॅलीत मते मागताना दिसला. तेव्हा मात्र, उद्धवसाहेब तुमची नियत आणि नीती दोन्ही उघडे पडले. जय श्रीरामच्या उच्चाराला हरामखोरपणा म्हणणे, जय श्रीराम म्हणणे म्हणजे उन्माद करणे असे म्हणण्यापर्यंत उद्धवसाहेब तुमची मजल गेली. अशा घटना घडत गेल्यामुळे आता खऱ्या अर्थाने महिला, मराठी आणि हिंदू समाजाचे डोळे उघडले आहे. त्यामुळे कोण ढोंगी आणि कोण सोंगी हे तुम्ही सांगण्याच्या भानगडीत न पडलेलंच बरं, उद्धवसाहेब.

मी हिंदुत्व सोडल्याचं एक उदाहरण मला दाखवून द्या. मी घरी जाऊन बसेन. पुन्हा कधी तुम्हाला तोंड दाखवणार नाही. असं, एका जाहीर सभेत मोठ्या आवेशात उद्धवसाहेबांनी आव्हान दिलं होतं. यावेळी दिलेली वरील सगळी उदाहरणं बघता, ठाकरेंना खरंच तोंड दाखवायला जागा नाही, हे सिद्ध होते. मात्र, काय करणार, शब्द देऊन न पाळणं, वचनं मोडणं हा मूळ स्वभाव असलेले साहेब पुन्हा पुन्हा तोंड दाखवतच आहेत. आणि एवढ्यावर थांबलेत का साहेब? तर, वक्फ विधेयकाच्या विरोधात मतदान करून, स्वतः मुस्लिमांचे लांगूलचालन करून, उलट भाजपावर आरोप करताना दिसत आहेत. इतका निर्लज्जपणा नेमका आणतात कुठून हे लोक याचं आश्चर्य वाटते.

हिंदू-मुस्लिम वाद निर्माण करून ध्रुवीकरणाचे राजकारण करत असल्याचा आरोप उबाठा गटाकडून भाजपावर केला जातो. भाजपा हिंदुत्ववादी राजकरण करत मुस्लिमांवर अन्याय करत असल्याचा आरोप साहेब करतात. दुसरीकडे वक्फ विधेयक आणून भाजपा मुस्लिमांचे लांगूलचालन करीत असल्याचा आरोपदेखील साहेब करीत आहेत. 'अरे कहना क्या चाहते हो' वाला किस्सा इथे निर्माण झाला आहे. वक्फ विधेयक जर खरंच लांगूलचालनासाठी मुस्लिमांच्या हिताचे असेल तर, मग तुम्ही त्याचं समर्थन का केलं नाही? तुम्ही मुस्लिम विरोधी आहात का? आणि हे विधेयक मुस्लिमांशी संबंधित आहे हे स्पष्ट असताना, हिंदूंचा दूरान्वयानेही संबंध नसताना, ''या विधेयकाचा आणि हिंदुत्वाचा काहीच संबंध नाही.'' असे विधान करण्यामागे आपला काय हेतू होता उद्धवसाहेब? तुम्हाला बोलयाचेच होते तर, मुस्लिम समाज आणि वक्फ विधेयकावर बोलले असते. पण त्यात हिंदूंचा संबधंच नाही, मुस्लिमांचं लांगूलचालन केलं आहे. त्यामुळे आता हिंदूंचे डोळे उघडले आहेत. हिंदू आता जागा झाला आहे. त्यामुळे आता उद्या कुठे जरी निवडणूक झाली तरी भाजपला जडच जाईल, हे विधान कोणी केलं? वक्फ बिल आणि हिंदूंचा संबंध, हिंदू जागा होणं, डोळे उघडणं ही सगळी विधाने उद्धव ठाकरेंसाहेब आपण काय सामाजिक सलोखा जोपासण्यासाठी केलेत? चार पत्रकारांसमोर डिंगा हाकल्यानं सत्य लपत नसते. जनता दुधखुळी नाही. तुम्ही जर मुस्लिमांची साथ देण्याचा आणि घेण्याचा निर्णय घेतला असाल तर, छातीठोक उघडपणे बोला. भाजपाच्या नावाने शिमगा करून तुमचा फायदा होईल अशी परिस्थिती आता राहिली नाही. कारण तुमचं ढोंगी हिंदुत्व आणि धर्मनिरपेक्षता दोन्हीचं पितळ उघडं पडलं आहे. ''ताकाला जाऊन भांडं लपवलं'' आणि ''डोळे मिटून दूध पिलं...'' काहीही केलंत तरी, ''जो बूंद से गई वो हौद से नहीं आती'', हेच वास्तव आहे. ▮

९२७०३३३८८६

---

## रामराज्य आणि हिंदुराष्ट्र

श्रीराम हा शब्द भारतीयांच्या जवळचा शब्द, अनेकांचे जीवन या एका नामाने घडवले. त्याचे राज्य म्हणजे 'रामराज्य', ते आजही 'परिपूर्ण आदर्श राज्य' मानले जाते. जेथे 'एकमेकां साहाय्य करू' अशा व्यवहाराचे सर्वच्या सर्व लोक असतात, जिथे प्रत्येकजण कर्तव्यपालन म्हणजेच धर्मपालन समजतो. जसे की वृद्ध माता पित्याची प्रेमाने काळजी घेणे म्हणजे पुत्र धर्माचे पालन, असे दैनंदिन जीवनात विविध प्रकारचे धर्मपालन आपण करीत असतो. अशी आपापली कर्तव्ये चोख पार पाडणारी जनता जिथे असते त्याला 'रामराज्य' म्हणतात. प्रभू श्रीराम मर्यादा पुरुषोत्तम होते.



प्रजा म्हणजे केवळ मनुष्य नाही, तर त्यात पशू, पक्षी, जीव, जंतू, वृक्ष, भूमी, वनसंपदा आणि भूमी यांचा समावेश आहे अन् या प्रजेचे दायित्व घेऊन रक्षण करणे, संवर्धन करणे आणि त्याची देखभाल करणे, हे राजाचे कर्तव्य आहे. हे करत असताना राजा त्याचे हित पाहात नाही. जो राजा स्वहितापेक्षा त्याचा राजधर्म कशात आहे आणि त्याला काय करायचे आहे, एवढेच पाहतो, जो स्वतः धर्माचरण करतो आणि इतरांकडून करवून घेतो तोच आदर्श राजा, जसे प्रभू श्रीराम. स्वातंत्र्य नंतरच्या काळात भारतात पाश्चात्त्यांचे अंधानुकरण करणे वाढत गेले. तसेच हिंदूंना धर्माचे शिक्षण न मिळाल्यामुळे ते धर्माचरणापासून दूर गेले. याचे परिणाम म्हणजे नैतिक अध:पतन होत गेले. यामुळे आज आपल्या राष्ट्रासमोर अनेक आव्हाने, समस्या आहेत. या सर्वांवर एकमेव उपाय आणि तो म्हणजे धर्माधिष्ठित राज्य म्हणजे रामराज्य होय! अखिल मानवजातीच्या हितासाठी हिंदू धर्माधिष्ठित राज्यप्रणालीच हवी!

**वर्षा आवदे**/नागपूर

●● ●●

## बाप रे! अल्पसंख्यकांचा एवढा पुळका?

नुकतीच संसदेच्या दोन्ही सभागृहांत वक्फ बोर्ड विधेयकावर वादळी चर्चा झाली. संख्याबळ तसे तर रालोआ व भाजपा सरकारजवळ सहज होते. कोणतीही चर्चा न करता ते विधेयक सरळ राष्ट्रपतींकडे जाऊ शकले असते. परंतु सुरुवातीला जेपीसीकडे सोपवून प्रत्येक पक्षातील विचारवंत त्यात घेतले. देशभरातील सुमारे एक कोटीच्या वरील लोकांकडून अभिप्राय मागवला.

मुस्लिम धर्मगुरू, नेते, जनता यांच्याशी संवाद साधला तेव्हा कुठे समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी याचा अहवाल केंद्राकडे सोपवला. इतके सगळे झाल्यावर शेवटी चर्चा आठ तास नको बारा तास हवी असे विरोधकांनी म्हटले व ते आपोआपच मान्यही झाले. एरव्ही 'आम्हाला बोलू देत नाही' अशी ओरड करणारे काँग्रेसचे युवराज राहुलबाबा यांना तर छान संधी होती बोलण्याची कारण विरोधी पक्षनेता आहेत म्हणून. पण अभ्यासच नसल्यामुळे हा विषय मग दुसऱ्या वक्त्याकडे सोपविण्यात आला.

राहुल फक्त 'चीनने आमचा भूभाग बळकावला व हे संविधानाचे पुस्तक' बस्स इतकेच बोलू शकतात हे दिसून आले. आता विरोधी पक्ष तो विरोधीच. त्यांच्याकडून दुसरी अपेक्षाच काय करणार? परंतु वक्फ कायदा अस्तित्वात आल्यापासून अनेकदा त्यात बदल होत गेले व ते सुद्धा काँग्रेसच्या काळात. आज पंचेवीस कोटींच्या घरात हे 'अल्पसंख्यक?' आहेत. मग जैन, पारसी, बौद्ध, ख्रिश्चन यांना बहुसंख्यक म्हणावे का? चर्चेच्या निमित्ताने का होईना विरोधी पक्षनेत्यांचे व्यक्तिगत मतही लोकांना कळून गेले. लालूप्रसाद, मुलायमसिंह पुत्र अखिलेश यादव, ममता बॅनर्जी, बरे यांचे तर जाऊ द्या पण आपले उद्धवरावांचे प्रवक्ता संजय राऊत यांचे भाषण खुमासदार झाले. असदुद्दीन ओवैसी यांच्याबद्दल काय बोलावे ? अजूनही ते पूर्णपणे अल्पसंख्यक नेता झालेच नाही. तेव्हा आपण आपला गड मजबूत केला पाहिजे व फाळणीच्या चुकांना वारंवार आठवत या लोकांना वेळोवेळी धडा शिकवला पाहिजे.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

●● ●●

## विकृत विनोदांवर नियंत्रण हवे!

विनोदाशिवाय जीवनाची कल्पना करणे अशक्य आहे. विनोद म्हणजे जीवनाची ऊर्जा! विनोदामुळे मन हलके होते आणि मनावरील तणाव दूर होतो. विनोदी लेखक पु. ल. देशपांडे, आचार्य प्र. के. अत्रे यांच्या विनोदी लेखनाचा आनंद तर बहुतेकांनी घेतलाच आहे. प्रसिद्ध वात्रटिकाकार रामदास फुटाणे यांच्या चारोळ्यांनी निखळ मनोरंजन व्हायचे. मात्र, आज मनोरंजनाच्या नावाखाली अश्लील विनोद करणे रूढ होत आहे. 'स्टॅण्डअप कॉमेडियन' नावाचे विनोदाचे नवीन फॅड आज सर्वत्र पसरले आहे. त्यातील विनोद अत्यंत खालच्या स्तराचे असतात.

नुकत्याच एका कार्यक्रमात रणवीर अलाहाबादिया याने आई-वडिलांविषयी अश्लील विनोद केले होते. अगदी ताजे उदाहरण बघायचे झाले तर स्टॅण्डअप कॉमेडियन कुणाल कामराने केलेल्या अवमानकारक कवितेचा विषय काही दिवसांपासून गाजत आहे. त्याने तर थेट महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाच लक्ष्य केले आहे. अपमान करणारे विनोद, अश्लील विनोद यावर नियंत्रण ठेवणार कोण? की अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली असेच सुरू राहणार? असा प्रश्न मनात येतो. ▮

**डॉ. स्वाती देशमुख**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## क्राईम वृत्त...

### आजीला मारहाण करणाऱ्या नातवाविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

आजीला मारहाण करणाऱ्या नातवाला अडविणाऱ्यास चाकूने मारहाण करणाऱ्याविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अरूण पोशाल मंदेलू (वय २९, रा. बुधवार पेठ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अभिषेक उर्फ गोट्या वैद्य (रा. बाळीवेस) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३ एप्रिल रोजी बाळीवेस येथील सुलभ शौचालय येथे अरूण मंदेलू हे काम करीत असताना खटके आजी हे त्यांच्याकडे पळत आल्या. मला वाचवा माझा नातू अभिषेक वैद्य हा मला मारत आहे असे मंदेलू यास सांगू लागल्या. त्यामुळे मंदेलू याने अभिषेक यास तु तुझ्या आजीला का मारतो असे म्हणून त्यास समजावून सांगत असताना तु कोण मला सांगणारा, तुझा काय संबंध, आम्ही काहीही करू, तु मध्ये पडू नकोस असे म्हणून अभिषेक याने घराबाहेर पडलेल्या सामानातील चाकू घेऊन येऊन मंदेलू याच्या कपाळावर, कानावर, डाव्या हातावर वार करून जखमी केले. सहायक फौजदार शेख पुढील तपास करीत आहेत.

### बालिकेवर दुष्कर्म केल्याप्रकरणी युवकास उच्च न्यायालयातून जामीन

**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

बालिकेवर दुष्कर्म केल्याप्रकरणी अटकेत असलेला योगीराज राजकुमार वाघमारे (वय २५, रा. कुरुल, ता. मोहोळ) यास मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एन आर बोरकर यांनी जामीन मंजूर केला. यातील पीडितेची व आरोपीची २०२२ पासून इंस्टाग्राम वरती मैत्री होती. आरोपी वाघमारे याने पिडीतेला १४ डिसेंबर २०२२ रोजी मेसेज व चॅटिंग करून फूस लावून तिस पंढरपूर येथे बोलावून घेतले. त्यानंतर तिस कोल्हापूर येथे घेऊन जाऊन तीच्यावर दुष्कर्म केले, अशा आशयाची फिर्याद पीडितेच्या आईने पंढरपूर पोलीस ठाण्यात दिली होती, त्यावरून आरोपीस अटक झाली होती. या गुन्ह्यात जामीन मिळावा म्हणून आरोपी योगीराज याने पंढरपूर सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता, तो अर्ज न्यायालयाने फेटाळला होता. त्यावर आरोपीने मुंबई उच्च न्यायालयात जामीन मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता. त्यावर सुनावणी होऊन आरोपींच्या वकिलांचा युक्तीवाद ग्राह्य धरून न्यायमूर्तींनी २५ हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर आरोपीस जामीन मंजूर केला. यात सरकारतर्फे ॲड. सी. डी. माळी यांनी तर आरोपीतर्फे ॲड. रितेश थोबडे यांनी काम पाहिले.

# पोलीस ठाण्याच्या आवारात आत्महत्येचा प्रयत्न

### सदर बझार पोलीस ठाण्यातील प्रकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

पोलिसात खोटी तक्रार केल्याच्या संतापातून पोलीस ठाणे गाठून आवारातच विषारी द्रव्य प्राशन करून एकाने आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार शुक्रवारी सकाळी १०.१५ वाजता सदर बझार पोलीस ठाण्याच्या आवारात घडल्याने खळबळ उडाली आहे.

या रुग्णावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

दत्तात्रय सुरेश कट्टीमणी (वय ४५, रा. होटगी रोड) असे आत्महत्येचा प्रयत्न करणा-याचे नाव आहे. दत्तात्रय हा सोलापूर अग्निशमन दलात चालक म्हणून कामास आहे. त्याने येथेच चालक म्हणून काम करणारा शकिल होटगीकर याच्याकडून तीन लाख रुपये घेतले होते. काही महिन्यात यातील दोन लाख परत केल्याचे कट्टीमणी याच्या लोकांचे म्हणणे आहे. दरम्यान दोन दिवसांपूर्वी महावीर चौकात दत्तात्रय कट्टीमणी याने पैशाच्या कारणावरून मारहाण केल्याबाबत शकिल याने सिव्हील पोलीस चौकीत तक्रार दिली होती. यानंतर कट्टीमणी याने त्याच्या विरूध्द पोलिसात शकिलने खोटी तक्रार दिल्याच्या कारणावरून शुक्रवारी सदर बझार पोलीस ठाण्याच्या आवारात थंडेपेयाच्या बाटलीत मिसळलेले उंदीर मारण्याचे औषध प्राशन केले. हा प्रकार लक्षात येताच सदर बझार पोलिसांची पळावळ झाली. अत्यवस्थ कट्टीमणी यास पत्नी रुक्मिणी यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. या घटनेनंतर पोलीस निरीक्षक अजित लकडे यांनी रुग्णालयात जाऊन रुग्णाची माहिती घेतली. त्याची प्रकृती स्थिर असल्याचे त्यांनी सांगितले.

दत्तात्रय कट्टीमणी आणि शकिल होटगीकर हे दोघेही अग्निशामक दलात चालक म्हणून अनेक वर्ष काम करतात. त्याची एकमेकांची चांगली ओळख आहे. त्यांच्यात पैशाच्या व्यवहारातून बिनसले असल्याने एकमेकांना मारहाण केल्याबाबत पोलिसात तक्रार दाखल केल्या आहेत. त्यातूनच आत्महत्येचा प्रयत्न झाला. तीन लाख रुपये चालक शकिल याने कट्टीमणीला दिले. त्यातील दोन लाख रुपये परत केल्याचा कट्टीमणीचा दावा आहे. उर्वरित एक लाखासाठी शकिल याने कट्टीमणीकडे तगादा लावला आहे. यातूनचे हे प्रकरण हातघाईवर आले असून हे पैसे व्याजाने दिले की हातउसने याबाबतचा खुलासा पोलीस तपासात होईल.


**CHANGE IN NAME**

I Hereby Declare that My Old Name **Shamshadabi Bandu Nadaf** has been changed to **Shamshadbi Dawal Nadaf**

**Kindly Note the same**

**Affidavit No. 13428 Dtd.03.04.2025**



**बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra**
**प्रधान कार्यालय/ Head Office**
**लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5**

**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**

आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट - भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
Zonal Office, garwal Palace, First Floor, D Mart-Bharati Vidyapith Road, Opp. Patanjali Mall, Jule Solapur, Solapur - 413004.
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail : staff_sol@mahabank.co.in

**नियम - 8 (1)**
**ताबा सूचना**

जेथे,

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल, 2002 च्या कलम 13 च्या उपकलम (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीकार यांनी 04.01.2025 रोजी डिमांड नोटिस जारी केल्या आहेत ज्यामध्ये खालील कर्जदारांना आणि हमीदारांना सूचना मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकी परत करण्याचे आवाहन केले आहे.

कर्जदाराने रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यास, कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की खाली स्वाक्षरी करणाऱ्याने सुरक्षा हित अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 सह वाचलेल्या कायद्याच्या कलम 13 च्या उपकलम (4) अंतर्गत, त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा 13/03/2025 रोजी घेतला आहे.

विशेषतः कर्जदारांना आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी संबंधित कोणत्याही व्यवहारावर वर उल्लेख केलेल्या रकमेचा आकार बँक ऑफ महाराष्ट्रकडून आकारला जाईल.

कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे आमंत्रित केले आहे, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी.

| अ.क्र. | शाखेचे नाव, कर्जदार आणि जामीनदार | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | मागणी सुचनेची तारीख आणि एकूण देणी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- वळसंग**<br>**कर्जदार:- श्री. अयुब इस्माईल अत्तार**<br>निवासी पोस्ट वळसंग, तालुका दक्षिण सोलापूर, जिल्हा सोलापूर-413228.<br>**सह-कर्जदार:-**<br>**श्री. मोहम्मद इसाक अयुब अत्तार**<br>निवासी पोस्ट वळसंग, तालुका दक्षिण सोलापूर, जिल्हा सोलापूर- 413228. | **श्री. अयुब इस्माईल अत्तार** यांच्या नावावर मालमत्तेचे गहाण.<br>प्लॉट क्रमांक 67, गट नं. 513/बी, 180.00 चौरस मीटर, वळसंग, तालुका दक्षिण सोलापूर, जिल्हा सोलापूर येथील मालमत्तेचे समतुल्य गहाण.<br>**सीमा खालीलप्रमाणे: -**<br>पूर्व : 9 मीटर रस्ता<br>पश्चिम : प्लॉट क्रमांक 82<br>दक्षिण : 9 मीटर रस्ता<br>उत्तर : प्लॉट क्रमांक 68 | **मागणी सूचना:**<br>दिनांक 4/01/2025<br>रु.42,17,542.00/- (बेचाळीस लाख सतरा हजार पाचशे बेचाळीस रुपये) अधिक कर्जाची वसुली होईपर्यंत 04/01/2025 पासून लागू न केलेले व्याज<br>**सांकेतिक ताबा तारीख**<br>**13/03/2025** |
| 2 | **कर्जदार:-**<br>१. मेसर्स झीनत ट्रेडर्स<br>प्रोपा : श्री. अयुब इस्माईल अत्तार<br>व्यवसाय पत्ता: मु. पो. वळसंग, तालुका दक्षिण सोलापूर, जिल्हा सोलापूर- 413228.<br>२. श्री. अयुब इस्माईल अत्तार<br>निवासी पत्ता: मु. पो. वळसंग, तालुका दक्षिण सोलापूर, जिल्हा सोलापूर- 413228. | 1. **श्री. अयुब इस्माईल अत्तार** यांच्या नावावर मालमत्तेचे गहाण.<br>प्लॉट क्रमांक 7, एकूण 73.31 चौ. मीटर, गट नं. 4/2/1, वळसंग, तालुका दक्षिण सोलापूर, जिल्हा सोलापूर स्थित असलेल्या मालमत्तेचे साधे गहाण.<br>**सीमा खालीलप्रमाणे आहेत: -**<br>पूर्व : प्लॉट क्रमांक 10<br>पश्चिम : 6 मीटर अंतर्गत रस्ता<br>दक्षिण : प्लॉट क्रमांक 8<br>उत्तर : प्लॉट क्रमांक 6<br>2. येथे असलेल्या मालमत्तेचे साधे गहाण प्लॉट क्रमांक 8, एकूण 73.82 चौ.मी., गट नं. 4/2/1 वळसंग, तालुका दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथे स्थित आहे.<br>**सीमा खालीलप्रमाणे आहेत: -**<br>पूर्व : प्लॉट क्रमांक 09<br>पश्चिम : 6 मीटर अंतर्गत रस्ता<br>दक्षिण : 9 मीटर अंतर्गत रस्ता<br>उत्तर : प्लॉट क्रमांक 7<br>3. स्टॉक आणि प्राप्तींचे हायपोथेकेशन मेसर्स झीनत ट्रेडर्स दुकान वळसंग, तालुका दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर-413228 येथे स्थित आहे. | **मागणी सूचना:**<br>दिनांक 4.01.2025<br>रु.26,13,850.00/- (सव्वीस लाख तेरा हजार आठशे पन्नास रुपये) अधिक लागू न केलेले व्याज 04/01/2025 पासून कर्जाची वसुली होईपर्यंत.<br>**सांकेतिक ताबा तारीख**<br>**13/03/2025** |

ठिकाण - सोलापूर
दिनांक - 13/03/2025

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि
अधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.



**जाहीर प्रसिध्दीकरण**

दिवाणी किरकोळ अर्ज नं.१७/२०२५
निशाण नं. ७

**अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो, कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

१) **श्रीमती पार्वती रायप्पा बिराजदार,** वय- ६० वर्षे, व्यवसाय -घरकाम, रा. बिंजनेर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
२) **उमेश रायप्पा बिराजदार,** वय- ४० वर्षे, व्यवसाय - शेती, रा. बिंजगेर, ता. अक्कलकोट
३) **श्री. सिध्दाराम रायप्पा बिराजदार,** वय- ३५ वर्षे, व्यवसाय - शेती, रा.बिंजगेर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
४) **सौ. महादेवी शाम सुरवसे,** वय- ३८ वर्षे, व्यवसाय - घरकाम, रा. मल्लिकार्जुन नगर, जुना डाक बंगल्याजवळ, अक्कलकोट
— **अर्जदार**

**विरुध्द**
**कोणीही नाही** - **सामनेवाला**

ज्या अर्थी, अर्जदारांनी या न्यायालयात मयत रायप्पा शंकर बिराजदार रा. बिंजगेर, ता. अक्कलकोट याचे नावे सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा अक्कलकोट यांचेकडे जमा असलेची मुदतठेवीची रक्कम रुपये दहा हजार व सेफ हॉल्ट (लॉकर) यास वारसदार म्हणून नाव नोंदणेबाबत वारसाप्रमाणपत्र मिळणेकरिता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जात नमूद अर्जदार हे मयत रायप्पा शंकर बिराजदार याचे वारस आहेत अगर कसे याबाबत कोणाचे काही हरकत वा आक्षेय असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा नेमली दि. ०६/०५/२०२५ रोजी मध्यान ११.०० वाजता जातीने किंवा आपला प्रतिनिधी अगर वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होऊन लेखी हरकत दाखल करावी अन्यथा कोणाचेही हरकत नाही असे समजून अर्जदाराच्या मागणीपमाणे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे जाहीर प्रसिध्दीकरण आज रोजी मे. कोर्टाच्या सही शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे तारीख ४/०४/२०२५

**सही/-**
**लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, अक्कलकोट**



**जाहिर प्रकटीकरण**

दि. कि. अर्ज नं.४९/२०२५
पु. ने. दि.६/५/२००२५ निशाण नं. ६

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु, डि. सो. यांचे कोर्टात..**
**(मे. एच.यू.यू. पाटील कोर्ट)**

१) **अविष्कार अविनाश काळे,** वय-३२ वर्षे, धंदा-व्यापार, रा. ८४५, उपळाई रोड, क्रांतीसिंह नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **अविनाश गणपत काळे,** वय-६५ वर्षे, धंदा- शेती, रा. ८४५, उपळाई रोड, क्रांतीसिंह नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
— **अर्जदार**

**विरुध्द**
**कोणीही नाही** - **सा.वाला**

ज्याअर्थी सदर प्रकरणातील अर्जदार हे वर नमूद ठिकाणी कायमस्वरुपी राहण्यास असून यातील अर्जदार नं. १ हा अर्जदार नं. २ चा मुलगा आहे. यातील मयत रंजना अविनाश काळे ही यातील अर्जदार नं. १ यांची आई व अर्जदार नं. २ ची पत्नी असून अर्जदार व मयत रंजना हे सर्वजण एकत्र कायमस्वरुपी बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे कायमस्वरुपी वास्तव्यास होते व आहेत. अर्जदार यांची आर्थिक परिस्थिती हालाकीची असल्याने अर्जदार यांचा आई रंजना हिचा शासकीय रुग्णालयात उपचारकरीता दाखल केलेले होते. ती दि.२६/०५/२०२१ रोजी मौजे अंबेजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय येथे तिचा उपचारादरम्यान मयत झालेले असून त्यांना अर्जदाराशिवाय अन्य कोणीही वारस नाही, शासकीय कामासाठी अर्जदार यांना वरील मयत व्यक्ती यांचे कायदेशीर वारस असले संदर्भात न्यायालयाकडून वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्जदारांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी सदर अर्जदार यांचे व्यतिरीक्त मयत रंजना अविनाश काळे यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रकटी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. ६/५/२०२५ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल. हे जाहिर प्रकटीकरण कोर्टाचे सहि शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे दि. ४/०४/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी**



**जाहीर प्रसिध्दीकरण**

पुढील नेमलेली ता. ९/०५/२०२५
दि. कि. अर्ज नं. १५/२०२५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनियर डिव्हीजन सो. यांचे कोर्टात**

१) **श्रीमती सविता सुभाष सातपुते,** वय- ३० वर्षे, धंदा-घरकाम, रा. इंदिरा नगर, वैराग, ता. बार्शी जि. सोलापूर
२) **वनमाला अभिमान सातपुते,** वय- ४६ वर्षे, धंदा- घरकाम, रा. सदर
३) **कु. साक्षी सुभाष सातपुते,** वय- १३ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. सदर अपाक जनक आई अर्जदार नं. १
४) **कु. मोनाली सुभाष सातपुते,** वय- ११ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. सदर अपाक जनक आई अर्जदार नं. १
— **अर्जदार**

**विरुध्द**
**कोणी नाही** - **सा.वाला**

ज्या अर्थी, सदर प्रकरणातील अर्जदार नं. १ चे पति व अर्जदार नं. २ यांचा मुलगा व अर्जदार नं. ३ व ४ यांचे वडिल सुभाष अभिमान सातपुते हे दि.२४/०४/२०२४ रोजी मौजे वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे हृदयविकाराने मयत झालेले असून अर्जदार नं. १ चे पती हे वैराग नगरपंचायत येथे क्लार्क म्हणून नोकरीस होते, त्यांच्या पश्चात त्यांच्या विधवांना राज्य शासनाची पेन्शन मंजुर करणेबाबत तसेच मयत सुभाष अभिमान सातपुते हे वैराग नगरपंचायत येथे शासकीय नोकरीस असल्याने त्यांचे जागी अनुकंपा तत्वाद्वारे त्यांचे वारसांना नोकरीत सामावून घेणेबाबत करण्याबाबत तरतुद आहे, त्याबाबत अर्जदार नं. १ यांनी वैराग नगरपंचायत येथे विचारणा केली असता तेथील अधिकारी यांनी वारस दाखला मागणी केलेला आहे तरी अर्जदारांना नमुद कारणाअन्वये वारस प्रमाणपत्र दाखला अर्जदार नं. १ ते ४ यांचे नावचा मिळणेकामी अर्जदाराने हल्लीचा अर्ज केलेला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिध्दी करणाने कळविण्यात येते की, वर नमुद अर्जदाराचे अर्जातील मागणी व विधाना संबंधाने जर कोणाचेही आक्षेप असतील तसेच मयत सुभाष अभिमान सातपुते यांना अर्जदार नं. १ ते ४ यांचेशिवाय अन्य कोणी वारस असतील अगर तशी कोणाची खात्री असेल, तर संबंधीतांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमलेल्या ता. ९/५/२०२५ रोजी पर्यंत मे. कोर्टात स्वतः अगर आपल्या विधीज्ञामार्फत हजर होवून आपले तक्रारी, हरकती लेखी स्वरुपात सादर कराव्यात अन्यथा मुदतीनंतर मे. कोर्टाचे पुढील हुकूम होतील. हे प्रसिध्दीकरण आमचे सही निशी व मे. कोर्टाचे शिक्यानिशी प्रसिध्द केले असे. ता. २८/०३/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधीश क. स्तर बार्शी**



**प्रसिध्दीकरण**

दि. कि. अर्ज नं.२७/२०२५
नि.५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन सो, यांचे कोर्टात**
**(जी. एस. पाटील सो)**

१) **श्रीमती रोहीणी केरबा क्षिरसागर,** वय - ३४ वर्षे, धंदा - घरकाम, रा. समर्थ कॉलनी, बागवान प्लॉट आत्रीक ऋषी रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **जीवन केरबा क्षिरसागर,** वय - १६ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. सदर, अ.पा.क. अर्जदार नं. १
— **अर्जदार**

**विरूध्द**
**कोणी नाही** - **सा. वाला**
**अर्ज - Bombay Regulation Act section VII प्रमाणे -**

ज्या अर्थी, यातील अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ चे वडिल मयत केरबा यशवंत क्षिरसागर हे दि. ता. २६/११/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. मयत केरबा यशवंत क्षिरसागर यांना सदर अर्जदार नं. १, २ हेच कायदेशीर व जवळचे वारस असल्याने, अर्जदार नं. १, २ यांनी मयत केरबा यशवंत क्षिरसागर यांचे जवळचे व कायदेशीर वारस ठरवून वारस दाखला मिळणेसाठी या मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी, सदर अर्जदार नं. १, २ यांचे व्यतिरीक्त मयत केरबा यशवंत क्षिरसागर यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. २५/६/२०२५ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल. कळावे हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सहीशिक्कयानिशी दिले असे. ता. ४/४/२०२५

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर बार्शी, ता.बार्शी**



Classifieds

**पाहिजेत**

जुनी मील कंपाऊंड परिसरात बंगल्यात सकाळी काम करण्यासाठी २५ ते ३० वयोगटातील मुलगा पाहिजे.
संपर्क: ९४२३५९००३६/ ९४२०८८५६०७

**घर भाड्याने देणे आहे**

सुसज्ज आणि प्रशस्त 2 BHK 2 फ्लॅट शाकाहारी कुटुंबास भाड्याने देणे आहे. आयएमएस पासून जवळ श्री राम चौक, कासार सोसायटी, जुळे सोलापूर. २४ तास पाणी, शांत आणि सुसज्ज परिसर, सीसीटीव्ही आणि पार्किंगची सोय.
- संपर्क नंबर -
9860139889 / 9822162454

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.



**जाहीर प्रसिध्दीकरण**

महाराष्ट्र सहकारी संस्था, (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम १९ अनुसार तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांच्या कार्यक्षेत्रातील क प्रकारातील खालील सहकारी संस्थांचे प्रसिध्दीकरणाचे निवडणूक कार्यक्रमातील विविध टप्पे खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नाव | नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठी तारीख व वेळ | नामनिर्देशन प्रत छाननी दिनांक व वेळ | नामनिर्देशन पत्र माघार घेण्याचा दिनांक व वेळ | उमेदवारांना निशानी वाटण्याची तारीख व वेळ | मतदान, मतमोजणी व निकाल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | धर्मवीर सदाशिव माने पाटील ग्रा. बिगर शेती सह. पतसंस्था मर्या., सदाशिवनगर | श्री.बी.एच.बंडगर, मुख्यलिपीक | दि.०४/०४/२०२५ ते दि. ११/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि. १५/०४/२०२५ दुपारी ०१.०० वा. | दि. १६/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.०३/०५/२०२५ सकाळी ११.०० | दि.११/०५/२०२५ मतदान स.०८ ते दु. ०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| २ | बापुराव सिद ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., माळशिरस | श्री.एस. के. यादव, सहाय्यक सह. अधिकारी | दि.०४/०४/२०२५ ते दि. ११/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि. १५/०४/२०२५ दुपारी ११.०० वा. | दि. १६/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.०३/०५/२०२५ सकाळी ११.०० | दि.११/०५/२०२५ मतदान स.०८ ते दु. ०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| ३ | रुक्मिणी महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., तोंडले | श्री.एस. के. यादव, सहाय्यक सह. अधिकारी | दि.०४/०४/२०२५ ते दि. ११/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि. १५/०४/२०२५ दुपारी ०१.०० वा. | दि. १६/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.०३/०५/२०२५ सकाळी ११.०० | दि.१२/०५/२०२५ मतदान स.०८ ते दु. ०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| ४ | सह्याद्री ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., नातेपुते | श्री.एस.ए. पाटील सहा. सहकारी अधि | दि.०४/०४/२०२५ ते दि. ११/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि. १५/०४/२०२५ दुपारी ०४.०० वा. | दि. १६/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.०३/०५/२०२५ सकाळी ११.०० | दि.१२/०५/२०२५ मतदान स.०८ ते दु. ०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| ५ | लक्ष्मी कृष्ण ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., नातेपुते | श्री. एस.ए.पाटील सहा.सहकारी अधि | दि.०४/०४/२०२५ ते दि. ११/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि. १५/०४/२०२५ दुपारी ०४.०० वा. | दि. १६/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.०३/०५/२०२५ सकाळी ११.०० | दि.११/०५/२०२५ मतदान स.०८ ते दु. ०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| ६ | विश्वश्री महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., दहिगांव | श्री.एस.जी. जाधव सहकारी अधि. श्रेणी १ | दि.०४/०४/२०२५ ते दि. ११/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि. १५/०४/२०२५ दुपारी ०३.०० वा. | दि. १६/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.०३/०५/२०२५ सकाळी ११.०० | दि.११/०५/२०२५ मतदान स.०८ ते दु. ०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| ७ | मामाश्री ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., नातेपुते | श्री.बी.एच.बंडगर, मुख्यलिपिक | दि.०४/०४/२०२५ ते दि. ११/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि. १५/०४/२०२५ दुपारी ०३.०० वा. | दि. १६/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.०३/०५/२०२५ सकाळी ११.०० | दि.१२/०५/२०२५ मतदान स.०८ ते दु. ०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| ८ | जयश्री महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., जांबुड (माळेवाडी) | डी.पी.राऊत, लेखापरीक्षक सहकारी संस्था, अकलूज | दि.०४/०४/२०२५ ते दि. ११/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि. १५/०४/२०२५ दुपारी ११.०० वा. | दि. १६/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.०३/०५/२०२५ सकाळी ११.०० | दि.११/०५/२०२५ मतदान स.०८ ते दु. ०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| ९ | श्री. विठ्ठल महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., बाभूळगांव | श्री.ए.जी.जाधव, सहकारी अधि. श्रेणी १ | दि.०४/०४/२०२५ ते दि. ११/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि. १५/०४/२०२५ दुपारी ०४.०० वा. | दि. १६/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.०३/०५/२०२५ सकाळी ११.०० | दि.१२/०५/२०२५ मतदान स.०८ ते दु. ०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| १० | इंदिरा गांधी महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., निमगांव | डी.पी.राऊत, लेखापरीक्षक सहकारी संस्था, अकलूज | दि.०४/०४/२०२५ ते दि. ११/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि. १५/०४/२०२५ दुपारी ०१.०० वा. | दि. १६/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.०३/०५/२०२५ सकाळी ११.०० | दि.१२/०५/२०२५ मतदान स.०८ ते दु. ०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| ११ | अंगणवाडी महिला सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या., माळशिरस | श्री. बी.एच.बंडगर, मुख्यलिपिक | दि.०४/०४/२०२५ ते दि. ११/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि. १५/०४/२०२५ दुपारी ११.०० वा. | दि. १६/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.०३/०५/२०२५ सकाळी ११.०० | दि.१०/०५/२०२५ मतदान स.०८ ते दु. ०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| १२ | जिव्हाळा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., श्रीपूर | श्री.ए.जी.जाधव, सहकारी अधि. श्रेणी १ | दि.०४/०४/२०२५ ते दि. ११/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि. १५/०४/२०२५ दुपारी ०१.०० वा. | दि. १६/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.०३/०५/२०२५ सकाळी ११.०० | दि.१०/०५/२०२५ मतदान स.०८ ते दु. ०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| १३ | जयराम ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., आनंदनगर | श्री.एस.ए.पाटील सहा. सहकारी अधि | दि.०४/०४/२०२५ ते दि. ११/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि. १५/०४/२०२५ दुपारी ११.०० वा. | दि. १६/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.०३/०५/२०२५ सकाळी ११.०० | दि.०९/०५/२०२५ मतदान स.०८ ते दु. ०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| १४ | श्री महावीर स्वामी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., अकलूज | श्री.एस.ए.पाटील सहा. सहकारी अधि | दि.०४/०४/२०२५ ते दि. ११/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि. १५/०४/२०२५ दुपारी ०४.०० वा. | दि. १६/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.०३/०५/२०२५ सकाळी ११.०० | दि.१०/०५/२०२५ मतदान स.०८ ते दु. ०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| १५ | आनामिका महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., नातेपुते | श्री.ए.जी.जाधव, सहकारी अधि. श्रेणी १ | दि.०४/०४/२०२५ ते दि. ११/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि. १५/०४/२०२५ दुपारी ०१.०० वा. | दि. १६/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.०३/०५/२०२५ सकाळी ११.०० | दि.०९/०५/२०२५ मतदान स.०८ ते दु. ०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| १६ | अकलूज नगरपरिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., अकलूज | लेखापरीक्षक सहकारी संस्था अकलूज | दि.०४/०४/२०२५ ते दि. ११/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि. १५/०४/२०२५ दुपारी ११.०० वा. | दि. १६/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.०३/०५/२०२५ सकाळी ११.०० | दि.०९/०५/२०२५ मतदान स.०८ ते दु. ०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| १७ | बळीराजा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., नातेपुते | श्री. एस. के. यादव, सहाय्यक, सह. अधिकारी | दि.०४/०४/२०२५ ते दि. ११/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि. १५/०४/२०२५ दुपारी ०१.०० वा. | दि. १६/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.०३/०५/२०२५ सकाळी ११.०० | दि.०९/०५/२०२५ मतदान स.०८ ते दु. ०४ नंतर मतमोजणी व निकाल |
| १८ | श्री. गणेश ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., अकलूज | श्री. एस. के. यादव, सहाय्यक, सह. अधिकारी | दि.०४/०४/२०२५ ते दि. ११/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि. १५/०४/२०२५ दुपारी ०४.०० वा. | दि. १६/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० | दि.०३/०५/२०२५ सकाळी ११.०० | दि.१०/०५/२०२५ मतदान स.०८ ते दु. ०४ नंतर मतमोजणी व निकाल |

**सही/-**
**(एम.एल.शिंदे)**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी,**
**अकलूज ता. माळशिरस, जि. सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## युनायटेडचे क्रिकेट शिबीर आजपासून

**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

युनायटेड क्रिकेट क्लबच्या वतीने उन्हाळी क्रिकेट प्रशिक्षण शिबीर पार्क मैदानावर ५ एप्रिल ते ते १० जूनपर्यंत सकाळी ६ ते ९.३० व दुपारी ३.३० ते ६.३० या वेळेत पार्क मैदान येथे होईल. या शिबीरात प्रसिध्द क्रिकेटपटूंचे मार्गदर्शन लाभणार आहे. संजय मोरे हे भारतीय क्रिकेट नियाम क मंडळाची कोचिंग परीक्षा लेव्हल वन पास झालेले एकमेव प्रशिक्षक आहेत. त्यांचे मार्गदर्शन या शिबिरास लाभणार आहे. इच्छुकांनी पार्क मैदानावर युनायटेड क्रिकेट क्लबच्या नेटवर क्लबचे सचिव सुनिल मालप (मो. नं.९९२२९९५१२१) अथवा सहसचिव संजय मोरे, (मो. नं. ९८९०८२३३५२) यांच्याशी संपर्क साधावा.

# महाराष्ट्राच्या महिलांचा डंका, पुरुष गटात रेल्वेची बाजी

## ५७ वी पुरुष व महिला राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा : धाराशिवची तन्वी भोसले राणी लक्ष्मीबाई पुरस्काराची मानकरी

**पुरी (ओडिशा), ४ एप्रिल-**

५७व्या राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या महिला संघाने दिमाखदार खेळी करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. अंतिम सामन्यात त्यांनी यजमान ओडिशावर २५-२१ असा थरारक विजय मिळवला. दुसरीकडे, पुरुष गटात रेल्वेच्या संघाने गतविजेत्या महाराष्ट्राला ३६-२८ अशी मात देत बाजी मारली. राष्ट्रीय खो-खो स्पर्धेतील महाराष्ट्राच्या महिलांचे हे २६ वे तर रेल्वेचे १२ वे अजिंक्यपद ठरले आहे.



पुरी येथील जिल्हा क्रीडा संकुलात पार पडलेल्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राच्या महिला खेळाडूंनी शेवटच्या क्षणापर्यंत संघर्ष करत यजमान ओडिशाचा प्रतिकार मोडून काढला. सामन्याच्या मध्यंतराला दोन्ही संघ १०-१० अशा बरोबरीत होते. मात्र, दुसऱ्या डावात महाराष्ट्राने अचूक रणनीती आणि दमदार संरक्षणाच्या जोरावर सामन्यावर वर्चस्व मिळवत विजयावर शिक्कामोर्तब केले. प्रियांका इंगळे (१.३० मि. संरक्षण), रेश्मा राठोड (१.४० मि. संरक्षण) व अश्विनी शिंदे (१.४० मि. संरक्षण) यांनी पहिल्या डावात तर तन्वी भोसले (३ मि. संरक्षण), संपदा मोरे (१.३० मि. संरक्षण) आणि सानिका चाफे (१.२० मि. संरक्षण) यांनी दुसऱ्या डावात उत्कृष्ट खेळ करत विजयात महत्त्वपूर्ण योगदान दिले. आक्रमणात रेश्माने ६ व प्रियांकाने ४ गडी बाद करत विजयात मोलाची भूमिका बजावली. ओडिशाकडून शुभश्री सिंग (१.२० मि. संरक्षण व ६ गुण) आणि स्मरणिका शाहू (नाबाद १.३० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी कडवी झुंज दिली, मात्र ती अपुरी ठरली.

### गतविजेत्या महाराष्ट्राच्या पुरुष संघाला पराभवाचा धक्का

पुरुषांच्या महाराष्ट्र वि. ओडिशा या काल सायंकाळीच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात मैदान निसरडे झाल्याने खेळाडूंची दमछाक झाली व पुढे मैदानाची अवस्था खराब झाल्याने हा सामना थांबवावा लागला व रद्द झालेला सामना आज सकाळच्या सत्रात खेळावा लागला. त्यानंतर लगेच अंतिम सामना झाला. खरतर राष्ट्रीय स्पर्धेत एकाच सत्रात उपांत्य व अंतिम सामना खेळणे हे योग्य नव्हे. त्याचबरोबर विश्वचषकतील भारतीय संघाचा कर्णधार प्रतीक वाईकर काल सायंकाळपासून आजारी होता त्याचा परिणाम खेळाडूंच्या मानसिकतेवर झाला. त्यामुळेच महाराष्ट्राला पराभवाचा सामना करावा लागला.

**-प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव, सहसचिव भारतीय खो-खो महासंघ.**

पुरुष गटाच्या अंतिम सामन्यात रेल्वेने महाराष्ट्रावर ३६-२८ अशी निर्णायक मात करत अजिंक्यपद आपल्या नावावर केले. मध्यंतराला रेल्वेने २१-१२ अशी निर्णायक आघाडी घेत सामन्यावर नियंत्रण मिळवले. दुसऱ्या डावात महाराष्ट्राने १५-१५ अशी जोरदार मुसंडी मारली पण रेल्वेने पाहिल्या डावात घेतलेली आघाडी महाराष्ट्राच्या पराभवाचे कारण ठरली.रेल्वेकडून अरुण गुणकी (१.२० मि. संरक्षण व ६ गुण), राहुल मंडल (१.४० मि. संरक्षण व ४ गुण), दिलीप खांडवी (६ गुण), जगन्नाथ दास (१.४० मि. संरक्षण व ४ गुण) व महेश शिंदे (१.४०, १.२० मि. संरक्षण) यांनी अष्टपैलू कामगिरी करत संघाला विजय मिळवून दिला. महाराष्ट्रकडून लक्ष्मण गवस आणि मिलिंद चावरेकर यांनी प्रत्येकी १.४० मि. संरक्षण केले होते. पियुष घोलमने ६ गुण मिळवत, तर निहार दुबळे, रुद्र थोपटे आणि सुयश गरगटे यांनी प्रत्येकी ४ गुण यांचे प्रयत्न अपुरे पडले.

## सोलापूर संघाचा ईस्ट झोनवर डावाने विजय

### १९ वर्षांखालील निमंत्रित क्रिकेट

**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

छत्रपती संभाजी नगर येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या १९ वर्षांखालील निमंत्रित क्रिकेट स्पर्धेत सोलापूरने ईस्ट झोन संघावर एक डाव राखून १४ धावांनी दणदणीत विजय मिळविला. या विजयासह सोलापूर बोनस ७ गुणासह १३ गुणांनी अव्वल स्थानावर आहे. सोलापूरचे अजून दोन सामने बाकी आहेत. सोलापूरचा पुढील सामना शनिवारी सीएनए संघाबरोबर होईल.

सोलापूरने आठ बाद ३७४ धावांवर डाव घोषित केला. ईस्ट झोन संघाने पहिल्या डावात १३१ धावा व दुसऱ्या डावात २२९ धावा केल्या.





सोलापूर संघाकडून फलंदाजी करताना सुमित अहिवळे यांनी ११४ धावा केल्या. अथर्व देशमाने याने ८७ धावा तसेच वीरांश वर्मा यांनी ४२ धावा केल्या. ईस्ट झोन संघाच्या पहिल्या डावात समर्थ दोरनाल याने पाच बळी व दुसऱ्या डावात सहा असे ११ बळी घेतले. तो सामनावीर ठरला.

# कुर्डुवाडीच्या जयहिंद क्लबची विजयी घोडदौड

### ७८ वी रेल्वे स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा

### के.बी.एन.सी.ए. संघाचीही बाजी

**सोलापूर, दि.४ एप्रिल-**

मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिट्युटच्या ७८व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत कुर्डुवाडीच्या जयहिंद क्लबने विजयी घोडदौड कायम ठेवली.

रेल्वेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात शुक्रवारी झालेल्या सामन्यात त्यांनी अंबर क्रिकेट क्लबवर ३१ धावांनी मात केली. दिनेश कणसे सामन्याचा मानकरी ठरला. दुसऱ्या सामन्यात के.बी.एन.सी.ए. संघाने पंढरपूरच्या नक्षत्र क्लबला ३५ धावांनी नमविले. जकवान हबीब सामनावीर ठरला. प्रत्येक सामनावीरचे पुरस्कार सुदेश मालप व सुनील मालप यांच्याकडून देण्यात येत आहेत





**सोलापूर : सामनावीर पुरस्कार दिनेश कणसे यास सोहेल मुनशी यांच्या हस्ते देण्यात आला. दुसऱ्या सामान्याचा सामानवीर पुरस्कार जकवान हबीब यास विक्रांत पवार यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी राजा पटेल, लियाकत शेख, अंबादास तोरा, अतुल बांडीवाडीकर व सचिन गायकवाड.**

या सामन्यांसाठी सचिन गायकवाड व दया नवले आणि नंदकुमार टेळे व नवीन माने यांनी पंच तर गुणलेखक म्हणून गेनबा सुरवसे यांनी काम पाहिले.

### संक्षिप्त धावफलक

**जय हिंद क्रिकेट क्लब कुर्डूवाडी** : २० षटकांत २ बाद १९१ (दिनेश कणसे ८०, अभिजित मुळे ३७, विल्सन काळे ३२, महेंद्र ढवान व सचिन वांगीकर प्रत्येकी १ बळी) विजयी विरुद्ध **अंबर क्रिकेट क्लब** : १९.५ षटकांत सर्व बाद १६० ( जुबेर तांबोळी ४४, सचिन वांगीकर ४३, अझहर मुल्ला २९, सचिन घोडसे ४ बळी, अक्षय गोरे व अभिजित मुळे प्रत्येकी २ बळी).

**के.बी.एन.सी.ए. संघ** : १९.२ षटकांत सर्व बाद १४६ (मकरंद जाधव २३, साई गायकवाड २१, शशी ओहोळ व सचिन घोडसे १४, अमित पाटेकर ३ बळी, सौरभ बारले २ बळी, आकाश परदेसी, अजय कदम,सोहेल काझी, प्रवीण वाघमारे प्रत्येकी एक बळी) वि. वि. **नक्षत्र क्रिकेट क्लब पंढरपूर** : १७.४ षटकांत सर्व बाद १११ (सौरभ बारले २४, अमित पाटेकर २२, दीपक नवले १६, जकवान हबीब ५ बळी, सईद जहागिरदार २ बळी, वसीम बैग २ बळी.

### आजचे सामने

स्मॅशर थंडर विरुद्ध युनायटेड क्रिकेट क्लब, एचकेसीसी विरुद्ध नॅशनल क्रिकेट ॲकॅडमी.

## चित्रपट वार्ता


### प्रियांकाऐवजी करीनाला घेतले, चित्रपट आपटला!



**मुंबई** : नवोदित अभिनेत्रींना संधी देऊन त्यांना सुपरस्टार बनवणारे शो मॅन म्हणून सुभाष घई यांचे नाव घेतले जाते. ९० च्या दशकात त्यांच्यासोबत काम करण्यासाठी प्रत्येक नवीन मुलगी तयार असायची. सुभाष घई यांची अभिनेत्रींच्या बाबतीत निवड नंतरच्या काळात चुकत गेली. त्याची सुरुवात 'यादें' या चित्रपटापासून झाली. या चित्रपटात एकल पालक असणारा पिता आणि तीन मुलींची कथा होती. यात जॅकी श्रॉफ पित्याच्या भूमिकेत होता. मुलींपैकी एकीच्या भूमिकेसाठी सुभाष घईंना नवीन चेहरा म्हणून प्रियांकाला घ्यायचे होते. मात्र, तिला घेता आले नाही. त्यामुळे सुभाष घई यांनी करीनाला ही भूमिका दिली. चित्रपट फारसा चालला नाही. यात प्रियांकाला घेण्याची सुभाष घईंची इच्छाही अपूर्णच राहिली. ■

### गोविंदाची मुलाला शिवीगाळ न करण्याची ताकीद

**मुंबई** : सुपरस्टार गोविंदाचा मुलगा यशवर्धन आहुजा लवकरच बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. दरम्यान, त्याने त्याचे वडील आणि अभिनेता गोविंदा यांनी दिलेल्या सल्ल्याबद्दल सांगितले आहे. यशवर्धनने २०१६ च्या ढिशूम आणि बागी चित्रपटांमध्ये सहाय्यक भूमिका केल्या होत्या. स्टार किड असूनही, त्याने नऊ वर्षे ऑडिशन दिले. तथापि, यशवर्धनला नंतर राष्ट्रीय पुरस्कार विजेते चित्रपट निर्माते साई राजेश यांच्यासोबत पहिला प्रोजेक्ट मिळाला. अलिकडेच यशवर्धनने सांगितले की त्याचे वडील गोविंदा यांनी त्याला चित्रपटांमध्ये करिअर करण्याचा सल्ला दिला होता. माझ्या वडिलांनी कधीही पडद्यावर अपशब्द वापरले नाहीत. बॉलिवूडमध्ये येण्यापूर्वी त्यांनी मला एकच गोष्ट सांगितली होती की चित्रपटांमध्ये कधीही अपशब्द वापरू नका. वाईट शब्द न उच्चारताही खलनायक सादर करता येतो, हेही त्यांनीच दाखवून दिले. त्यांचे हे तत्व पाळण्याचा मी पूर्ण प्रयत्न करणार आहे. ■



### 'जेम्स बॉण्ड' सीरिजमध्ये झळकणार रणबीर



**मुंबई** : ऋषी कपूर आणि नीतू सिंग यांचा मुलगा रणबीर कपूरने त्याच्या अभिनयाने इंडस्ट्रीत मोठे नाव कमावले. आता तो हॉलीवूडमध्ये पदार्पण करणार असल्याचं म्हटलं जात आहे. रणबीर हॉलीवूडच्या ॲक्शन मास्टर मायकेल बे यांच्या दिग्दर्शनाखाली पदार्पण करणार आहे. मायकेल बे आगामी बॉंड चित्रपटाचे दिग्दर्शन करणार असल्याचे वृत्त आहे. चित्रपटातील एका महत्त्वाच्या भूमिकेसाठी निर्मिती संस्थेच्या टीमने रणबीरशी चर्चा सुरू केल्या आहेत. ब्रिटिश अभिनेता चिवेटेल एजिओफोर देखील या चित्रपटात दिसण्याची शक्यता आहे. ■



# चित्रपटांवर देशभक्तीचे संस्कार, हेच त्यांचे 'उपकार'

**सर्वाधिक कमाई केलेले चित्रपट** — **दस नंबरी, क्रांती, रोटी कपडा और मकान, पूरब और पश्चिम, उपकार, बेईमान, गुमनाम, हिमालय की गोद में, नीलकमल.**


रसिकांचे मनोरंजन हा सिनेसृष्टीचा ध्यास आणि ध्येय राहिले आहे. मात्र, मनोरंजनाला काहींनी उद्बोधनाची, धार्मिकतेची, तत्वज्ञानाची, कलात्मकतेची जोड दिली. तसे अभिनेता, निर्माता, दिग्दर्शक मनोज कुमार यांनी सिनेजगतावर राष्ट्रभक्तीचे संस्कार केले. त्यांच्या चित्रपटांमधून राष्ट्रभक्तीची प्रखर भावना असायची. यामुळे त्यांना भारत कुमार असे संबोधले जायचे. आता देशभक्तीची ही मशाल तेवणारा आपल्यातून निघून गेला आहे. त्यानिमित्ताने त्यांच्या आठवणींना दिलेला हा उजाळा.......

मनोज कुमार यांचे खरे नाव हरिकृष्ण गोस्वामी होते. त्यांचा जन्म २४ जुलै १९३७ रोजी ब्रिटिश भारतातील अबोटाबाद (आता खैबर पख्तूनख्वा, पाकिस्तान) येथे झाला. २ मे २०११ रोजी अमेरिकेने ओसामा बिन लादेनला जिथे मारले होते तेच अबोटाबाद आहे. मनोज कुमार १० वर्षांचे असताना १९४७ मध्ये त्यांचे धाकटा भाऊ कुक्कूचा जन्म झाला. त्याची तब्येत बिघडली तेव्हा, दोन महिन्यांच्या भावाला आणि आईला रुग्णालयात दाखल करण्यात आले, तेव्हा दंगल सुरू झाली. सर्वत्र गोंधळ उडाला आणि रुग्णालयातील कर्मचारी जीव वाचवण्यासाठी पळू लागले.

सायरन वाजताच, उर्वरित डॉक्टर आणि परिचारिका भूमिगत झाले. अशा परिस्थितीत, योग्य उपचारांअभावी, मनोज कुमारच्या दोन महिन्यांच्या भावाचा रुग्णालयात मृत्यू झाला. त्यावेळी आईची प्रकृतीही गंभीर होती. ती वेदनेने ओरडत राहिली, पण कोणत्याही डॉक्टर किंवा नर्सने तिच्यावर उपचार केले नाहीत. एके दिवशी हे सर्व पाहून मनोज यांना इतका राग आला की त्यांनी काठी उचलली, डॉक्टर आणि परिचारिकांना मारहाण करायला सुरुवात केली. मनोज तेव्हा फक्त १० वर्षांचे होते, पण ते त्यांच्या आईचे दुःख पाहू शकत नव्हते. वडिलांनी त्यांच्यावर ताबा मिळवला आणि कुटुंबाने आपले प्राण वाचवण्यासाठी पाकिस्तान सोडण्याचा निर्णय घेतला. त्यांचे कुटुंब जंदियाला शेरखान येथून पळून दिल्लीला पोहोचले. येथे त्यांनी निर्वासित छावणीत दोन महिने घालवले. वेळ निघून गेला आणि दंगली कमी होऊ लागल्या. कसे तरी संपूर्ण कुटुंब दिल्लीत स्थायिक झाले, जिथे मनोज शिक्षण घेऊ शकले. शाळेनंतर, त्यांनी हिंदू कॉलेजमधून पदवी पूर्ण केली आणि नोकरी शोधू लागले.

### एका प्रकाशझोताने बदलले आयुष्य

एके दिवशी मनोज कुमार कामाच्या शोधात फिल्म स्टुडिओमध्ये फिरत असताना त्यांना एक माणूस दिसला. मनोज यांनी सांगितले की ते काम शोधत आहेत, म्हणून तो माणूस त्यांना सोबत घेऊन गेला. त्यांना चित्रपटाच्या चित्रीकरणात वापरले जाणारे लाइट्स आणि इतर उपकरणे वाहून नेण्याचे काम मिळाले. हळूहळू, मनोज यांच्या कामावर खूश झाल्यामुळे त्यांना चित्रपटांमध्ये सहाय्यक म्हणून काम मिळू लागले. मोठे कलाकार त्यांचे शूटिंग सुरू होण्याच्या काही मिनिटे आधी चित्रपटाच्या सेटवर पोहोचायचे. अशा परिस्थितीत, मनोज कुमार यांना सेटवर नायकाच्या जागी उभे करून नायकावर पडणारा प्रकाश तपासायला लावण्यात आले. एके दिवशी जेव्हा मनोज कुमार लाइट टेस्टिंगसाठी नायकाच्या जागी उभे राहिले. कॅमेऱ्यावर प्रकाश पडताच त्यांचा चेहरा इतका आकर्षक दिसत होता की एका दिग्दर्शकाने त्यांना १९५७ च्या फॅशन चित्रपटात एक छोटीशी भूमिका दिली. भूमिका छोटी होती, पण मनोज यांनी काही मिनिटांच्या अभिनयातच आपली छाप सोडली. त्या भूमिकेमुळे मनोज कुमार यांना कांच की गुडिया (१९६०) या चित्रपटात मुख्य भूमिका देण्यात आली. पहिला यशस्वी चित्रपट दिल्यानंतर मनोज यांनी रेश्मी रुमाल, चांद, बनारसी ठग, गृहस्ती, अपने हुए पराये, वो कौन थी यांसारखे अनेक बॅक टू बॅक हिट चित्रपट दिले.



### ....म्हणून ठेवले मनोज नाव!

मनोज कुमार लहानपणापासूनच दिलीप कुमार यांचे खूप मोठे चाहते होते. मनोज कुमार यांना दिलीप साहेबांचा शबनम (१९४९) हा चित्रपट इतका आवडला की त्यांनी तो अनेक वेळा पाहिला. चित्रपटात दिलीप कुमार यांचे नाव मनोज होते. जेव्हा मनोज कुमार चित्रपटांमध्ये आले तेव्हा त्यांनी दिलीप कुमार यांच्या नावावरून त्यांचे नाव मनोज कुमार असे ठेवले. ■

### कलाकार आणि मान्यवरांच्या संवेदना

**अक्षयकुमार** : चित्रपट क्षेत्रातील सर्वात मोठे कलाकार आणि मौल्यवान असे व्यक्तिमत्त्व होते.

**अजय देवगण** : भारतीय चित्रसृष्टीच्या प्रवासात मनोज कुमार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांचे देशभक्तीपर आणि कौटुंबिक चित्रपट अत्यंत दर्जेदार आहेत.

**अनुपम खेर** : माझ्या आयुष्यात मनोज कुमार यांचे खूप मोठे योगदान आहे आणि ते कायम राहील. त्यांचे चित्रपट आणि गीतांनी आमचे केवळ मनोरंजन केले नाही तर आमच्यात देशभक्तीची भावना जागृत केली.

**आमीर खान** : मनोज कुमार यांचे चित्रपट हे शिकण्याचे उत्तम साधन आहेत.

**आनंद महिंद्रा** : माझ्या बालपणातील एक महत्त्वाचा भाग गमावल्यासारखे वाटते. माझ्या कुटुंबाने मनोज कुमारचा एकही चित्रपट चुकवला नाही. आणि मला आजही आठवतंय जेव्हा पूरब और पश्चिम हा चित्रपट प्रदर्शित झाला तेव्हा या चित्रपटाने जो देशभक्तीचा उत्साह जागवला तो अभूतपूर्व होता.

**मनोज मुंतशीर** : माझे नाव तुमच्या नावाशी जुळते याचा मला नेहमीच अभिमान राहील. देशभक्तीचा पहिला धडा मी तुमच्या चित्रपटांमधून शिकलो. जर तुम्ही नसता तर कदाचित 'तेरी मिट्टी' सारखे गाणे माझ्या लेखणीतून निघाले नसते. मनोज कुमार यांनी त्यांच्या चित्रपटांमधून पेटवलेली देशभक्तीची ठिणगी कायमची तेवत राहील, असे ते म्हणाले. ■

### इतर काही पुरस्कार

२००७ : सरदार पटेल जीवनगौरव आंतरराष्ट्रीय पुरस्कार
२००८ : स्टार स्क्रीन जीवनगौरव पुरस्कार
२०१० : १२व्या मुंबई चित्रपट महोत्सवात जीवनगौरव पुरस्कार
२०१२ : अप्सरा फिल्म अँड टेलिव्हिजन प्रोड्यूसर्स गिल्ड पुरस्कार सोहळ्यात जीवनगौरव पुरस्कार
२०१२ : नाशिक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात जीवनगौरव पुरस्कार
२०१२ : न्यू जर्सी, युनायटेड स्टेट्स येथे भारत गौरव पुरस्कार
२०१३ : जागरण चित्रपट महोत्सवात जीवनगौरव पुरस्कार
२०१९ : बीएफजेए (बॉलीवूड फिल्म जर्नलिस्ट अवॉर्ड्स) मध्ये पॉवर ब्रँड्सकडून जीवनगौरव पुरस्कार
२०२० : कलैमामणि पुरस्कार ■


### फिल्मफेअर पुरस्कारांची यादी



१९६८ सर्वोत्कृष्ट चित्रपट - उपकार
१९६८ सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक - उपकार
१९६८ सर्वोत्कृष्ट कथा - उपकार
१९६८ सर्वोत्कृष्ट संवाद - उपकार
१९६९ सर्वोत्कृष्ट अभिनेता - बेइमान
१९७२ सर्वोत्तम संपादन - शोर
१९७२ सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक - रोटी कपडा और मकान
१९९९ जीवनगौरव पुरस्कार सन्मानित ■

### लाल बहादूर शास्त्रींच्या सांगण्यावरून 'उपकार' बनवला

१९६५ मध्ये, मनोज कुमार यांनी शहीद या देशभक्तिपर चित्रपटात स्वातंत्र्यसैनिक शहीद भगतसिंग यांच्या भूमिकेत काम केले. हा चित्रपट खूप गाजला आणि त्यातील ए वतन, ए वतन हमको तेरी कसम, सरफरोशी की तमन्ना आणि मेरा रंग दे बसंती चोला या गाण्यांना चांगलीच पसंती मिळाली.लालबहादूर शास्त्रींना हा चित्रपट खूप आवडला. शास्त्रीजींनी जय जवान, जय किसानचा नारा दिला. शास्त्रीजींनी मनोज यांना या घोषणेवर चित्रपट बनवण्याचा सल्ला दिला. त्यानंतर मनोज यांनी उपकार (१९६७) हा चित्रपट बनवण्यास सुरुवात केली, जरी त्यांना चित्रपट लेखन किंवा दिग्दर्शनाचा कोणताही अनुभव नव्हता.




एके दिवशी मनोज कुमार यांनी मुंबईहून दिल्लीला जाणाऱ्या राजधानी ट्रेनचे तिकीट काढले आणि ट्रेनमध्ये चढले. त्यांनी अर्धा चित्रपट ट्रेनमध्ये बसून लिहिला आणि उरलेला अर्धा परतताना लिहिला. या चित्रपटाद्वारे त्यांनी दिग्दर्शक म्हणून त्यांच्या कारकीर्दीची दुसरी इनिंग सुरू केली. नंतर त्यांनी पूरब और पश्चिम, रोटी कपडा और मकान यांसारखे देशभक्तिपर अनेक चित्रपट केले. लाल बहादूर शास्त्री यांच्या विनंतीवरून उपकार बनवण्यात आला होता, पण ते पाहू शकले नाहीत, याची खंत मनोज कुमार यांना कायम वाटत राहिली. ■



**चित्रपट अभिनेते दिवंगत मनोज कुमार यांच्यासोबत काढलेले छायाचित्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमांवर टाकले.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# बार्शी उपसा सिंचनचे पाणी शेतकऱ्यांना मिळेना

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.४ एप्रिल-**

बार्शी उपसा सिंचन योजनेसाठी पाणी सोडून आठ दिवस झाले तरी लाभार्थी शेतकऱ्यांना ते अद्याप मिळाले नाही. त्यामुळे ही योजना असून अडचण नसून खोळंबा झाली आहे. योजनेचे पाणी शेतकऱ्यांसाठी त्वरीत देण्याची मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

रिधोरे येथील १३७५ अश्वशक्तीचे दोन पंप नादुरुस्त असल्याने हे पाणी पूर्ण क्षमतेने उचलले जात नाही. कमी दाबाने जेवढे पाणी येत आहे. त्यावरही शेतकऱ्यांचा पहिला हक्क असताना त्यांना वंचित ठेवून पाणी बार्शीनजीक गावतलाव भरण्यास सोडले आहे. बार्शी उपसा सिंचन योजनेसाठी २.५९ टीएमसी पाणी मंजूर आहे. अनेक वर्षासून या योजनेचे काम रखडतच सुरु आहे. पाण्याची वाट पाहत एक पिढी म्हातारी झाली. आता दुसरी पिढी पाण्याची वाट पाहत आहे. बार्शी उपसा सिंचन योजनेचे काम प्रगतीपथावरच आहे. जेवढे काम पूर्ण झाले त्या भागातील शेतकऱ्यांना पाण्याच्या उपलब्धतेनुसार दोन किंवा तीन आवर्तने सोडली जातात. सध्या लक्ष्याचीवाडीच्या पुढे १० किमी पर्यंतचे काम पूर्ण झाले आहे. नव्याने काम पूर्ण झालेल्या ठिकाणी टेस्टींग घेतली जाते. यंदा आठवडयापूर्वी पाणी सुटल्यानंतर कांदलगांव, गाडेगांव परिसरात टेस्टींग घेतले. आता पाणी येणार म्हणून शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. शेतकऱ्यांनी पाणी घेण्याची तयारीही केली. परंतु हा आनंद फार काळ टिकला नाही. कॅनॉलशी संबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी पाणी बंद केले. शेतकऱ्यांचा या पाण्यावर पहिला हक्क असताना त्यांना वंचित ठेवून गावतलाव भरण्यास सोडले आहे.

### १३७५ अश्वशक्तीचे दोन पंप सुरु, दोन बंद

उजनीतून सीना नदीत पाणी आल्यानंतर माढा तालुक्यातील रिधोरेनजीक पंपगृह येथून पाणी उपसा करुन ते बार्शी तालुक्यातील उपळाई येथे आणले जाते व तेथून वितरणकुंडातून डाव्या व उजव्या मुख्य कालव्यातून शेतकऱ्यांसाठी सोडले जाते. रिधोरे येथे पाणी उपसा करण्यासाठी १३७५ अश्वशक्तीचे एकूण चार पंप आहेत. यातील दोन पंप नादुरुस्त असल्याने दोन पंपावरच सर्व भिस्त आहे. परंतु दोन पंपामुळे पुरेशा दाबाने पाणी पुरवठा होत नाही. परिणामी लक्ष्याचीवाडी येथील पंपगृह येथे मागून येणाऱ्या पाण्याचा दाब कमी असल्याने तेथील ३२० अश्वशक्तीच्या ४ पंपापैकी १ पंप सतत चालू असतो तर दुसरा पंप कधीतरी दोन तीन तास चालतो. त्यामुळे लक्ष्याचीवाडी येथून पुढे जाणारे पाणीही कॅनॉलमधून अत्यंत कमी दाबाने वाहत आहे.

### पंप तातडीने दुरुस्तीची गरज

रिधोरे येथील १३७५ अश्वशक्तीचे नादुरुस्त असलेले दोन पंप तातडीने कार्यान्वित करण्याची गरज आहे. तरच हे पाणी पूर्ण क्षमतेने उचलले जावून पुढे कॅनॉलमधून पुरेशा दाबाने पाणी मिळणार आहे. पाण्याचे आवर्तन सुटणार असल्याचे माहित असूनही प्रशासकीय यंत्रणेने कोणतीही हालचाल न केल्याने त्याचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे.

रिधोरे येथील १३७५ अश्वशक्तीच्या चार पंपापैकी दोन पंप नादुरुस्त आहेत. तेथून पुरेशा दाबाने पाणी मिळत नाही. परिणामी लक्ष्याचीवाडी येथील ३२० अश्वशक्तीच्या चार पैकी एकच पंप सुरु राहत आहे. रिधोरे येथील पंप लवकर कार्यान्वित करण्यासाठी आमचेही प्रयत्न सुरु आहेत. कांदलगांव, गाडेगांव भागातील शेतकऱ्यांसाठी पाणी सोडण्यात येईल.
**-आ.श. कवठेकर, उपविभागीय अभियंता, उजनी कालवा उपविभाग क्र.५०**

## महत्वाचे...



### स्त्रीरोग तज्ज्ञ संघटनेच्या अध्यक्षपदी डॉ. रेवती राणे

**अकलूज, दि. ४ एप्रिल-**

स्त्रीरोग तज्ज्ञ संघटनेच्या अध्यक्षपदी डॉ. रेवती राणे यांची नियुक्ती करण्यात आली. पत्रकार परीषदेत ही घोषणा करण्यात आली. यावेळी अध्यक्षा डॉ. राणे यांनी विविध कार्यक्रमाची रुपरेषा सांगितली. उपाध्यक्ष डॉ विनोद शेटे, सचिवपदी डॉ कविता कांबळे (करमाळा), सहसचिव डॉ अमित चोपडे (टेंभुर्णी), कोषाध्यक्ष डॉ. विशाल शेटे (करमाळा) यांची तर कार्यकारी सदस्यांमध्ये डॉ. सचिन गवळी (अकलूज), डॉ. मदन कांबळे (टेंभुर्णी), डॉ. दिग्विजय राऊत (अकलूज), डॉ. अमोल फडे (अकलूज), डॉ उत्कर्ष गांधी (नातेपुते), डॉ जागृती मगर (अकलूज) डॉ. गायत्री एकतपुरे (माळीनगर) यांची निवड झाली. माळशिरस, माढा, इंदापूर, करमाळा या तालुक्यातील ४० स्त्रीरोग तज्ज्ञ सदस्य आहेत. डॉ. सतीश दोषी, डॉ. सविता गुजर, डॉ भारत पवार, डॉ. विनोद शेटे, डॉ. मदन कांबळे, डॉ. प्रिया कदम यांनीही यापूर्वी अध्यक्षपद भूषवले आहे.



### आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते प्रथमेश इंगळे यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. ४ एप्रिल**

गुढीपाडवा व हिंदू नववर्षाचे औचित्य साधून आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांचे सुपुत्र प्रथमेश इंगळे यांचा कल्याणशेट्टी कुटुंबीयांच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त संपतराव शिंदे, नागेश कुंभार, ननू कोरबू, मोहन सोहनी, अविनाश मडीखांबे, लखन झम्पले, श्रीशैल गवंडी, श्रीकांत मलवे, विपुल जाधव, प्रसाद सोनार, ऋषिकेश लोणारी, सागर गोंडाळ, अविनाश क्षीरसागर उपस्थित होते.

### ग्रामपंचायत निवडणुकीकडे पुढारी व कार्यकर्ते यांचे लक्ष

**पिलीव दि ४ एप्रिल -**

पिलीव भागातील पिलीव, झिंजेवस्ती व सुळेवाडी ह्या तिन्ही गावच्या निवडणुकांची जोरदार तयारी झाली आहे. निवडणुका कधी जाहीर होणार याकडे पुढारी व कार्यकर्ते यांचे लक्ष लागले आहे. यादी जाहीर झाली २६ मार्चला अंतीम मतदार याद्यांचे प्रसिद्धीकरण झाले. त्यामुळे लवकरच निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होईल असा अंदाज होता. पण तो अद्याप जाहीर झाला नाही. यामुळे गावगाडयात सुरु झालेल्या तयारीला खो बसला आहे. सध्या तहसीलदार, मंडलाधिकारी, तलाठी या स्तरावरील मतदार याद्यांचे काम पुर्ण झाले आहे. पण हे अधिकारी सुद्धा निवडणूक कार्यक्रम कधी जाहीर होतोय हे आम्हलाही अदयाप माहीत नसल्याचे सांगत आहेत. यामुळे खरेतर ग्रामपंचायत निवडणुकीबाबतचा संभ्रम अद्यापही कायम आहे.

# बार्शीतील मानवाधिकार कार्यकर्ते आकाश दळवी यांची हद्दपारी रद्द

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.४ एप्रिल-**

पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी बार्शी तालुक्यातील मानवाधिकार कार्यकर्ते आणि खांडवी ग्रामपंचायतचे सदस्य आकाश दळवी यांच्यावरील सहा महिन्यांचा हद्दपारी आदेश रद्द केला आहे. अपीलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत असून उपविभागीय दंडाधिकारी सोलापूर क्र १ यांचा दि. १८ ऑक्टोबर २०२४ रोजी पारित केलेला हद्दपार आदेश संपुष्टात आणणेत येत असल्याचे त्यांनी आपल्या आदेशात म्हटले आहे.

विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांच्या न्यायालयात अपिलार्थी आकाश दळवी यांच्या अपिलाची सुनावणी झाली. दळवी यांच्यावतीने मानवी हक्कांकरिता लढणारे ॲड. तृणाल टोणपे तसेच त्यांची कायदेविषयक टीम ॲड. निकिता आनंदाचे, ॲड. राजश्री रेंगे-पाटील, ॲड. पूजा रानवडे, ॲड. रितू गायकवाड, राहुल मोगले, धनश्री डोहे, विदिशा वानखडे यांनी प्रकरणात मोलाची भूमिका बजावली.

हा निर्णय केवळ माझ्या कुटुंबासाठीच नव्हे, तर सर्व सामाजिक कार्यकर्त्यांसाठी न्यायाचा विजय आहे. राजकीय सूड आणि पोलिसी दडपशाहीला न्यायालयीन मान्यता मिळाली नाही. हा निर्णय व्यक्तिस्वातंत्र्य, न्यायसंगत प्रक्रिया आणि मानवाधिकारांच्या संरक्षणाचा आदर्श ठरला आहे.
**-आकाश दळवी, माहिती अधिकार कार्यकर्ता, खांडवी ता. बार्शी**

दाखल गुन्हे व त्यांचा हद्दपारीच्या आदेशाशी थेट संबंध आढळला नाही. हद्दपारी आदेश देण्याआधी प्रतिबंधक उपाययोजना केल्या नव्हत्या. जीवन आणि स्वतंत्रतेसाठी अत्यंत कठोर पावले उचलण्याआधी आवश्यक ती कारणे स्पष्ट केली गेली नव्हती. या मुद्द्यांवर आधारित पुणे विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांनी अपिलार्थी आकाश दळवी यांचा हद्दपारी आदेश रद्द करण्याचा आदेश दिला. यामुळे अपिलार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# बँक ऑफ इंडिया संघटनेची त्रैवार्षिक सर्वसाधारण सभा

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.४ एप्रिल-**




सोलापूर शहरात नुकतीच बँक ऑफ इंडिया अनु. जाती-जमाती, ओबीसी संघटना सोलापूर युनिट या संघटनेची त्रिवार्षिक ११ वी सर्वसाधारण सभा मोठ्या उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बँक ऑफ इंडियाचे विभागीय प्रमुख चंद्रशेखर मंत्री होते.संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आर. एम. खापर्डे, राष्ट्रीय सचिव मनोज गोयल, जे. के. कांबळे, बँकेचे माजी विभागीय प्रमुख श्री. प्रदीप कांबळे, गोवा प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य संजय बुरबुरे, उप विभागीय अधिकारी वेंकटेशराव उपस्थित होते. यावेळी शहर व जिल्ह्यातून १५० पेक्षा जास्त सदस्य उपस्थित होते. देशातील घडामोडी, बँकिंग क्षेत्रातील अडचणी, कर्मचारी -अधिकारी मंडळीना विविध सामाजिक राजकीय संस्था व व्यक्ती यांच्याकडून होणारा दबाव व त्रास इत्यादी बाबत चर्चा झाली.याप्रसंगी नवीन कार्यकारिणी मंडळ व समिती सदस्य यांची बिनविरोध निवड करण्यात आली. एस. आर. पुजारी-अध्यक्ष, ए. बी. उबाळे -कार्यकारी अध्यक्ष. एस. के. गुत्ते -उपाध्यक्ष, एस. के. गुत्ते -उपाध्यक्ष, एस. आर. गजभिये-सचिव ,हर्षवर्धन भुकतारे -सहसचिव या प्रमुख पदाशिवाय एकूण ३१ पदे ही पुढील ३ वर्षासाठी बिनविरोध निवडली. चंद्रशेखर घुडासकर यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी ही निवड प्रक्रिया केली. याप्रसंगी संघटनेकडून भेटवस्तू देण्यात आल्या. कार्यक्रमाचे संयोजन एस. आर. पुजारी, अशोक उबाळे, संतोष गुत्ते बोधीसत्व गाडे, शाम मुळे, बाबुलाल नदाफ, सुजल कावळे,निखिल नागरे, खंडागळे आर्दीनी केले होते. सूर्यभान गजभिये यांनी आभार मानले.

# होनमुर्गी येथे जंगली महाराजांची जयंती साजरी

## वडिलांच्या स्मरणार्थ शिरोळे परीवाराकडून ध्यानमंदिराची उभारणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल -**



होनमुर्गी येथील जन्मस्थान असणारे व पुण्यासह इतर अनेक शहरात मठांची निर्मिती करून अध्यात्मिक क्षेत्रात नावाजलेले जंगली महाराज यांच्या २०७ व्या जयंतीचे औचित्य साधून पुणे येथील उद्योजक ॲड. उमेश शिरोळे यांच्याकडून वडीलांच्या स्मरणार्थ सदगुरू जंगली महाराज ध्यानमंदिराची उभारणी करून लोकार्पण करण्यात आले.

गुरूवारी ३ एप्रिल रोजी सद्गुरु जंगली महाराज यांचे २०७ वी जयंती होती. यानिमित्त गुरूवारी या भव्य ध्यानमंदिराचे लोकार्पण आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच सुभाष तेली, सोसायटी चेअरमन बसवराज हसापूरे, माजी उपसरपंच राजकुमार कोळी, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष महमद कादरी, माजी सरपंच अमोगसिध्द वाघमारे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक रजाक निंबाळे, कुतुब पटेल, परमेश्वर वाघमारे, महेश नरसगोंडे, धर्मराव रामपूरे, राजकुमार उंबरजे, कुतुब हवालदार, अरूण मकाशे, रमेश शिरोळे, हर्षवर्धन शिरोळे, जिराज, विजया साळुंखे, राजश्री पवार, सरला सोनवणे, मिरा शिरोळे, सुजाता शिरोळे, चेतन साळुंखे, रमणराव पवार, देवयानी नगरकर आदि उपस्थित होते.

माझे वडील जंगली महाराजांचे भक्त होते. महाराजांच्या मठात विविध रूपात सेवा केल्याने महाराजांचे शिरोळे परीवारावर आशीर्वाद आहे. जंगली महाराजांच्या उपकारामुळे ते आमच्यासाठी कुलगुरूसारखे आहेत. शिरोळे घराण्याची जंगली महाराजांवर श्रध्दा असल्यामुळे त्यांच्या जन्मगावी होनमुर्गी येथे भव्य ध्यानमंदिराची उभारणी केली आहे.
**- ॲड. उमेश शिरोळे, उद्योजक, पुणे**

# खर्डीत नारळ विक्रीस बंदी; उल्लंघन केल्यास ५०० रुपये दंड

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ एप्रिल-**

तालुक्यातील खर्डी गावामध्ये नारळ विक्रीस बंदी घालण्यात आली आहे. जर याचे उल्लंघन केल्यास पाचशे रुपये दंड आकारण्यात येणार आहे.



दरवर्षी गुढीपाडव्याला हनुमान मंदिरात ग्रामस्थ विश्वस्त आणि पुजारी यांच्या समवेत पाडवा वाचन झाले. त्यावेळेस मंदिर प्रशासन, ग्राम प्रशासन याबाबत विविध विषयावर चर्चा करतात. या वर्षीपासून मंदिरामध्ये गाभारा प्रवेश मनाई, दुरून दर्शन आणि नारळ विक्री बंद करण्याचा निर्णय ग्रामस्थांनी सुचवला. त्यावर सर्व साधक- बाधक गोष्टींचा विचार करून समाधी मंदिर ट्रस्ट यांचे वतीने दोन ठराव संमत करण्यात आले. यामध्ये मंदिर परिसरात नारळ विक्री व फोडण्यास बंदी घालण्यात आली आहे. नारळाचे होणारे तुकडे त्याची कवचाले भाविकांच्या पायात घुसतात. तसेच शेष उर्वरित राहिलेला नारळाचा तुकडा हा अस्ताव्यस्त पडतो त्यातून दुर्गंधी निर्माण होते. त्या तुकड्यासाठी विविध प्रकारचे प्राणी,पक्षी माणसांवरती धावून येतात. सर्व बाबींचा विचार करून नारळ फोडण्यास मनाई करण्यात आली आहे. नारळ विक्रीसाठी सोलापूर, कोल्हापूर महामार्गावर विक्रेत्यांची भाऊगर्दी जमल्याने अनेक वाहनांच्या अडथळ्यामुळे भाविकांचे अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. या बरोबरच नारळ विक्रेत्यांची दंडेलशाही, मुजोरी वाढल्याने भाविक त्रस्त झाले होते. वाहने पार्किंग करताना अनेक वाद विवाद होऊ लागले या सर्व गोष्टींचा त्रास ग्राम प्रशासन व मंदिर प्रशासनाला होऊ लागल्याने नारळ व फुलहार विक्री वरती पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. सदर बंदीचे उल्लंघन केल्यास पाचशे रुपये दंड आकारण्याचे सर्वानुमते ठरले. यावेळी पोलीस पाटील प्रतिनिधी बालाजी रोंगे, सरपंच भगवान सव्वाशे, उपसरपंच शरद रोंगे, बाळासो मोकाशी, हणमंत मोकाशी,बापू केसकर, हणमंत केसकर, मोहन कुलकर्णी उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### कमलादेवी शिंगारे

**सोलापूर, दि.४ एप्रिल-**



श्रीमती कमलाबाई रेवणसिध्द शिंगारे (वय-८३) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. रूद्रभुमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. शिंगारे ज्वेलर्सचे श्री सोलापूर सराफ असोसिएशनचे उपाध्यक्ष सिध्दाराम शिंगारे यांच्या मातोश्री होत.

### रुक्मिणी दत्तू

**मंगळवेढा, दि. ४ एप्रिल-**



दत्तू गल्ली येथील रुक्मिणी हरिभाऊ दत्तू (वय-५३) यांचे हृदयविकाराने गुरुवारी दि. ३ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, दोन मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. धनश्री मल्टीस्टेट बँक शाखा पंढरपूरचे मॅनेजर महेश दत्तू यांच्या त्या मातोश्री होत.

### कमलाबाई कुलकर्णी

**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**



कमलाबाई वसंत कुलकर्णी (वय ८३) यांचे शुक्रवारी ४ एप्रिल रोजी दुपारी साडेचार वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी ५ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता मोदी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार होतील. त्यांच्यामागे ३ मुले व १ मुलगी जावई व नातवंडे असा परिवार आहे. राजश्री मेडिकलचे मालक दिलीप कुलकर्णी यांचे ते मातोश्री होत.

### विजयकुमार पाथरुटकर

**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**



बाळीवेस वडार गल्ली येथील रहिवाशी विजयकुमार धोंडिबा पाथरुटकर (५४) यांचे शुक्रवारी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, तीन मुली, एक मुलगा असा परिवार आहे. विजयकुमार पाथरुटकर हे दयानंद महाविद्यालयात लिपिक पदावर कार्यरत होते. तसेच वडार समाज हनुमान जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे ट्रस्टी होते.

### तरुणावर प्राणघातक हल्ला; आरोपींमध्ये तिघांचा समावेश

**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

पूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून जैद दलाल आणि त्याच्या साथीदारांनी तरूणावर प्राणघातक हल्ला केला. ही घटना बुधवारी, २ एप्रिल रोजी मध्यरात्री च्या सुमारास हुतात्मा कुर्बान हुसेन हॉलच्या मागे घडली. ४२ वर्षीय उमर फारूख मकबूल बडेपीर असं जखमीचं नांव आहे. या प्रकरणी दाखल गुन्ह्यातील आरोपीतांमध्ये हत्तुरे कंपनीतील तिघांचा समावेश असल्याचं सांगण्यात आले. जैद दलाल, उमर मिरजकर, सद्दाम हत्तुरे, सुफियान हत्तुरे, मैनुद्दीन हत्तुरे, शोएब शेख आणि ०२ अनोळखी इसम अशी आरोपींची नांवं आहेत.याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, येथील मुस्लिम पाच्छा पेठ कुर्बान हुसने हॉलचे मागील रहिवासी उमर फारूख मकबूल बडेपीर आणि जैद दलाल यांच्यात, २८ फेब्रुवारी रोजी तक्रार झाली होती. त्या भांडणाचा रोष मनात धरून जैद दलाल आणि त्याच्या साथीदारांनी मोटरसायकलीवर घरापर्यंत येऊन उमर फारुख यास जीवे ठार मारण्याचे उद्देशानं हातामध्ये तलवार-कोयता घेऊन त्याच्यावर तलवारीने वार करून गंभीर जखमी केले. याप्रकरणी जखमी उमर फारूख मकबूल बडेपीर याच्या फिर्यादीनुसार जेलरोड पोलिसांकडं आठ आरोपीविरुद्ध खूनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल झालाय. महिला सहायक पोलिस निरीक्षक भांबिष्टे या गुन्ह्याचा अधिक तपास करीत आहेत.

# निवडणूक कामाबाबत शिक्षकाविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. ४ एप्रिल-**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीवेळी पंढरपूर विधानसभा मतदारसंघात बी.एल.ओ. म्हणून सहनिवडणूक अधिकारी यांनी नगरपालिका शिक्षक संजय चेळेकर यांची नियुक्ती केली असताना आदेशाची अवहेलना करत सदरची ड्यूटी करण्यास नकार दिल्याप्रकरणी त्यांच्याविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी निवडणूक नायब तहसिलदार जयश्री विरभद्र स्वामी (वय ५६) ह्या गेल्या एक वर्षापासून निवडणूक तहसिलदार म्हणून काम पाहत आहेत. माहे नोव्हेंबर २०२४ मध्ये २५२ पंढरपूर विधानसभा मतदारसंघात निवडणूक असल्याने निवडणूक प्रक्रिया व्यवस्थित पार पाडण्यासाठी सहाय्य निवडणूक अधिकारी तथा तहसिलदार मदन जाधव यांनी दि.१२/८/२०२४ रोजी नगरपरिषद शाळेचे उपशिक्षक संजय चेळेकर यांची २५२ पंढरपूर विधानसभा मतदार संघातील मतदान केंद्र क्रमांक १९७ साठी बी.एल.ओ. म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. मात्र त्यांनी ड्यूटी नाकारल्यामुळे त्यांच्याकडील अर्चना जनबंधू प्रशासन अधिकारी नगरपरिषद प्राथमिक शिक्षण मंडळ यांनी निवडणूक कार्यालयाकडील जावक क्र.अन्वये आरोपीने मतदार यादी प्रसिध्द करण्यास नकार दिला आहे. असे लेखी पत्राव्दारे कार्यालयास कळविले होते. शिक्षण मंडळ प्रशासन अधिकारी अर्चना जनबंधू यांची विभागीय चौकशी केली नाही, म्हणून सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मदन जाधव यांनी वरील घडलेल्या प्रकाराबाबत चेळेकर यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्याकरिता निवडणूक कार्यालयास प्राधीकृत केले असल्याने त्यांच्या विरुध्द फिर्याद दाखल करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.




### जातीवाचक शिवीगाळ प्रकरणी दोघाविरुध्द गुन्हा

**मंगळवेढा दि. ४ एप्रिल -**

हिवरगाव (ता. मंगळवेढा) येथील कामसिध्द मंदिरामध्ये दर्शनाकरिता गेल्यावर महाप्रसाद घेताना एकास जातीवाचक बोलून तुम्हाला पावती फाडायला नको फक्त फुकट जेवायला येता असे म्हणून जातीवाचक शिवीगाळ करुन दगडाने मारुन जखमी केल्याप्रकरणी ज्ञानेश्वर नामदेव पडवळे, गणेश पांडुरंग पडवळे या दोघा विरुध्द ॲट्रासिटीचा गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी प्रकाश बिरा सावंत (वय २८ वर्षे,रा.खुपसंगी) हे दि.२ रोजी दुपारी २.३० वाजता हिवरगाव येथील कामसिध्द मंदिरामध्ये दर्शनाकरिता व महाप्रसाद घेण्याकरिता गेले होते. यावेळी आरोपी ज्ञानेश्वर पडवळे याने जातीवाचक बोलून तुम्हाला पावती फाडायला नको वाटतं, फक्त फुकट जेवायला येता असे म्हणाला. त्यानंतर फिर्यादी खुपसंगी गावात स्टँडवर असताना आरोपीचा चुलत भाऊ गणेश पडवळे तेथे आले. त्यावेळी फिर्यादीने आरोपीस तु माझे जातीवरुन का बोलला आहेस? असे म्हणत असताना तेथे पडलेला दगड घेवून फिर्यादीच्या डाव्या डोळ्याजवळ मारुन जखमी केले, तुला लय मस्ती आली आहे का? असे म्हणून शिवीगाळी, दमदाटी केली असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास डी.वाय.एस.पी.विक्रांत गायकवाड हे करीत आहेत.

### गाडी लावण्यावरून वाद; सात जणांविरुद्ध गुन्हा

**बार्शी, दि. ४ एप्रिल-**

बार्शी शहरातील मंगळवार पेठ टेकडी भागात एक विचलित करणारी घटना समोर आली आहे. लॉन्ड्री व्यवसाय करणारे राजू दत्तात्रय वाघमारे (वय ५२, रा. येडाई विहीरीजवळ, ताडसौंदणे रोड, बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सातजणांविरुद्ध धमकी, मारहाण आणि दुकानाचे नुकसान केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. ३० मार्च रोजी संध्याकाळी साडेपाचच्या सुमारास वाघमारे आपल्या लॉन्ड्री दुकानात काम करत असताना रहेमान गनी सौदागर यांनी त्यांची मोटारसायकल दुकानासमोर लावली होती. वाघमारे यांनी गाडी बाजूला लावण्याची विनंती केल्यावर, सौदागर यांनी अर्वाच्च भाषेत बोलून वाद घालण्यास सुरुवात केली. यानंतर त्यांच्या सोबत आलेल्या सहाजणांनी मिळून वाघमारे यांना धमकी दिली व त्यांच्या दुकानात घुसून कपडे अस्ताव्यस्त फेकून नुकसान केले. झटापटीत वाघमारे यांच्या खिशातील ४००० रुपये गहाळ झाले असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणी प्रथम वाघमारे यांनी घाबरलेल्या अवस्थेत चार जणांविरुद्ध तक्रार दाखल केली होती. मात्र, मानसिक धक्क्यातून सावरल्यानंतर त्यांनी एकूण सात आरोपींची नावे पुन्हा स्पष्ट केली असून यामध्ये रहेमान गनी सौदागर, राजु मुनाफ सौदागर, समीर उस्मान सौदागर, फरान राजु सौदागर, जुनेद अब्दुल रजाक, जमील उस्मान सौदागर तसेच रहेमानचा मुलगा यांचा समावेश आहे. पोलीस ठाण्यात कलम ११५ (२) ३५२ , ३५१(२)(३)३(५) अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

## संक्षिप्त वृत्त

### जलसंपदा मंत्री डॉ.राधाकृष्ण विखे-पाटील यांचा सोलापूर जिल्हा दौरा



**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

जलसंपदा मंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील हे शनिवार ५ एप्रिल रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्याचा दौरा कार्यक्रम याप्रमाणे : ५ एप्रिल रोजी अहिल्यानगर येथून सोलापूर विमानतळ येथे सकाळी ९.४५ वा आगमन. सकाळी १० वा. शासकीय विश्रामगृह येथे राखीव. सकाळी १०.१५ वा. शासकीय विश्रामगृह सोलापूर येथून मोटारीने सांगोलाकडे प्रयाण. सकाळी ११.३० वा. सांगोला महाविद्यालयातील २१ व्या महाराष्ट्र सिंचन परिषदेस उपस्थिती. दुपारी १२.३० वा. सांगोला महाविद्यालय येथून मोटारीने भाजपा जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार यांचे निवासस्थानाकडे प्रयाण. दुपारी १२.४० त्यांच्या निवास्थानी आगमन व राखीव. दुपारी १.३० वाजता सांगोला येथून मोटारीने सोलापूर विमानतळाकडे प्रयाण. दुपारी २.४५ वा सोलापूर विमानतळ येथे आगमन व राखीव. दुपारी ३ वा. सोलापूर येथून विमानाने शिर्डीकडे प्रयाण.



### चंडक प्रशालेची रंगभरण व हस्ताक्षर स्पर्धेत प्रथम क्रमांकाची पारितोषिके

**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ संचलित बाळे येथील ज.रा. प्रशालेने सोलापूर जिल्हा कलाध्यापक संघाच्या वतीने घेण्यात आलेल्या सुंदर हस्ताक्षर व रंगभरण स्पर्धेत जिल्ह्यातून प्रथम क्रमांकाची पारितोषिके मिळविली. इयत्ता पाचवी-सहावी गटातून रंगभरण स्पर्धेत सई नारायण थोरात हिने व सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत तनुजा अमर सोनटकले हिने प्रथम क्रमांकाची पारितोषिक पटकाविली. तसेच इयत्ता सातवी आठवी रंगभरण स्पर्धेत सातवीतील विद्यार्थिनी विद्या मिथुन पवार हिने देखील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. या विद्यार्थ्यांना कलाशिक्षक मुकुंद मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच श्लोक राजुरे, मंजुळा भवर, अंजली ढेकणे, सायली गुरव, खंडू वाघमोडे, धनराज मगरे, श्रेया निर्मळ, दिव्या गावडे, रसिका उपाध्ये, रेणू गुरव, श्रावणी माशाळ,जानव्ही क्षीरसागर, संस्कृती माने, माहेश्वरी पिंगळे,आराध्या पाटणकर, अंजली भवर आदींनी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविली. या यशाबद्दल यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेच्या मार्गदर्शिका निर्मलाताई ठोकळ, संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ, सचिवा शिल्पाताई ठोकळ, मुख्याध्यापक मोहनराव घोडके आदींनी अभिनंदन केले.



### हॅप्पी स्कूल प्रोजेक्टसाठी करंजकर विद्यालयाची निवड

**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

हॅप्पी स्कूल प्रोजेक्ट २०२४-२५ करिता इनरव्हील क्लब ऑफ सोलापूर स्टार लेटकडून करंजकर विद्यालयाची निवड करण्यात आली. त्याकरिता संस्थेच्या अध्यक्षा कल्पना दरगड व खजिनदार सोनिया चंकेश्वरा यांच्या प्रयत्नातून शाळेतील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना गणवेश, शूज संगणक सेट टेबल, क्रिडा साहित्य, कॅरम बोर्ड, दोन चेस रिंग सिटिंग, बेंच, आसन पट्या, ग्रीन बोर्ड, व्हाइट बोर्ड, दोन सीलिंग फॅप आदी साहित्य तसेच स्वच्छतागृह रंगरंगोटी करून दिले. शेवटी विद्यार्थ्यांना मिष्ठान्न खाऊ वाटप करण्यात आले. यासाठी संस्थेच्या सचिवा मुख्याध्यापक राजश्री तडकासे, पर्यवेक्षक पवार यांनी समन्वयक म्हणून कामकाज पाहिले असून यासाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# पाणीपुरवठ्याचे दिवस कमी करण्यासाठी सल्लागार संस्थेची लवकरच नियुक्ती

- महापालिका आयुक्त डॉ. ओंबासे यांची माहिती
- प्राणी संग्रहालयासाठी १५ कोटीचा प्रस्ताव डीपीसीकडे पाठविला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

सोलापूर शहराला सध्या चार ते पाच दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. पाणीपुरवठ्याचे दिवस कमी करण्यासाठी दोन सल्लागार संस्थेने संमती दर्शवली आहे. या सल्लागार संस्थेची लवकरच नियुक्ती करण्यात येणार आहे. विजापूर रोडवरील पाणी संग्रहालयासाठी १५ कोटीचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे पाठविला आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.





सोलापूर शहराला सध्या चार ते पाच दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. काही भागात पाणीपुरवठा विस्कळीत होण्याच्या तक्रारी येतात. यासाठी काही दिवसापूर्वी पाणीपुरवठ्यातील तज्ज्ञ अधिकारी आणि सल्लागार संस्था (एजन्सी) यांची बैठक घेतली होती. त्यांच्या काही सूचना आल्या आहेत. दरम्यान, दोन सल्लागार संस्था (एजन्सी) यासाठी सकारात्मक आहेत. नागपूर येथील डी आर. ए. कन्सल्टन्सी, सांगली येथील अमोल मवठे या दोन सल्लागार संस्था निश्चित करण्यात येणार आहेत. वर्क ऑर्डर मंजुरीचा प्रस्ताव आहे. पंधरा दिवसात त्यांना वर्क ऑर्डर देण्यात येईल. त्यानंतर या सल्लागार संस्था शहरातील अस्तित्वात असलेल्या वितरण व्यवस्थेचा अभ्यास करणार आहे त्यानंतर आवश्यक ते सादरीकरण करणार आहेत. सादरीकरणास मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्षात पंधरा दिवसांनी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या सल्लागार संस्था शहरातील दोन ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर चाचणी करणार आहेत. दरम्यान, विजापूर रोडवरील प्राणी संग्रहालयाची मान्यता पुन्हा मिळविण्यासाठी सुमारे ३५ त्रुटींची पूर्तता करावयाची आहे. त्यापैकी बहुतांश त्रुटींची पूर्तता करण्यात आली आहे. उर्वरित पूर्तता करण्यासाठी सुमारे १५ कोटीचा निधी आवश्यक आहे. या १५ कोटीच्या निधीसाठी जिल्हा नियोजन समितीकडे महापालिकेने प्रस्ताव पाठविला आहे. त्याचबरोबर सीएसआर फंड मिळविण्याचा प्रयत्न आहे. रिलायन्स कंपनी, एनटीपीसी आणि इतर काही बँकांकडून सीएसआर फंडातून निधी मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले.

**● १५ एप्रिलनंतर शहर विकास आराखडा संदर्भात सुनावणी**

सोलापूर शहर विकास आराखडा संदर्भात नागरिकाच्या सूचना हरकती प्राप्त झालेल्या आहेत. त्याची सुनावणी घेण्यासाठी शासनाने समिती गठीत केली आहे. या समितीकडून येथे १५ एप्रिल पासून सूचना व हरकतींवर सुनावणी घेण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

**● दुहेरी जलवाहिनीची लवकरच चाचणी**

उजनी सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम येत्या पंधरा दिवसात पूर्ण करण्याचे मक्तेदाराला सांगण्यात आले आहे. त्यानंतर दुहेरी जलवाहिनीची चाचणी करण्यात येणार आहे. जलशुद्धीकरण केंद्रासाठीच्या पाकणी येथील जागे संदर्भात प्रक्रिया सुरू आहे, असेही महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले.

## चलन देण्याचा अधिकार केवळ पोलिस अधिकाऱ्याला

● गोव्याप्रमाणे सोलापुरातही अंमलबजावणीची गरज

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल -**

गोव्यामध्ये बेशिस्त वाहनचालकास चलन देण्याचा अधिकार हा पोलिस अधिकाऱ्यांनाच देण्यात आला आहे. त्याप्रमाणे सोलापूरातही चलन देण्याचा अधिकारी पोलिस अधिकाऱ्यांनाच देण्यात यावा अशी अपेक्षा वाहनधारकांमधून व्यक्त करण्यात येत आहे.

गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी गोव्यामध्ये बेशिस्त वाहनचालकांना दिवसभरात चलन देण्याचा अधिकारी केवळ पोलिस निरीक्षकाला तर रात्रीच्यावेळी पोलिस निरीक्षक आणि पोलिस उपनिरीक्षकांनाच दिला आहे. इतर पोलिसांना चलन देण्याचा अधिकार नसणार आहे. तसा प्रयत्न कुणी केल्यास त्या पोलिसांचा फोटो संबंधित पोलिस स्थानकाला नागरीकांनी पाठवून दिला तर त्या पोलिसाला निलंबित करण्याचा आदेश मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी दिले आहेत. त्याची अंमलबजावणीदेखील सुरु करण्यात आली आहे. अशाचप्रकारे सोलापुरातदेखील बेशिस्त वाहनचालकांवर चलन देण्याचा अधिकार हा पोलिस अधिकाऱ्यांनाच देण्यात यावा. पोलिस हवालदार किंवा इतर कर्मचाऱ्यांना नसावा अशी अपेक्षा सोलापुरातील वाहनचालकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे चौकाचौकात तसेच चौक सोडून इतरत्र थांबून वाहनचालकांवर कारवाई करणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांवर अंकुश बसेल अशी अपेक्षा अनेक वाहनधारकांनी बोलून दाखविली.

## दुधाच्या कॅन्डासह दुचाकी चोरणाऱ्यास अटक

शहर गुन्हे शाखेकडून चोरीच्या ४ दुचाकी जप्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल -**

सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयातील शहर गुन्हे शाखेच्या पथकाने दुचाकीला लावलेले दुधाचे कॅन्डासह दुचाकी चोरून नेणाऱ्यास अटक करून त्याच्याकडून चोरीच्या ४ दुचाकी जप्त केल्या.

बापूराव श्रीमंत सोंडगे (वय ३८, रा. आष्टे, ता. मोहोळ) असे अटक करण्यात आलेल्या चोरट्याचे नाव आहे. सोंडगे यास फौजदार चावडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून त्याच्याकडून फौजदार चावडी, एमआयडीसी, कळंब (धाराशिव), स्वारगेट (पुणे) पोलिस ठाण्यातील गुन्हे उघडकीस आले आहेत.

प्रभाकर अशोक चौगुले (वय ४१, रा. मुंढेवाडी, ता. मोहोळ) यांचा दुध विक्रिचा व्यवसाय आहे. १५ मार्च रोजी सकाळी चौगुले हे जुनी मिल चाळ येथे त्यांची दुचाकीला ८० लिटर दुध असलेले कॅन्ड लावून चाळीमध्ये दुधाचे वरवे देण्यासाठी गेले होते. त्यावेळी अज्ञात चोरट्याने त्यांची दुचाकी चोरून नेली होती. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर या गुन्ह्याच्या अनुषंगाने शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तपास करून सीसीटीव्हीचे चित्रीकरण तपासून तसेच खबऱ्यामार्फत बातमी काढून बापूराव सोंडगे यास पुणे नाका येथून ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी केल्यानंतर त्याने दुचाकी चोरल्याचे सांगितले. त्याच्याकडे अधिक चौकशी केल्यानंतर त्याने धाराशिव व पुणे येथूनदेखील दुचाकी चोरल्याचे सांगितले. पोलिसांनी त्याच्याकडून चोरीच्या चार दुचाकी जप्त केल्या.



ही कारवाई पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक दत्तात्रय काळे, पोलिस अमंलदार अंकुश भोसले, शैलेश बुगड, राजकुमार वाघमारे, अभिजित धायगुडे, वसीम शेख, सायबर पोलिस ठाण्याकडील प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड यांनी केली.

## गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीशी श्रीकाशी जगद्गुरु

● माढेकर शिवाचार्य; डॉ.कोलूर यांच्या हस्ते शिष्यवृत्तीचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील गुणवंत विद्यार्थ्यांचे पैशाअभावी शिक्षण थांबू नये यासाठी श्रीकाशी जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी उदार अंतःकरणाने ही शिष्यवृत्ती चालू केली, असे गौरवोद्गार श्री प्रभूदेव शिवाचार्य गुरुकांतेश्वर शिवाचार्य माढेकर महाराज यांनी काढले.



श्री श्री श्री १००८ काशी जगद्गुरू विश्वाराध्य ज्ञानसिंहासन जंगमवाडी मठ, वाराणसी यांच्याकडून प्रतिवर्षी श्रीकाशी जगद्गुरू विश्वेश्वर शिवाचार्य शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात येते. याप्रसंगी ते बोलत होते. यशोधरा हॉस्पिटलच्या ऑडिटोरियममध्ये झालेल्या या कार्यक्रमात सोलापूरातील विविध क्षेत्रात उच्चशिक्षण घेणाऱ्या सोळा विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्ती योजनेचे वार्षिक बारा हजार रुपयांचे धनादेश वितरित करण्यात आले. यावेळी यशोधरा हॉस्पिटलचे चेअरमन डॉ. बसवराज कोलूर, ग्रुप सीइओ डॉ. किशोर पुजारी यांची उपस्थिती होती. मतसिद्धय्या स्वामी हिरेमठ यांनी मनोगत व्यक्त केले. श्रीकाशीपीठाच्या शिष्यवृत्ती योजनेमुळे आमच्या जीवनात नक्कीच चांगले दिवस येतील, असे मनोगत शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.

रेवणसिद्ध वाडकर यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन राजेंद्र बलसुरे आणि चिदानंद मुस्तारे यांनी आभार मानले.

## उमाबाई श्राविका महाविद्यालयास राष्ट्रीय उत्कृष्ट शाखा पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

उमाबाई श्रविका विदयालय व कनिष्ठ महाविद्यालयास मानाचा राष्ट्रीय उषाताई मोहाडीकर उत्कृष्ट शाखा पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आला.



नुकत्याच कोल्हापूर येथे झालेल्या अखिल भारतीय साने गुरुजी कथामालेच्या ५७ व्या वार्षिक अधिवेशनामध्ये कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते व अखिल भारतीय साने गुरुजी कथामालाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्यामराव कराळे, लालासाहेब पाटील, सुनील पुजारी, अशोक म्हमाने, गजानन कोठेवार, यांच्या प्रमुख उपस्थितीत प्राचार्य विलास लेंगरे, प्रा. प्रतिभा कंगळे, प्रा.गणेश लेंगरे, प्रा.अर्चना कानडे, व सर्व शिक्षक यांनी सन्मानपत्र, शाल, पुस्तक व ५००० रुपये रोख या स्वरूपात पुरस्कार स्वीकारला.

यानिमित्त कथामालेचे प्रा.अविनाश मुळकुटकर, प्रा.सोमनाथ राऊत, प्रा.प्राजक्ता काळे, प्रा.कल्याणप्पा हायगोंडे उपस्थित होते. हा राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे विश्वस्त यतीन शहा, अंजली शहा, रोहिणी शहा, करण शहा, अतुल शहा, सीईओ देवई शहा, वरिष्ठ दीप्ती शहा, प्राचार्य सुकुमार मोहोळे, उपप्राचार्या अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ आदींनी अभिनंदन केले.

## आरटीई प्रतीक्षा यादीतून २२३ बालकांचा प्रवेश

### १६६ बालकांनी प्रवेश नाकारला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क अधिकार कायद्यांतर्गत (आरटीई) पहिल्या प्रतीक्षा यादीतून निवड झालेल्या ४४२ पैकी २२३ बालकांनी प्रवेश घेतला आहे. तर जिल्ह्यात बालकांनी प्रवेश नाकारल्याने १६६ जागा शिल्लक आहेत. एकूण २८६ शाळा असून प्रतिक्षा यादीत ४४२ बालकांची निवड झाली. त्यातून २२३ बालकांनी प्रवेश घेतला आहे.

आरटीईनुसार दुर्बल व वंचित घटकातील बालकांना स्वयं अर्थसहाय्यित शाळा, विनाअनुदानित शाळा, पोलिस कल्याणकारी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवर प्रवेशासाठी १४ फेब्रुवारी ते १० मार्च या कालावधीत ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली. निवड झालेल्या १ हजार ८२२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. निवड होऊनही शाळांशी संपर्क न केलेल्या बालकांना वगळून शिल्लक जागांसाठी प्रतीक्षा यादीतील प्रवेशासाठी ४४२ विद्यार्थ्यांची निवड झाली होती. २४ मार्चपर्यंत त्यापैकी १३६ बालकांनी प्रवेश घेतला. दुसऱ्या फेरीच्या मुदतीत एक एप्रिलपर्यंत ८७ बालकांनी प्रवेश घेतला आहे.

**शहर व जिल्ह्यातील प्रवेशाची स्थिती**
(एकूण शाळा, जागा, प्रवेश व शिल्लक प्रवेश)

- अक्कलकोट : १३, १४ , ५ , ९.
- बार्शी : २९, ७०, २७ , ४३
- करमाळा : २६, ३३, २१, १२
- माढा : ३२, ३८, २२, शिल्लक १६
- माळशिरस : ४७, ४०, २२, १८.
- मंगळवेढा : ११, १०, ३, ७.
- मोहोळ : १७, २६, १६, १०
- पंढरपूर : ४७, ४९, १८, २८.
- सांगोला : २२, २९, २२, ७.
- उत्तर सोलापूर : १७, २९, २२, ७
- दक्षिण सोलापूर : ९, १९, ८, ११
- सोलापूर शहर १ : ७, ३५, २३.
- सोलापूर शहर २ : ९, ५०, १९,३१.

**पंढरपूर शहरात सर्वाधिक ४७ जागा**

सोलापूर जिल्ह्यात आरटीई अंतर्गत ११ तालुके व सोलापूर शहरापैकी माळशिरस आणि पंढरपूर शहरात सर्वाधिक ४७ जागा आहेत. तर सर्वात कमी सोलापूर शहरमध्ये ७ जागा आहेत. सर्वाधिक बार्शी तालुक्यात ७० जागा आहेत, तर सर्वात कमी मंगळवेढा येथे १० जागा आहेत. तर शिल्लक जागा बार्शी तालुक्यात सर्वाधिक ४३ जागा आहेत. तर सर्वात कमी उत्तर तालुक्यात ७ जागा आहेत.



**दुसऱ्या फेरीची मुदत संपली**

आरटीई अंतर्गत २५ टक्के प्रवेशप्रक्रिया १४ फेब्रुवारी ते १० मार्चपर्यंत ऑनलाईन राबविण्यात आले. यावेळी २४ मार्चपर्यंत पहिली प्रवेश फेरी होती. तर त्यानंतर दुसऱ्या फेरीसाठी प्रतीक्षायादीतील मुलांना संधी देण्यात आली. एक एप्रिलपर्यंत दुसरी फेरी होती. ती मुदत संपली आहे.

## पुणे-सोलापूर रस्त्यासाठी महामार्ग पोलिसांचा वाहतूक आराखडा

● कोंडी सोडविण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांची मदत घेण्यात येणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

पुणे ते सोलापूर महामार्गावरील अपघात स्थळे आणि अपघाताची कारणे यांचा सेव्ह लाइफ फाउंडेशनच्या सहकार्याने अभ्यास करून महामार्ग पोलिसांनी विशेष वाहतूक आराखडा तयार केला आहे. या आराखड्यानुसार वाहतूककोंडी सोडविण्यासाठी या महामार्गावरील स्थानिक स्वराज्य संस्थांची मदत घेतली जाणार आहे. तसेच, अपघात स्थळांच्या ठिकाणी रम्बल स्ट्रप्स लावण्यात येणार आहे. त्यामुळे या मार्गावरील प्रवास सुकर होणार आहे.

पुणे ते सोलापूर या सुमारे अडीचशे किलोमीटर अंतरावरील वाहतूककोंडी सोडविण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांसाठी विशेष आराखडा तयार केला आहे. सेव्ह लाइफ फाउंडेशनच्या सहकार्याने हा आराखडा बनविण्यात आला आहे.

या महामार्गावरील सतत अपघात होणारी ठिकाणे आणि गर्दीचे चौक यांचा अभ्यास करण्यात आला आहे. महामार्गालगत असणारी गावे, बाजार, उपाहारगृह, वर्तुळाकार चौक यामुळे वाहतूककोंडी होते. लोणी काळभोरपासून उरुळी कांचन, वरवंड, पाटस, कुरकुंभ, रावणगाव, भिगवण, डाळज, टेंभुर्णी, मोडनिंब, मोहोळ या प्रमुख गावांच्या ठिकाणी कोंडी होत असते. ही कोंडी सोडविण्यासाठी चौकांच्या परिसरातील अतिक्रमणे काढण्यात येणार आहेत.

या ठिकाणी वाहनांचा वेग कमी करण्यासाठी रम्बल स्ट्रप्स लावल्या जाणार आहेत. प्रमुख चौकांमध्ये प्रकाश व्यवस्था आणि दिशादर्शक फलकांची व्यवस्था करण्यात येणार आहे. ही कामे करताना स्थानिक स्वराज्य संस्थांची मदत घेण्याचे या अहवालात सुचविण्यात आले आहे.

**आराखड्यात सुचविलेल्या उपाययोजना...**

- प्रमुख चौकांतील अतिक्रमणे काढणे
- रस्त्यांचे रुंदीकरण
- वाहनांचा वेग कमी करण्यासाठी रम्बल सट्रप्स लावणे
- गावे आणि प्रमुख चौकांमध्ये प्रकाश व्यवस्था करणे
- ठिकठिकाणी दिशादर्शक फलक लावण्यात यावेत
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मदतीने



**विशेष वाहतूक आराखड्याची तातडीने अंमलबजावणी**

पुणे ते सोलापूर महामार्गावरील वाहतूककोंडी सोडविण्यासाठी तयार करण्यात आलेल्या विशेष वाहतूक आराखड्याची तातडीने अंमलबजावणी केली जाणार आहे. त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था आणि खासगी संस्थांची मदत घेण्यात येणार आहे. त्या दृष्टीने संबधितांशी पत्रव्यवहार सुरू करण्यात आला आहे.

**- विक्रांत देशमुख, महामार्ग पोलीस अधीक्षक.**

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## दुचाकी वाहनांच्या नंबरची नविन मालिका सोमवारपासून सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल -**

दुचाकी वाहनांच्या नंबरची नविन मालिका (एमएच १३ ईयू) सुरु होणार असून सोमवार दि. ७ एप्रिलपासून सुरु होणार असून मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक राखून ठेवण्यासाठी इच्छुक वाहनधारकांनी प्रादेशिक परिवहन कार्यालयात रकमेचा डीडी जमा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयात लवकरच दुचाकी वाहनांसाठी नविन मालिका सुरु करण्यात येणार आहे. वाहनांची नविन मालिका चालू होण्याच्या दिवशी कार्यालयाध्ये मोठ्या प्रमाणावर इच्छुकांची गर्दी होते. त्यामुळे नागरीकांना त्रास होतो. नागरीकांचा त्रास कमी करण्यासाठी तसेच वाहनधारकांना हवा असणारा आकर्षक नोंदणी क्रमांक उपलब्ध असल्यास त्यांना तो सुलभतेने मिळावा म्हणून ७ एप्रिल रोजी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी विहित नमुन्यातील अर्ज आणि डीवाय आरटीओ सोलापूर यांच्या नावाचा डीडी (केवळ क्र. १६ अन्वये जारी झालेले डीडी) पत्त्याच्या पुरावा, आधार लिंक मोबाईल नंबर, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह स्वतः जमा करावा असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून करण्यात आले आहे.



## ▶▶ क्राईम वृत्त...

### उळेगावात पूर्ववैमनस्यातून एकास सात जणांची मारहाण

**सोलापूर, दि. ४ एप्रिल -**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील उळेगावात पूर्ववैमनस्यातून एकास शुक्रवारी सायंकाळी ७.१५ वाजता सात जणांनी मारहाण केली. सचिन भिमाशंकर माने (वय ३२, रा. उळे ता. द. सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. सचिन आणि मलकारसिध्द व राम जाधव यांच्यात गुरुवारच्या घटनेपूर्वी तक्रार झाली होती. या तक्रारीचा राग मनात धरून ते सचिनवर चिडून होते. दरम्यान गुरुवारी रात्री सचिन गावातील राहत्या घरासमोर थांबला असता, त्यास म लकारसिध्द व राम जाधवसह इतर पाच जणांनी लाकडाने मारल्याने डाव्या डोळ्याच्या बाजूला जखम झाली. तसेच दगड आणि लाथाबुक्यांनी मारहाण केल्याने सर्वांगास मुकामार लागल्याने तो स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

### मंडपाचा अँगल अंगावर पडल्याने एकजण जखमी

**सोलापूर, दि. ४ एप्रिल -**

कुंभारी भाग दोन येथील नवीन विडी घरकुल येथे मंडपाचे काम करताना अचानक अँगल अंगावर पडल्याने एकजण जखमी झाला. हा प्रकार गुरुवारी रात्री आठ वाजता घडला. रमेश लक्ष्मण करे (वय ४४, रा. जुना विडी घरकुल, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. नवीन विडी घरकुल येथे कार्यक्रमानिमित्त रमेश हा मंडप उभारण्याचे काम करत होता. त्यावेळी अचानक मंडपाचा अँगल पडल्याने उजव्या कानाजवळ जखम झाली आहे. विनोद गायकवाड याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### जावयाला सासरवाडीत घरगुती कारणातून मारहाण

**सोलापूर, दि. ४ एप्रिल -**

घरगुती कारणातून सासरवाडीत गेलेल्या जावयाला बेदम मारहाण करण्यात आली. हा प्रकार दोन एप्रिल रोजी रात्री दहा वाजता मंगळवेढा तालुक्यातील जुनोनी गावात घडला. दत्तराज मेकप्पा मोरे (वय २६, रा. एकविरा नगर, मंगळवेढा) असे मारहाण झालेल्या जावयाचे नाव आहे. दत्तराज याची मंगळवेढा तालुक्यातील जुनोनी ही सासरवाडी आहे. तो दोन एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास सासरवाडी म्हणजेच जुनोनी येथे गेला होता. तेथे घरगुती कारणातून झालेल्या तक्रारीतून आरेश नवघरे व इतर तीन जणांनी रॉडने मारहाण केली. यात डोक्याला जखम झाली तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केल्याने सर्वांगास मुकामार लागल्याने मंगळवेढा येथील सरकारी रुग्णालयात उपचार घेऊन वडील मेकप्पा यांनी गुरुवार ३ एप्रिल रोजी रात्री १२.३५ वाजता शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### चिंचोळी एमआयडीसीत महिलेला मारहाण

**सोलापूर, दि. ४ एप्रिल -**

पत्नीला काहीतरी शिकवते या संशयावरून चिंचोळी एमआयडीसीत महिलेला मारहाण करण्यात आली. ही मारहाण गुरुवारी आठ वाजता झाली. पूजा विष्णु चौगुले (वय २८) असे मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे. गुरुवारी पूजा ही राहत्या घरी होती. त्यावेळी सूजर हरी पवार, मंगल हरी पवार व इतर एक यांनी पत्नीला कायपण शिकवते या संशयावरून मारहाण केली. यात पोटास मार लागला तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने सरकारी रुग्णालय मोहोळ येथे उपचार करून शुक्रवारी सकाळी ११ वाजता स्वत: उपचाराकरीता शासकीय रुग्णालयात दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### कुत्रा आडवा आल्याने दुचाकीवरील दोघे जखमी

**सोलापूर, दि. ४ एप्रिल -**

आसरा चौक येथून महावीर चौकाकडे जाताना संचार प्रेससमोरील रस्त्यावर कुत्राा आडवा आल्याने दुचाकी घसरल्याने दोघे जखमी झाले. हा अपघात शुक्रवारी मध्यरात्री एकवाजता घडला. समर्थ चंदन चिंचोरे (वय २१,रा. राजेश कुमार नगर, सोलापूर) व प्रथमेश शिवाजी माने (वय २०,रा. गेंट्याल चौक) अशी जखमींची नाव आहेत. समर्थच्या उजव्या हाताला, पायाला जखम झाली तर प्रथमेशच्या चेह-याला जखम झाली तसेच उजव्या हाताला आणि पायाला खरचटले. मित्र अथर्व सर्वगोड याने रात्री १.४५ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## श्रध्दा, भावनांना पैशात विकत घेता येत नाही

**● कॉरिडॉर विरोधात पंढरीत स्थानिक नागरिकांचा उद्रेक**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ एप्रिल-**

जादा पैशाच्या अमिषाने राज्य सरकार पंढरपूरकरांच्या श्रध्दा भावनांना विकत घेण्याचा घृणास्पद प्रयत्न करत आहे. भाविकांच्या सेवेत पिढ्यानपिढ्या राबलेले पंढरपूरकर हे कदापी होऊ देणार नाहीत, असा इशारा हिंदू महासभेचे नेते अभयसिंह इचगावकर कुलकर्णी यांनी दिला. येथील संत नामदेव मंदिरात झालेल्या कॉरिडॉर विरोधी बैठकीत संतप्त सूर बहुसंख्य नागरिकांनी लावला. नुकतेच मुख्यमंत्री फडणवीस पंढरीत येवून कॉरिडॉरबाबत विधान करून गेले. त्यामुळे स्थानिकांत व वारकरी भाविकांत प्रचंड असंतोष खदखदत आहे. हे या बैठकीत दिसून आले. यापुढे टप्याटप्यानी कॉरिडॉरविरोधी जनआंदोलन प्रखर केले जाईल, असेही ठरविण्यात आले.



भाविक व वारकऱ्यांच्या अत्यावश्यक प्राथमिक सोईसुविधांसाठी कॅरिडॉर उपयोगाचा नसून निष्कारण शासकीय पैशाची उधळपट्टी होणारा आहे. भ्रष्ट शासकीय उच्च पदस्थ अधिकारी मंत्री मंडळास फसवीत आहेत. शासनाचा पैसा निरुपयोगी प्रकल्पांवर वाया घालवीत आहेत, असे आरोप देखील या बैठकीत करण्यात आले. कॉरिडॉरमध्ये श्री विठ्ठल मंदिराएवढेच पवित्र असणारे श्री संत नामदेव जन्मस्थान, ताकपीठे विठोबा मंदिर, श्री संत नरहरी सोनार मठ तसेच ऐतिहासिक शिंदे व होळकर सरकार वाडे, श्री संत प्रल्हाद महाराज समाधी, मल्लीकार्जुन मंदिर, श्री संत मुक्ताई मठ, गोपाळकृष्ण मंदिर हे व यासारखे प्राचीन परपरा व ऐतिहासिक महत्व असणारे मठ, वाडे वास्तू बाधित होत आहेत. पिढ्या भाविक भक्त आणि संत जेथे उतरतात अशी स्थानिकांची घरेदारे, मठ, धर्मशाळा बाधित होत आहेत. प्रास्ताविक विवेक बेणारे यांनी केले. बैठकीमध्ये माऊली महाराज गुरव, राजूभाऊ नामदास महाराज, ज्ञानेश्वर देशपांडे, पांडुरंग देशपांडे, लाड पेढेवाले, माजी नगरसेवक ऋषिकेश उत्पात, शैलेश बडवे बाबाराव महाजन, दादासाहेब फत्तेपुरकर, वीरेंद्र उत्पात, विनायक हरिदास कोळी समाजाचे नेते गणेश अंकुशराव, बापूसाहेब उंडाळे, प्रशांत खंडागळे, विवेक बेणारे, उंडाळे वकील, महेश खिस्ते आदी मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

### यमाई तलावाच्या २५० एकर जागेवर कॉरिडॉर करा

शासनाने मंदिर भागात पाडापाडी न करता उपलब्ध शासकीय जमिनीवर कॉरिडॉर करावा. यमाई तलावाच्या २०० ते २५० एकर जागेवर करावा तसेच जिजामाता उद्यान व मंदिराजवळ चालत जायच्या असणाऱ्या जागांवर मध्यवर्ती भाविक सुविधा केंद्राचे नियोजन करावे, तसेच जवळच्या मोकळ्या जागांवर सुविधा कराव्यात. यमाई तलावात पुराणचित्रप्रमाणे श्रीविष्णूची शेष शाळेची प्रचंड मूर्ती स्थापित करून शेगाव मधील आनंद सागर सारखा प्रकल्प उभा करावा तसेच पुण्यातील भक्ती शक्ती शिल्पाप्रमाणे नामदेव पायरीजवळ नामदेव कीर्तन करी पुढे देव नाचे पांडुरंग असे अति भव्य पंचधातूचे सुंदर शिल्प करावे. पाडापाडी व बांधकाम म्हणजेच विकास या शासकीय अंधश्रद्धेतून शासनाने व अधिकाऱ्यांनी दूर व्हावे असेही आवाहन या बैठकीत करण्यात आले त्याचप्रमाणे अनेकांनी आंदोलनाबाबत सूचना कोर्ट कारवाई तसेच प्रसिद्ध वकील खासदार सुब्रमण्यम स्वामींची मदत मिळू शकते याही विषयांवर आपापली मते सादर केली.



## छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याचे काम अद्याप रखडलेले

### शिवभक्तांची थेट आयुक्तांकडे तक्रार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल -**

छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज पुतळ्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करून मजबुतीकरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण करून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसराचे सुशोभीकरणाचे काम तात्काळ पूर्ण करावे या संदर्भातले निवेदन श्री शिवजन्मोत्सव म ध्यवर्ती महामंडळाच्या वतीने महानगरपालिका आयुक्त सचिन ओंबासे यांना देण्यात आले.

महानगरपालिका आयुक्त सचिन ओंबासे यांनी विषय लक्षात घेऊन आणि जनभावना लक्षात घेऊन लागलीच सारिका अकुलवार नगर अभियंता सोलापूर यांना फोन लावून पुतळा सुशोभीकरण विषयाची माहिती घेतली. त्याचबरोबर दिनांक १५ मे पूर्वी कोणतीही सबब न देता काम पूर्ण करण्याच्या सूचना कॉन्ट्रॅक्टरला देण्याची तसेच नगर अभियंता यांनी सदर काम १५ मे पर्यंत पूर्ण करावे असे सांगत कामासाठी डेडलाईन दिली.शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने डॉ.ओम्बसे यांच्या तात्काळ कार्यवाहीबद्दल च्या भूमिकेचे स्वागत करण्यात आले. यावेळी ट्रस्टी उपाध्यक्ष श्रीकांत डांगे यांनी सदर काम १५ मे पर्यंत पूर्ण न झाल्यास शिवप्रेम िंच्या रोषाला महानगरपालिकेला सामोरे जावे लागेल असा इशारा दिला. यावेळी ट्रस्टी अध्यक्ष माजी उपमहापौर पद्माकर काळे, उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे, श्रीकांत घाडगे, श्रीकांत डांगे, ज्ञानेश्वर सपाटे, विश्वनाथ गायकवाड, सचिन स्वामी, पुकाळे, देविदास घुले आदी उपस्थित होते.

## मद्यपान करून गाडी चालविल्यास थेट गुन्हा दाखल

**● वाहतूक पोलिसांना कारवाईचे सर्व अधिकार**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल -**

यापुढे मद्यपान करून गाडी चालवणारा चालक सापडल्यास थेट गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. याबाबतचे आदेश सर्व वाहतूक पोलिसांना देण्यात आले आहेत. गुन्हा दाखल केल्यानंतर संबंधित चालकाचा परवाना रद्द करण्याची आणि वाहन जप्त करण्याची शिफारस पोलीस करणार आहेत. कोणत्याही व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल झाल्यास त्याला भविष्यात पासपोर्ट मिळवण्यास परदेशी प्रवास करण्यास अडचणी निर्माण होऊ शकतात.

राज्यात वाहनधारकांची संख्या झपाट्याने वाढत आहे. तसेच अपघाताचे प्रमाण हे वाढत आहे. दरम्यान नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनधारकांवर कडक कारवाई करण्यात येत आहे. आता मद्यपान करून वाहन चालवणाऱ्यांना मोठी शिक्षा होण्याची शक्यता आहे. मद्यपान करून गाडी चालवल्यास गुन्हा दाखल होतो, ज्यात दंड, तुरुंगवास आणि वाहन परवाना रद्द होण्याची शक्यता असते. त्याचबरोबर मद्यपान करून चालवल्यास मोटर वाहन कायद्यांतर्गत गुन्हा दाखल होऊ शकतो. या गुन्ह्यासाठी दहा हजार ते वीस हजार रुपयांपर्यंत दंड आकारला जाऊ शकतो. तसेच काही गंभीर प्रकरणांमध्ये मद्यपान करून वाहन चालवल्यास तुरुंगवास देखील होऊ शकतो.वारंवार मद्यपान करून वाहन चालवल्यास वाहन चालवण्याचा परवाना रद्द होऊ शकतो. तर काही प्रकरणांमध्ये मद्यपान करून वाहन चालवणाऱ्याचे वाहन जप्त देखील केले जाऊ शकते. मद्यपान करून वाहन चालवल्यास गंभीर अपघात होण्याची शक्यता असते, ज्यामुळे जीवितहानी किंवा गंभीर दुखापत होऊ शकते.यामध्ये मद्यपान करून वाहन चालवणाऱ्याला अटक होण्याची शक्यता असते. तेथेच किंवा पोलिस ठाण्यात ब्रेथ टेस्ट किंवा रक्ताची तपासणी केली जाते. या गुन्ह्यात दोषी आढळल्यास चालकाला न्यायालयात जावे लागते आणि शिक्षा सुनावण्यात येते.

## अखेर घंटागाडी कामगारांचा संप मिटला!

**● किमान वेतनासह पीएफ, ईएसआय देण्याच्या सूचना**
**● आज सकाळी घंटागाडी कामगार पूर्ववत कामावर होणार रुजू**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल -**

सोलापूर शहरातील कचरा संकलनाचे काम करणाऱ्या घंटागाडी कामगारांनी किमान वेतनासह पीएफ, ईएसआय देण्याच्या मागणीसाठी पुकारलेला संप अखेर दुसऱ्या दिवशी मिटला. म हापालिका आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांनी मक्तेदार आणि घंटागाडी काम गारांची बैठक घेऊन निर्णायक तोडगा काढला. यामुळे शनिवारपासून सकाळी घंटागाडी कामगार पूर्ववत कामावर रुजू होणार आहेत.

सोलापूर शहरात महापालिकेने घंटागाड्याद्वारे कचरा संकलन करण्याचा मक्ता नाशिकच्या वॉटर ग्रेस कंपनीला दिला आहे. या घंटागाडीवर चालक आणि मदतनीस असे कामगार कार्यरत आहेत. या कामगारांच्या माध्यमातून शहरातील कचरा संकलनाचे काम करण्यात येते. दरम्यान, संबंधित मक्तेदाराकडून या घंटागाडी कामगारांना किमान वेतनाप्रम ाणे पगार दिला जात नाही. प्रत्येक म हिन्याला कमी रक्कम दिली जाते. काही तक्रार अथवा नाराजी व्यक्त केल्यास कामावरून काढण्याची धमकी दिली जाते. भविष्य निर्वाह निधी (पीएफ) आणि ईएसआयची रक्कम कपात केली जाते मात्र ती संबंधित कार्यालयात जमा केली जात नाही. कमी वेतन दिल्याने कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे अडचणीचे ठरत आहे. त्यातच ईएसआयची सुविधा दिली नसल्याने आजार वगैरे उद्भवल्यास खाजगी दवाखान्यात खर्च करण्याचे ऐपत नाही. नाईलाजास्तव सिव्हिलमध्ये जावे लागते. घंटागाडी कर्मचाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण होत असल्याचा आरोप करत संतप्त कामगारांनी कालपासून संप सुरू केला होता.आज शुक्रवारी दुसऱ्या दिवशी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात घंटागाडी कामगारांनी ठिय्या आंदोलन केले. न्याय मिळाल्याशिवाय काम बंद आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका कामगारांनी घेतली होती. दरम्यान, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज सकाळी अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्याशी यासंदर्भात चर्चा केली. या कामगारांना किमान वेतन आणि पीएफ व ईएसआय कराराप्रमाणे मक्तेदाराने दिले पाहिजे. कराराप्रमाणे मक्तेदाराकडून पूर्तता न झाल्यास प्रसंगी मक्ता रद्द करण्याची कार्यवाही करावी,अशा स्पष्ट सूचना दिल्या.



महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आपल्या कार्यालयात संबंधित मक्तेदारांची बैठक घेतली. आवश्यक त्या स्पष्ट सूचना त्यांना दिल्या. त्यानंतर सायंकाळी पुन्हा अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या कार्यालयातही मक्तेदार आणि घंटागाडी कामगार यांची संयुक्त बैठक पार पडली. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतले. म क्तेदाराने नियमाप्रमाणे किमान वेतन व इतर सोयी सुविधा घंटागाडी कामगारांना दिल्या पाहिजेत. त्यांना ते मान्य नसेल तर पालिका प्रशासनाला मक्ता रद्द करण्याची कार्यवाही करावी लागेल, असे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी स्पष्ट केले. कामगारांनीही नियमाप्रमाणे रूटवर काम करावे. दोन्ही बाजूंनी सूचना मान्य करण्यात आल्या. अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी निर्णायक तोडगा काढला. त्यानंतर शनिवारी सकाळपासून घंटागाडी कामगार पूर्ववत कामावर रुजू होतील, असे सांगण्यात आले. सकारात्मक चर्चा आणि निर्णय झाल्यानंतर शनिवारी सकाळपासून कामावर जाणार असल्याचे घंटागाडी कामगारांनी सांगितले.

### १ एप्रिल पासून मक्तेदार देणार किमान वेतन : रवी पवार

संबंधित मक्तेदार आणि घंटागाडी कामगार यांची संयुक्त बैठक घेतली. या बैठकीत किमान वेतन प्रमाणे घंटागाडी कामगारांना वेतन देण्याच्या स्पष्ट सूचना मक्तेदारांना केल्या. दोन्ही बाजूंनी सूचना मान्य करण्यात आल्या. एक एप्रिल पासून किमान वेतन प्रमाणे वेतन देण्याचे मक्तेदारांनी मान्य केले आहे. सकारात्मक निर्णय झाला, अशी माहिती महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी दिली.

### मक्तेदारास ५० हजाराचा दंड !

शहरातील कचरा संकलनाचा मक्ता संबंधित मक्तेदारांना देण्यात आला आहे. नियमितपणे हे कचरा संकलनाचे काम करणे आवश्यक आहे. नियम ाप्रमाणे कचरा संकलन न झाल्यास दंडात्मक कारवाई केली जाते.एक दिवस कचरा संकलन पूर्णपणे बंद राहिल्यास मक्तेदारास साधारणतः २५ हजार रुपये दंड केला जाऊ शकतो. यामुळे घंटागाडी कामगारांनी केलेल्या काम बंद आंदोलनामुळे २ दिवस संकलन झाले नाही. यामुळे मक्तेदारास ५० हजार रुपये दंड आकारण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

## सोलापूर बाजार समितीची विक्रमी उलाढाल

**▶▶ गतवर्षाच्या तुलनेत ३ कोटी २० लाख रुपये उत्पन्न वाढले; अद्यापही आकडेमोड सुरूच**
**▶▶ एकट्या कांदा बाजारात १५७० कोटींची उलाढाल; कांदा विभागास मिळाले १५ कोटीचे उत्पन्न**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ एप्रिल-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीने यावर्षीही विक्रम नोंदवला आहे. यावर्षी कांद्याची आवक कमी राहिली. तरीदेखील सर्वाधिक दरामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत ३६० कोटी रुपयांनी उलाढाल वाढली आहे. यावर्षी कांदा बाजारात एकूण १५७० कोटी रुपयांची उलाढाल झाली. त्यातून बाजार समितीला १५.७० कोटी रूपयांचे विक्रमी उत्पन्न मिळाल्याचे बाजार समिती प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.



फळे, भाजीपाला आणि भुसार असे एकत्रीत मिळून सुमारे ३४ कोटी रूपयांचे एकूण उत्पन्न मिळाल्याची प्राथमिक माहिती असून मार्च अखेर नंतरही अद्याप आकडेमोड सुरूच असल्याचे सांगण्यात आले. मागील वर्षी (२०२४-२५) या वर्षात कांदा बाजारात कांद्याची मोठ्या प्रमाणात आवक झाली होती. पण, सरासरी दर २००० रुपयांपर्यंतच होते. त्यामुळे ११४० कोटी रुपयांची उलाढाल झाली होती. गतवर्षातील अधिकच्या पावसामुळे यावर्षी कांद्याचे उत्पादन घटले. परिणामी बाजार समितीत कांद्याची आवकही कमी झाली. परंतु जून २०२४ ते जानेवारी २०२५ या काळात कांद्याला सरासरी ४ ते ५ हजार रूपयांचे दर राहीले. त्यामुळे यावर्षी आवक कमी असूनही ३६० कोटी रुपयांनी वाढून उलाढाल १५७० कोटी रुपयांवर पोहोचल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, मागील वर्षात लाल मिरची विभागात ९० कोटी रुपयांची विक्रमी उलाढाल झाली होती. शिवाय त्यातून बाजार समितीला ९० लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले होते. यावर्षी जिल्ह्यासह कर्नाटक, तेलंगणा व आंध्रात लाल मिरचीचे उत्पादन कमी निघत आहे. शिवाय दरही कमी असल्याने केवळ ५३ कोटी रुपयांची उलाढाल होऊन ५३ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाल्याचे सांगण्यात आले.

> **उत्पन्नाबाबत समाधानकारक कामगिरी**
>
> फळे व भाजीपाला विभागात मागील वर्षी २९७ कोटींची उलाढाल झाली. त्यामध्ये २ कोटी ९७ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले होते. यावर्षी त्यात वाढ होऊन ३०० कोटींची एकूण उलाढाल होऊन ३ कोटी ६ लाख रुपयांची बाजार फी बाजार समितीला मिळाली. मागील वर्षीपेक्षा यावर्षी कांदा, फळे व भाजीपाला विभागात उत्पन्नाबाबत समाधानकारक कामगिरी राहिली आहे. अद्याप पूर्ण आकडेवारी समोर आलेली नाही. परंतु उत्पन्न जास्त मिळाले आहे.
>
> **- दत्तात्रय सुर्यवंशी, सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापूर.**

## ब्रेक लागून रिक्षा पलटी झाल्याने चालक जखमी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल -**

कौंतम चौक ते नई जिंदगी असे जाताना पोलीस आयुक्तालयाजवळील चौकात अचानक ब्रेक लागल्याने रिक्षा पलटी होऊन चालक जखमी झाला. हा अपघात शुक्रवारी सकाळी ९ वाजता घडला.

नजीर आदम शेख (वय ३८, रा. नई जिंदगी, सोलापूर) असे अपघातात जखमी झालेल्या रिक्षा चालकाचे नाव आहे. नजीर हा शुक्रवारी सकाळी ९ वाजता कौंतम चौकातून रिक्षा चालवित नई जिंदगीकडे निघाला होता. तो पोलीस आयुक्तालयाजवळील चौकात आल्यानंतर त्याने रिक्षाचे ब्रेक मारले. यामुळे रिक्षा पलटी होऊन पडली. यात त्याच्या कम रेला मार लागला तसेच सर्वांगास मुकामार लागला असल्याने शहानवाज पटेल याने उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.




**महिला प्रवासी जखमी...**

अपघातात रिक्षातून प्रवास करणारी कमल मोहन मैनावाले ही महिला प्रवासी जखमी झाली. ती कुमठा नाका येथे जाण्यासाठी बेडरपूल येथून रिक्षात बसली होती. तिला डोक्याच्या उजव्या बाजूला तसेच चेह-यासह सर्वांगास मुकामार लागला आहे. तिला विकास मैनावाले याने उपचारास रुग्णालयात दाखल केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०७७

**विठो माऊलिये हाचि वर देईं ।**
**संचरोनि राहीं हृदयामाजीं ।।**

शाश्वत आणि नाशवंतातील फरकाची पूर्णत: जाण असल्याने तुकाराम महाराजांनी भगवंताकडे कधीच नाशवंत बाबींची मागणी घातली नाही. धन-संपत्ती, ऋध्दी-सिध्दी हे सर्व नाशवंत असल्याने आपणाला यांपैकी कांहीही नको असे त्यांनी अनेकवेळा स्पष्ट केले आहे. पांडूरंगाच्या चरणांवर आपली दृष्टी स्थिर राहण्यासाठी संसारातील माया, मोह, द्वेष, मत्सर, अहंकार यांपैकी कांहीही आपल्या मनालाही स्पर्श करु नयेत. यापैकी एकाने जरी आपल्यात प्रवेश केला तर आपण पांडूरंग चरणी स्थिर राहू शकत नाही, याची जाण महाराजांना होती.



ऋध्दी-सिध्दी, ब्रम्हादिक पदे ही सर्व दु:खाची आगार असल्याने ती नकोत. मनाच्या अस्थिरतेला कारणीभूत असणाऱ्या मोह, धन, संपदा, ऋध्दी, सिध्दीपासून दूर राहाणे म्हणजे मनाला स्थिर करणे होय. मनाची स्थिरता हाच आनंदी जीवनाचा आधारस्तंभ होय. अस्थिर मनाचा माणूस नोटात लोळला तरी त्याला नोटातूनही दु:खाचे चटके बसतील. म्हणून हे पांडूरंगा सदा सर्व काळ माझे डोळे तुझ्या चरणी लागून राहतील असे कर. तुझे स्वरुप, तुझे नाम अत्यंत गोड आहे. त्याविषयी माझ्या मनांत सर्वकाळ प्रेम असू दे. तुझ्या चरणीच सर्व सुख असल्याने तुझे नाम, तुझे स्वरुप माझ्या हृदयात सातत्याने संचरुन राहू दे, असे स्पष्ट करतांना महाराज म्हणतात, सदा माझे डोळां जडो तुझी मूर्ती । रुखमाईच्या पती सोयरिया ।। विठो माऊलिये हाचि वर देई । संचरोनि राहीं हृदयामाजीं ।।

अध्यात्मिक क्षेत्रात डोक्यापेक्षा हृदयाला जास्त महत्व दिले जाते. श्री ज्ञानदेवांनी अठरा अध्यायांमध्ये अनेकवेळा आपल्या सद्गुरु निवृत्तीनाथांना हृदयात ठेवल्याचे म्हटले आहे. भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला हृदयाला लावून घेउन, आपल्या हृदयातील सर्व ज्ञानाचे भांडार अर्जुनाच्या हृदयात घातले. अर्थात, हृदय हेच मानवतेचा, प्रेमाचा, आपुलकीचा आधारस्तंभ आहे. हा आधारस्तंभ ज्याला मजबूत करता आला, त्याच्या जीवनाची इमारत सुख समृध्दीने पक्की झालीच म्हणून समजावे. संसारात अडकलेला जीव जेव्हा देव-देवतांना सातत्याने काही तरी मागत राहतो. माझ्या मुलां, मुलीचे लग्न होऊ दे, नोकरी लागू दे, एखादयाचे नुकसान होऊ दे, माझ्यावरील ईडा-पिडा टळू दे, वगैरे. मागणीची ही यादी इतकी लांबलचक असते की त्याची पूर्ती करणे भगवंतालाही अवघड होते. या सर्व मागण्या माया-मोहात अडकविणाऱ्या व हृदयाचे दार बंद करणाऱ्या असल्याने जगद्गुरुंनी अशा मागणींकडे पाठ फिरवली आहे. भगवंताने आपल्या हृदयात निरंतर राहावे एवढाच वर त्यांनी मागितला आहे. हृदयाने श्रीमंत असणारी माणसं खऱ्या अर्थाने मोठी व चांगली असतात. हृदयाची श्रीमंती पैशाने खरेदी करता येत नाही किंवा निर्माण करता येत नाही. हृदयाची श्रीमंती सकारात्मक मानसिकता आणि सदवर्तनातून निर्माण होते. त्यामुळे हृदयाने श्रीमंत असणाऱ्या संतांच्या ज्ञानामृत आनंदलहरी लेखांच्या सहवासाने आपणही श्रीमंत होऊ या.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. ५ एप्रिल २०२५ | शिवतेज दिन, दुर्गाष्टमी |
| विक्रम संवत् २०८१ | श्री भवानीदेवीची उत्पत्ती |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - चैत्र | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. अष्टमी (१९.२६) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पुनर्वसू (२९.३१) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - अतिगंड (२०.०२) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - विष्टि (०७.४३) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख - शांती मिळेल.

**वृषभ :** मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता.

**कर्क:** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.

**सिंह :** व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता. पत्नीसोबत मतभेद होईल.

**कन्या :** कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील.

**तुळ :** आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल.

**वृश्चिक :** अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**धनु :** योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल.

**मकर :** फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा. जीवनात आनंदी रहाल.

# सोलापूर जनता बँकेस ३२ कोटींचा निव्वळ नफा

## धडाकेबाज वसुलीमुळे एनपीएमध्ये लक्षणीय घट : अध्यक्ष सुनिल पेंडसे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

सोलापूर जनता सहकारी बँकेला आर्थिक वर्ष २०२४ - २५ मध्ये झालेली वसुली, कर्ज वाढ, एकूण व्यवसाय वाढ, गुंतवणुकीमुळे वाढीव व्याज यांचा एकत्रित परिणाम म्हणून

लेखापरिक्षणपूर्व (unaudited) ३२ कोटी १७ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष सुनिल पेंडसे यांनी शुक्रवारी परिषदेत दिली. बँकेने केलेल्या धडाकेबाज वसुलीमुळे बँकेच्या नेट एनपीएम ध्ये मागील वर्षाच्या तुलनेत मोठी घट होऊन ग्रॉस एनपीए ५.७७ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे, असेही श्री. पेंडसे म्हणाले.

सोलापूर जनता सहकारी बँकेच्या सोलापूरसह संपूर्ण महाराष्ट्र आणि कर्नाटकात एकूण ४१ शाखा असून १९०४ कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. बँकेने १०७४.१६ कोटी रुपयांची कर्जे वितरित केली असून एकूण व्यवसाय २९७८ कोटी रुपयांचा झाला आहे. बँकेचे भाग भांडवल ७२.१२ कोटी रुपये आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नियमांनुसार भांडवल पर्याप्तता (सीआरएआर) १२ टक्के असणे अपेक्षित आहे. मात्र सोलापूर जनता सहकारी बँकेने यातदेखील आघाडी घेतली असून बँकेची भांडवल पर्याप्तता १८.८० टक्के आहे. त्यामुळे बँकेच्या भांडवलाची स्थिती उत्तम असल्याचेही अध्यक्ष श्री. पेंडसे म्हणाले. बँकेच्या नेट एनपीएमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत मोठी घट होऊन नेट एनपीए ०.८३ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. ९०१.२२ कोटी रुपयांची गुंतवणूक सोलापूर जनता सहकारी बँकेने केलेली आहे. प्रोव्हिजन कव्हरेज रेशोही मागील वर्षाच्या तुलनेत वाढून तो ८६.३१ टक्के झाला आहे. यावेळी सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनिल पेंडसे, मुख्य कार्यकारी अधिकारी विनय दुनाखे, संचालक वरदराज बंग, प्राचार्य गजानन धरणे, तज्ञ संचालक सी.ए. गिरीष बोरगावकर, पुरूषोत्तम उडता, संचालिका चंद्रिका चौहान, विनोद कुचेरिया, उपसरव्यवस्थापक अंजली कुलकर्णी, मकरंद जोशी, देवदत्त पटवर्धन, सहाय्यक सरव्यवस्थापक तुळशीदास गज्जम, रामदास सिद्दुल, रमेश मामड्याल, मदन मोरे, उपस्थित होते.

ग्राहक आणि सभासदांच्या सुविधेसाठी नेट बँकिंग आणि मोबाईल बँकिंग सुरू करण्यासाठीचे आरबीआयचे निकष सोलापूर जनता सहकारी बँकेने पूर्ण केले आहेत. त्यामुळे सोलापूर जनता सहकारी बँकेला नेट बँकिंग आणि मोबाईल बँकिंगची परवानगी मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे, असे बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे यांनी सांगितले.

सोलापूर जनता सहकारी बँक लि.
SJSB
Multi-State Scheduled Co-op.Bank

### बँकेची दमदार कामगिरी

सोलापूर जनता सहकारी बँकेचे ७० हजार सभासद असून भाग भांडवल ७२.१२ कोटी रुपये आहे. एकूण ठेवी १९०४.१४ रुपये आहे. बँकेने मागील आर्थिक वर्षात १०७४.१६ कोटी रुपयांची कर्जे वितरित केली आहेत. बँकेने ९०१.२२ कोटी रुपयांची गुंतवणूक केली असून बँकेचा नेट एनपीए ०.८३ टक्के तर निव्वळ नफा ३२.१७ कोटी रुपये झाला आहे. आरबीआयचे कोणतेही निर्बंध सोलापूर जनता सहकारी बँकेवर नाहीत, असेही बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे यांनी सांगितले.

## जादा प्रशासकीय मान्यतेची चौकशी करण्याची मागणी

**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांच्या विकास योजनेमध्ये देण्यात आलेल्या तब्बल ६ कोटी रुपयांच्या जादा प्रशासकीय मान्यतेची व इतर बाबींची सखोल चौकशी करण्यात यावी अन्यथा १५ एप्रिल पासून बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशारा जिल्हा परिषदेचे कृषि पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीचे माजी सभापती अप्पाराव कोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यासंदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. दरम्यान, कार्यालयाला पत्र देऊन दीड ते दोन महिने झाले आहे. अद्याप कोणताही कारवाई होताना दिसून येत नाही. आठ दिवसात कार्यवाही नाही झाल्यास १५ एप्रिल २०२५ पासून बेमुदत उपोषण करण्यात येणार असल्याचे कोरे यांनी स्पष्ट केले. २०२४ - २५ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांकरिता ५३ कोटी रुपये आले होते. या निधीमधून प्रशासकीय मान्यता देताना शासन निर्णयामधील पात्रतेच्या सर्व निकषांना केराची टोपली दाखविण्यात आली आहे, असा आरोप कोरे यांनी केला आहे.

# बँकांनी मराठीतच व्यवहार करावेत

## मनसेच्यावतीने शासकीय बँकासमोर आंदोलन करून दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

बँकांनी मराठीतच व्यवहार करावेत या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने विविध शासकीय बँकांच्या कार्यालयासमोर आंदोलन करून निवेदन देण्यात आले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना सोलापूर शहर व जिल्ह्याच्या वतीने राज ठाकरे यांच्या आदेशावरून गुरुवारी सोलापूर शहरातील बँक ऑफ महाराष्ट्र, भारतीय स्टेट बँक, बँक ऑफ इंडिया, इंडियन बँक, सोलापूर जिल्हा अग्रणी बँक या सर्व बँकांच्या शाखाधिकाऱ्यांची भेट घेऊन आपल्या आस्थापनामध्ये बँकेमध्ये सर्व व्यवहार मराठीमध्ये व्हावेत ज्या त्या राज्यामध्ये तेथील भाषेमध्येच व्यवहार व्हावेत अशा प्रकारचा जीआर भारतीय रिझर्व बँकेने २०१४ मध्ये काढलेला आहे याची आठवण बँक शाखाधिकाऱ्यांना करून देण्यात आले व लवकरात लवकर आपल्या बँकेतील सर्वच कामकाज महाराष्ट्राची राज्यभाषा मराठी मध्ये करण्यात यावेत अशी मागणी करण्यात आली. तसेच यावेळी बँकेच्या दर्शनी भागामध्ये मराठी भाषेचा वापर अनिवार्य आहे. अशा आशयाचे फलक बँकेच्या शाखाधिकाऱ्यांच्या हस्ते लावण्यात आले.




### अन्यथा मनसे स्टाईलने सांगण्यात येईल - महिंद्रकर

शहरातील विविध शासकीय बँकांनी त्यांचे व्यवहार हे मराठीतूनच करावेत याबाबत मनसेकडून अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे. येत्या आठ दिवसामध्ये बँक प्रशासनांनी त्यांचे व्यवहार हे मराठीतून केले नाहीत तर बँक प्रशासनास मनसे स्टाईल खळ् खट्याक आंदोलन करून सांगण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर यांनी दिला आहे.

यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, लोकसभा अध्यक्ष प्रशांत इंगळे, शहराध्यक्ष जैनुद्दीन शेख राज्य उपाध्यक्ष अमर कुलकर्णी, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष अभिषेक रंपुरे, शिक्षक सेना राज्य उपाध्यक्ष संतोषकुमार घोडके, वाहतूक सेना जिल्हा संघटक प्रसाद कुमठेकर, वाहतूक सेना सोलापूर शहर संघटक जितू टेंभुर्णीकर, विद्यार्थी सेना शहराध्यक्ष बाळासाहेब सरवदे, शिक्षक सेना जिल्हाध्यक्ष प्रकाश कोळी, रोजगार व स्वयंरोजगार जिल्हा संघटक गोविंद बंदपट्टे, शहर उपाध्यक्ष पवन देसाई, वैभव रंपुरे, आकाश निंबाळकर, अक्षय आडम, नितीन पंजाबी, समर्थ माळगे, अभिषेक इरकल, हणमंतु घंटे, सुमित अंबुरे आदी मनसेसैनिक उपस्थित होते.

## किमया स्वप्नसृष्टी या गृह प्रकल्पाचे रविवारी भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

जुळे सोलापूर येथील टाकळीकर बंधूंच्या गंगा लॉन्स या जागेवर किमया ग्रुपचे किमया स्वप्नसृष्टी या नावाने १६८ सदनिकांचे १५ मजली गंगा व कमल अशा दोन इमारती बांधण्यात येणार असून, या प्रकल्पाचा भूमिपूजन समारंभ रविवार दि. ६ एप्रिल रोजी श्रीरामनवमीच्या शुभ मुहूर्तावर करण्यात येणार आहे, अशी माहिती समिर गांधी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जुळे सोलापूर येथील या जागेवर २ व ३ बेडरूम, हॉल व किचन चे १६८ सदनिकांचे १५ मजली गंगा व कमल अशा दोन भव्य इमारती तसेच भगवान श्रीरामाचे भव्य दिव्य मंदिर हे या गृह प्रकल्पाचे प्रमुख आकर्षण आहे. या सोबतच या गृह प्रकल्पामध्ये बगीचा, वॉकिंग / जॉगिंग ट्रॅक, कम्युनिटी हॉल, योगा- ऐरोबिक सेन्टर, सोलार पॅनल, इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग पॉईंट, कॉमन जिम, क्रिकेट टर्फ, लायब्ररी व इनडोअर गेम्स इ. या सर्व सुविधा देण्यात येणार आहेत. हा पूर्ण प्रकल्प उच्च मध्यमवर्गियांसाठी परवडण्याऱ्या दरात सादर करण्यात येणार आहे, यामुळे अनेकांचे स्वत:चे घराचे स्वप्न पूर्ण होणार आहे. तसेच जुळे सोलापूर मधील रुबी नगर येते किमया स्वप्नपुर्ती फेज २ हा १७६ फ्लॅट्सचा प्रकल्प सुरु आहेत. सोलापूरसह पुण्यात ही अनेक प्रकल्प सुरु असल्याचे प्रकल्पाचे प्रवर्तक समिर गांधी यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस किमया ग्रुपचे संचालिका डॉ. दिपाली गांधी, संचालक स्मित गांधी, गंगा लॉन्सचे श्रीकांत टाकळीकर व शशिकांत टाकळीकर आदी उपस्थित होते.

# रविवारी अस्तित्व लघुपट महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

अल्पावधीतच नावलौकिक मिळवलेल्या अस्तित्व मेकर्स फाउंडेशनच्या वतीने रविवारी, ६ एप्रिल रोजी अस्तित्व लघुपट महोत्सव-२०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. यंदा या लघुपट महोत्सवाचे सातवे वर्ष आहे, अशी माहिती संयोजक ॲड. बसवराज सलगर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महाराष्ट्रासह राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचलेल्या दर्जेदार लघुपट पाहण्याची संधी सोलापूरकरांना मिळणार आहे. रविवारी सायंकाळी ६ ते ९ या वेळेत डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात हा महोत्सव होणार आहे. या महोत्सवास प्रमुख पाहुणे म्हणून प्रिसिजन फाउंडेशनच्या सुहासिनी शहा या उपस्थित राहणार आहेत. दत्ता गायकवाड, डॉ. राजीव दबडे, डॉ. माधुरी दबडे, ॲड. मिलिंद थोबडे, सागर झाड, डॉ. बाहुबली दोशी, डॉ. वेलणकर, संजय सावंत आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.महोत्सवाचे यंदा ७ वे वर्ष आहे.

या महोत्सवात प्रदर्शित करण्यात येणाऱ्या सर्व लघुपटाना अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पारितोषिके



मिळालेले आहेत. महोत्सवात शाहिस्त्या, मलर, प्रपोजल, परदा, रंग, पंचवीस, बंद पाकीट, पाषाण असे एकूण आठ लघुपट दाखवण्यात येणार आहेत आणि या टीम मधील सर्वांचा सन्मान ही करण्यात येणार आहे. महोत्सवात सर्वांना मोफत प्रवेश असणार आहे. अधिक माहिती करिता सचिन जगताप - ९८२२०९२३०३, किरण लोंढे - ९०११२७९११२ यांच्याशी संपर्क करावा. सिनेरसिकांसह सोलापूरकरांनी या महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महोत्सव समितीचे अध्यक्ष सचिन जगताप व महोत्सव प्रमुख वैशाली बनसोडे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेत महोत्सवाचे सचिव किरण लोंढे, ओंकार साठे, सोमनाथ लोखंडे, सागर देवकुळे, निरंजन राऊळ धनराज मादगुंडी आदी उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.

**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती,
मो. ९९६००५३५२१

### अलक:- (९८) विवेकानंद शिला स्मारक

इसवी सन १९६३ ला राष्ट्रीय पुनर्जाग्रणाचे सिंह सदृश्य कर्णधार स्वामी विवेकानंदांच्या जन्मशतीचा पुण्य- प्रेरणादायी अवसर जवळ आला, आणि सर्व स्वयंसेवकांनी सहजस्फूर्त सुचवले, की कन्याकुमारी समुद्र तटावरील समुद्राच्या मध्ये स्थित शिलेवर स्वामीजींच्या महानतेच्या अनुरोध स्मारक बनवावे. या शिलेवर एका परिव्राजक युवा संन्यासाने तीन दिवस गहन ध्यान केले होते. आणि इथेच त्याला त्याच्या ऐतिहासिक ध्येयाचे ध्यान व भान आले. म्हणून या युवा संन्यासाने हिंदू धर्माच्या तत्त्वज्ञानाचा पाश्चात्त्य देशात उद् घोष करण्याचे ठरवले. तेव्हा या युवा संन्यासाने सर्वानुमते स्वामी विवेकानंद हे नाव धारण केले. स्वामीजी ३१ मे १८९३ ला बोटीत बसून शिकागोला गेलेत तिथल्या सर्व धर्म परिषदेतील भाषण ऐकून लोक त्यांचा आदर करू लागले. स्वामी विवेकानंदांच्या जन्मशताब्दी वर्षातच म्हणजेच सन १९६३ मध्ये माननीय एकनाथजी रानडे यांनी हिंदू तेजा जागरे या पुस्तकाच्या माध्यमातून स्वामींचे विचार संकलित केले होते आणि हे संकलन राष्ट्राला समर्पित केले होते श्री गुरुजींना पण हे पुस्तक खूप आवडले होते. म्हणून श्री. गुरुजींनी १९६३ मध्ये श्री एकनाथजी रानडे यांना रा.स्व. संघाच्या सहकार्यवाह पदावरून मुक्त करून विवेकानंद शिला स्मारक या महान कार्याची जबाबदारी सोपवली.

**क्रमश:**

## उसवण : मनाला भिडणारी भाषा

**उसवण हे पुस्तक नुकतेच वाचनात आले... तेव्हा जाणवले की सोलापूर हे सुध्दा विणकरांचे शहर, सोलापूरात विणकर बाग पण आहे. लक्ष्मी विष्णू मिल, जाम मिल, नरसिंग गिरजी मिल आणि त्यातील हजारो कामगार. सोलापूरला कामगार नगरी म्हणतात. यातील काही मिल बंद पडल्यावर हजारो कामगार देशोधडीला लागले. त्याचा धागा मला ये पुस्तकात मिळतो आहे. कधी काळी आंध्र प्रदेशमधून आलेला पद्मशाली समाज, ज्यांनी सोलापूर चादर जागतिक नकाशावर नेली. चादर उद्योगाची अवस्थाही फारशी चांगली नाही. परत काही कामगार तेलंगणकडे परतू लागले आहेत. याचा धागाही मला उसवण मध्ये मिळाला.**

------------------------------

तुम्ही जर हे पुस्तक वाचले तर तुम्हालाही हा धागा नक्की गवसेल. ही एका खेड्यातील टेलरची कथा आहे. त्याचे नाव विठू. त्याला गंगा नावाची बायको आहे. नंदा नावाची मुलगी आहे. सुभाष नावाचा मुलगा आहे. एकदा नंदाच्या शाळेत बाबांना पत्र लिहा असा उपक्रम असतो. तिचे पत्र पुस्तकात जरूर वाचा. त्या पत्रात एक सुन्दर कविता आहे.

लेक
लेक बापाचा नाजूक धागा.
या धाग्याची चिंता
अन्
या धाग्याच्या गुंता
बापाला आयुष्यभर सुटत नाही.
हा नाजूक धागा
बापाचं जगणं बळकट करत राहतो.

नंतर पुस्तकात काही ठिकाणी कबिराचे दोहे आहेत.

कबिरा खडा बाजार में.
मांगे सबकी खैर.
ना काहू से दोस्ती.
ना काहु से बैर.

असा स्वभाव विठूचा असतो. पण तरी त्याला काही लोक त्रास देतात.
सरपंच शिलाई लवकर देत नाही.
या गोष्टी पाहून बहिणाबाईंची कविता ओघात येते.

पाहिसनी रे लोकांचे
यवहार खोटे नाटे
तव्हा बोरी बाभयीच्या
आले अंगावर काटे

पुस्तकातील भाषा ग्रामीण आहे. मनाला भिडणारी आहे. एखादा मित्र गप्पा मरतोय, आपली व्यथा मांडतोय असे वाटते. जातीच्या कात्रीने माणुसकीचे धागे कापले आहेत. अशी धारदार वाक्ये पुस्तकात वाचायला मिळतात. एकदा नंदा भाकरी




करत असते. भाकरी करताना तिची गती कमी असते. तिला आई विचारते, तर ती सांगते की भाऊचा शर्ट धुताना सुई बोटात घुसली. हे वाचून डोळ्यात टचकन पाणी येते. माणसाचे आयुष्य हजारो धागे जोडण्यात जातंय. कुठला धागा पकडून ठिवावं, कुठला सोडावा कळत नाही. काही धागे तुटतेत. काही सुटतेत. काही धागे उरतेत. काही धागे काचतेत... काही धागे मिळत न्हाईत. काही धागे जुळत न्हाईत... काही धाग्याची चिंता वाटती.. काही धाग्याचा गुंता व्हतय.. आपुलकीचा एक दुर्मिळ धागा जगणं देखणं करतंय.. या आणि अशा ओळी वाचुन आपण अचंबित होतो. प्रेमाची फुले आपल्या अंगणात फुलली, तर सुई दोरा घेऊन त्याचा हार करत्यात. पण प्रेमाचं फुल दुसऱ्या जातीच्या अंगणात फुलले तर ते फुल चोळामोळा करुन टाकून देतात. हा संकुचितपणा त्यांनी सुसंकृतपणा नाव देऊन जपून ठेवलाय. कृष्ण, सुभद्रा, द्रोपदी आणि चिंधीची कथा नक्कीच वाचावी अशी आहे .. कथा आपल्याला माहीत असेल पण पुस्तकात ती वेगळ्या संदर्भाने आपण वाचतो.

एक धागा पतंगाला जुडला तर पतंग आभाळात उडतय. एक धागा भोवऱ्याला गुंडाळला तर एका पायावर जमिनीवर फिरीवतय. एक धागा वडाच्या झाडाला गुंडाळला तर नवरा बायकोच्या नात्याला बळकटी देतय. एक धागा मनगटावर बांधला तर बहिण भावाच्या नात्याला बळकटी देतय. एक धागा सुईत गेला तर ढिगारा चिंध्या एक करतय. एक धागा सोन्याच्या मण्यात शिरला तर सौभाग्याचं लेणं- मंगळसूत्र तयार होतय. धाग्याच्या गोष्टी सांगाव्या तितक्या कमीच हाईत. जवा काय बी उरलं न्हाई वाटतय तवा धागा उरल्याला असतय. एकदा तर चक्क शिलाई मशीन बोलते असा प्रसंग आहे. तो नक्की वाचावा असा आहे. या पुस्तकाला २०२४ चा युवा साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला आहे. हे पुस्तक वाचून वाचक आणि लेखक असा धागा आपण पक्का करू या.

**- श्रीधर खेडगीकर**
सोलापूर.

महत्त्वाचे...



## अन्नछत्र मंडळातर्फे डॉ. संजय पाटील यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. ४ एप्रिल-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र न्यास हे भक्तांसाठी मुलभूत सुविधा सुनिश्चित करीत अध्यात्मिक आणि सांस्कृतिक विकास जपत असल्याचे मनोगत राज्याच्या शिक्षण क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या डी.वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील कोल्हापूर यांनी व्यक्त केले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे सहपरिवार आले असता न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, अभियंता अमित थोरात, निखील पाटील, अतिश पवार, प्रवीण घाडगे, गोटू माने, सतीश महिंद्रकर, शहाजी यादव, स्वामिनाथ बाबर, बाळासाहेब घाडगे, नामा भोसले, संभाजीराव पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, एस के स्वामी, महांतेश स्वामी, सिद्धाराम कल्याणी, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, महादेव अनगले, अनिल गवळी, कल्याण देशमुख, धनंजय निंबाळकर, विशाल घाडगे, रोहित कदम, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण उपस्थित होते.



## एनएमएमएस व सारथी परीक्षेत विद्या विकास मंदिरचे यश

**करकंब, दि. ४ एप्रिल-**

केंद्र सरकारच्या मनुष्यबळ विकासखाते अंतर्गत व महाराष्ट्र परीक्षा परिषदेच्यावतीने इयत्ता आठवीमध्ये शिक्षण घेत असलेल्या आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते.त्यासाठी घेण्यात आलेल्या एनएमएमएस परीक्षेत विद्या विकास मंदिर उंबरे (पागे) (ता. पंढरपूर) येथील ५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. एनएमएमएस परीक्षेत पायल संभाजी भोसले या विद्यार्थिनीने तर दुर्गा कानगुडे, सृष्टी दत्तात्रेय कदम, प्रियांका हरिदास कदम, आकांक्षा रामकिसन भोसले या विद्यार्थांनी सारथी शिष्यवृत्ती परीक्षेत यश प्राप्त केले.या सर्व विद्यार्थ्यांना २ लाख १ हजार ६०० रुपयांची शिष्यवृत्ती प्राप्त होणार आहे.या विद्यार्थ्यांच्या यशासाठी एनएमएमएस परीक्षा विभागाचे मार्गदर्शक शिक्षक व्ही. एन. लांडगे, के. सी. पाटील, एस. आर. चव्हाण, शिक्षीका एस.डी. वायकर यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल त्यांचा संस्थेच्यावतीने सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्था अध्यक्ष राजाराम नरसाळे, चेअरमन ज्ञानदेव ढोबळे, सचिव बी.बी.पाटील, मुख्याध्यापक बी. जे. शिंदे यांनी अभिनंदन केले.



## श्रीशैल पाटील यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. ४ एप्रिल-**

अक्कलकोट तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाचे वतीने सोलापूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या विद्या सचिवपदी श्रीशैल पाटील यांची निवड झाल्याबद्दल जाहीर सत्कार प्रभाकर बंदीछोडे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लक्ष्मण चलगेरी होते. यावेळी तालुका माध्यमिक मुख्याध्यापक संघाचे नूतन कार्यकरणीचे लक्ष्मण चलगेरी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. याप्रसंगी अनिल देशमुख, शंकर व्हनमाने, अशोक कलशेट्टी, मलकापा भरमशेट्टी शिवराज किलजे आदी मुख्याध्यापकांनी चर्चा सत्रात भाग घेतला. प्रास्ताविक सचिव सिद्धय्या स्वामी यांनी केले. यावेळी व्यासपीठावर महादेव माने, सिद्रामप्पा हडपद, आशिफ मुजावर, व्यंकटेश बोकडे उपस्थित होते. सूत्रसंचालन सिधाय्या स्वामी यांनी केले. आभार शिवराज किलजे यांनी मानले.



## पालकमंत्री गोरेंच्या हस्ते वारकरी मंडळाच्या वास्तूचे भूमिपूजन

**पंढरपूर दि.४ एप्रिल-**

समस्त वारकरी मंडळ मौजे गोंदवले बुद्रुक (ता. माण) यांच्या वैष्णव नगर,पंढरपूर येथील नियोजित वास्तूचे भूमिपूजन राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, गटविकास अधिकारी सुशील संसारे उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री गोरे म्हणाले, पंढरपुरात येणाऱ्या गोंदवले येथील वारकरी भाविकांना समस्त वारकरी मंडळाची नियोजित वास्तूमुळे भजन, कीर्तन, धार्मिक सोहळे याबरोबरच राहण्यासाठी चांगली व्यवस्था उपलब्ध होणार असल्याचे मत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केले.

# साहित्य हा समाजाचा आरसा असतो

### शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार दत्तात्रय सावंत; ज्ञानवर्धिनी सार्व. वाचनालय आणि बळीराजा प्रतिष्ठानच्या साहित्य पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ एप्रिल-**

साहित्य हा समाजाचा आरसा असतो. साहित्यिक हे आपल्या साहित्यातून समाज जीवनातील एकेक पैलू उलगडत असतात. पुरस्कारांमुळे साहित्यिकांना खऱ्या अर्थाने साहित्य निर्मितीची आणखी एक प्रेरणा मिळते. साहित्याने जगण्याला ऊर्जा मिळते. साहित्याने मराठी भाषेचे जतन होते, असे प्रतिपादन पुणे विभाग शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार दत्तात्रय सावंत यांनी केले. निमित्त होते स्व. कुबेर (आबा) पवार यांच्या स्मृतिप्रित्यर्थ घेण्यात आलेल्या ज्ञानवर्धिनी सार्वजनिक वाचनालय खेडभाळवणी, आणि बळीराजा प्रतिष्ठान शेळवे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार वितरण सोहळ्याचे.



चंद्रभागेच्या तीरावरती खेडभाळवणी ता. पंढरपूर या ठिकाणी राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा थाटात पार पडला. यावेळी व्यासपीठावरती धाराशिव साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक- अमर पाटील, ज्येष्ठ साहित्यिक हरिश्चंद्र पाटील, कृष्णा गोदावरीचे संचालक- संदीप नळंदवार, आयुर्वेदाचार्य- बाबुशेठ पांडकर, युवा नेते सागर पाटील, विठ्ठलचे संचालक- धनंजय काळे, संचालक- समाधान गाजरे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी ज्ञानवर्धिनी साहित्य पुरस्काराने- अजित काटकर, सातारा (पंढरीची वारी, कथासंग्रह), बा. ना.धांडोरे, पंढरपूर ( माणसातला राजा, कथासंग्रह), डॉ. अशोक शिंदे (ते दिवस आठवून बघ, कवितासंग्रह), प्रा.गजानन गायकवाड, पंढरपूर (तुझा माझा रंग, कवितासंग्रह), संतोष रायबान, मंगळवेढा (ओल काळजाची, कवितासंग्रह), अशोक कुबडे, नांदेड (गोंडर, कादंबरी), दिनेश फडतरे, सातारा (आठव कल्लोळ, ललित संग्रह), भारत सातपुते, लातूर (जागरण, आत्म कथन), डॉ. विठ्ठल जाधव, बीड (अटर का पटर, बालसाहित्य), शिवाजी शिंदे, पंढरपूर (सत्यशोधक डॉ बाबा आढाव, संपादन) या लेखकांना गौरविण्यात आले. तर बळीराजा प्रतिष्ठानच्या रानशिवार साहित्य पुरस्काराने सुनील दबडे, आटपाडी, सांगली (बनगी आणि बिरमुटं, कथासंग्रह), विशाल मोहोड, चांदुर बाजार, अमरावती ( कीड, कादंबरी), इंद्रजीत पाटील, बार्शी, सोलापूर (कळ पोटी आली ओठी, कवितासंग्रह), ॲड. संतोष मळवीकर, चंदगड, कोल्हापूर (संत्या कुली, आत्मकथन), गणपत जाधव, अकलूज, सोलापूर, गणेश अटकळे, पंढरपूर, सोलापूर या लेखकांना गौरविण्यात आले. कार्यक्रमांमध्ये स्व. मच्छिंद्र पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ एन.एम.एम.एस परीक्षेमध्ये पात्र विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. दत्तात्रय बागल आणि जैनुद्दीन मुलाणी यांनाही समाज गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. प्रास्ताविक ज्ञानवर्धिनी वाचनालयाचे संस्थापक सचिव राजेश पवार यांनी केले. सूत्रसंचालन साहित्यिक अंकुश गाजरे यांनी केले, तर आभार बळीराजा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश गाजरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांख्यिकी अधिकारी हेमंत पवार, अरविंद पवार, बळीराजा प्रतिष्ठानचे संचालक अमोल चव्हाण, अजय शिंदे आदींनी परिश्रम घेतले.

## आजपासून घोळसगाव येथे शंभू महादेव यात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ४ एप्रिल-**



तालुक्यातील घोळसगाव येथील श्री शंभू महादेव यात्रेस दि.५ एप्रिलपासून प्रारंभ होत आहे.शनिवार दि.५ एप्रिल रोजी पहाटे पहाटे महादेवांची अभिषेक करण्यात येणार असून संध्याकाळी सहा वाजता महादेव मंदिर पासून संपूर्ण गावभर जल्लोषात पालखी निघणार आहे, तसेच दि. ६ एप्रिल रोजी दु. ४ वा.कुस्ती आयोजन करण्यात आले आहे. दि. ४ व ६ तारखेस संध्याकाळी ८ वाजता सुंदर असे सामाजिक कौटुंबिक नाटकाचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे सर्व कलाकार गावातीलच आहेत बाळू बेळगीद मने अर्थात स्वामिनीष्ठा सहोदररू असे नाटकाचे नाव आहे. जास्तीत जास्त लोकांनी नाटक पाहण्यास यावे असे आवाहन नाटक कंपनीचे मालक गावातील सामाजिक कार्यकर्ता असे ओळखले जाणारे बसवराज पालापुरे यांनी केले. घोळासगावचे कन्नड नाटक पाहण्यासाठी मराठवाड्यातील म्हणजे गावचे शेजारी असलेले धाराशिव जिल्ह्यातील व तसेच आमचे वागदरी, बोरगाव, बादोला, किरनळ्ळी, गोगाव, खैराट असे तालुक्यातील विविध गावातून नाट्यप्रेमी नाटक पाहण्यासाठी गर्दी करतात.

## बार्शी येथे भरदिवसा जबरी चोरी; तिघांविरुद्ध फिर्याद दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ४ एप्रिल-**

शहरातील संतोषी माता चौकातील १७ नंबर शाळेजवळ भरदिवसा एका मजुराला अडवून त्याच्याकडील रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेण्याची घटना घडली. या प्रकरणी तिघांविरुद्ध बार्शी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पांडुरंग सोमनाथ सोनवणे (वय ४०, रा. मांडेगाव, बार्शी) यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, ते विटभट्टीवर काम करतात. गुरुवारी (३ एप्रिल) सकाळी १०.१५ वाजताच्या सुमारास ते आपल्या दुचाकीवरुन ताडसौंदणे रोडवरील विटभट्टीकडे जात असताना संतोषी माता चौकात त्यांना करण खंडागळे याने 'पांडू' म्हणून आवाज दिला. त्यामुळे ते थांबले असता, करण खंडागळे (रा. झाडबुके मैदान, बार्शी), अशोक जाधव (रा. नागोबा मंदिर, टिळक चौक, बार्शी) आणि तुळया (पूर्ण नाव माहित नाही) या तिघांनी त्यांना घेरले. करण खंडागळे याने याचे खिसे तपासा असे सांगताच, अशोक जाधव व तुळया यांनी त्यांना पकडले आणि अशोक जाधव याने कानाखाली मारत शिवीगाळ करत त्यांच्या खिशातील पैसे काढण्यास सांगितले. प्रतिकार केल्यावर तिघांनी सोनवणे यांना घट्ट पकडले व जबरदस्तीने त्यांच्या पॅन्टच्या खिशातून ७१०० रुपये रोख काढून घेतले. त्यानंतर त्यांना जमिनीवर पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन तिघेजण मोटारसायकलवरुन फरार झाले. या घटनेनंतर सोनवणे यांनी बार्शी पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून, पोलिसांनी करण खंडागळे, अशोक जाधव आणि तुळया यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरु आहे.

# बोरी उमरगेत हनुमान यात्रा महोत्सव

### रामनवमी ते हनुमान जयंतीपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ४ एप्रिल-**

तालुक्यातील श्रीक्षेत्र बोरी उमरगे पुण्यनगरीत दक्षिणमुखी जय हनुमान यात्रा महोत्सव निमित्त जय भारत माता सेवा समिती नवी दिल्ली राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दिव्य सानिध्यात रविवार ६ एप्रिल श्री राम नवमी ते शनिवार दि. १२ एप्रिल श्री हनुमान जयंतीपर्यंत भाग्यवंती देवी म हापुराण कार्यक्रमसह देशभक्ती कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याची माहिती पुराण समिती अध्यक्ष मल्लिनाथ पाटील यांनी दिली आहे.




संस्थाच्या वतीने श्री रामनवमी ते श्री हनुमान जयंती पर्यंत भाग्यवंती देवी यांच्या जीवनचरित्रावर सात दिवस कलबुर्गी पुराणरत्न पुरस्कार प्राप्ती संगमेश शास्त्री माशाळ यांच्या अमृतवाणीने संगीतसेवा एन.जी. भोगुंडी गौडा शाबाद व तबलावादक शेखर अंकलगी गदग यांच्या साथसंगतीने श्री जय हनुमान मंदिर पटांगणात दररोज संध्याकाळी ७ ते रात्री १० पर्यंत प्रवचन होणार आहे. रविवारी दि. ६ एप्रिल रोजी सकाळी साडे नऊ वाजता पुराण व प्रवचनचे उद्घाटन सोलापूर सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ लिपिक कृष्णात बिराजदार व त्यांचे धर्मपत्नी सुरेखा यांच्या अमृत हस्ते करण्यात येणार आहे. दुपारी १२ वाजता श्री प्रभू रामचंद्र महापूजा प्रसिध्द अडत व्यापारी राहुल तेलूनगी व त्यांच्या धर्मपत्नी भाग्यश्री यांच्या हस्ते होणार असून सायंकाळी सहा वाजता श्री प्रभू रामचंद्र मूर्तीची मिरवणूक उद्घाटन ऋषिकेश लोणारी यांच्या हस्ते होणार आहे. शनिवार दि. १२ पहाटे पाच वाजता श्री ची महाअभिषेक व पूजा, सायंकाळी पाच वाजता सुहासिनींचा ओटी भरणे कार्यक्रम होणार असून यानंतर हभप संजीवकुमार पाटील महाराज तथा विस्तार अधिकारी पंचायत समिती अक्कलकोट यांचा प्रवचन होणार आहे.

या प्रवचन सोहळ्यात दररोज रात्री नऊ वाजता महाप्रसाद वाटप होणार असून श्रीचे दर्शन महाप्रसादचा आवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन माजी सरपंच पंडित पाटील यांनी केले आहे.

यावेळी खासदार प्रणिती शिंदे, आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. विजय देशमुख, माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे, सागर सिमेंट प्रमुख तथा एमके फाऊंडेशन अध्यक्ष महादेव कोगनुरे, युवा नेता रमेश पाटील, माजी सभापती मल्लिकार्जुन पाटील, स्वामी समर्थ महाराज अन्नछत्र मंडळ कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, श्री स्वामी समर्थ महाराज देवस्थान अध्यक्ष महेश इंगळे, बसलिंगप्पा उर्फ मुतु खेडगी, आनंद बुक्कनुरे, इंदुमती महादेव निंबाल, समाजसेविका मल्लम्मा पसारे आदींची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

## महात्मा बसवेश्वर युवक संघटनेच्या अध्यक्षपदी पलसे

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ४ एप्रिल-**



सांगोला शहरातील वीरशैव लिंगायत समाजाची महात्मा बसवेश्वर जयंती उत्सवच्या नियोजनासंदर्भात नुकतीच बैठक पार पडली. या बैठकीत नूतन अध्यक्षपदी संदेश पलसे, सचिवपदी प्रतीक कळसे, खजिनदारपदी संतोष गुळमीरे, कार्याध्यक्षपदी वैभव गवळी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच मिरवणूक प्रमुख म्हणून नयन लोखंडे, संजोग घोंगडे, प्रतिम तोडकरी, सुमित कोठावळे, अविनाश ढोले यांची निवडी करण्यात आली. यावेळी मागील वर्षाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या कालावधीतील जमा खर्च सादर केला. तसेच महाराष्ट्र वीरशैव सभेच्या पुणे विभागाच्या अध्यक्षपदी प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांची तर सांगोला नगरपरिषद कृती आराखडा सदस्यपदी आनंद घोंगडे यांची निवड झाल्याबद्दल अभिनंदनचा ठराव मंडण्यात आला तो सर्व वीरशैव बांधवांनी टाळ्यांच्या गजरात मंजूर केला.

## कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाचे एनएमएमएस परीक्षेत यश



**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. ४ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विदयालयाच्या विदयार्थीनी एनएमएमएस परीक्षेत दैदीप्यमान यश संपादन केले. यामध्ये पाच विदयार्थी शिष्यवृत्ती धारक ठरले.

प्रणव तेली, श्रेया बोडरे, लक्ष्मण करांडे, शरयु जेऊरकर, ईश्वरी जनवर तर सारथी परीक्षेत रोशन बाबर याने यश संपादन केले.

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान माळशिरस पंचायत समीतीच्या शिक्षण विस्तार अधिकारी सुषमा महामुनी मॅडम, केंद्र प्रमुख राजकुमार फासे, विदयालयाचे मुख्याध्यापक शिवाजी कापसे, पत्रकार दामोदर लोखंडे, संजय पाटील, एनएमएम एस विभाग प्रमुख पाटोळे, संबंधित विभागाचे सर्व मार्गदर्शक शिक्षक यांच्या उपस्थितीत सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करणयात आला.

यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी महामुनी, मुख्याध्यापक कापसे यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन झाडे यांनी केले तर आभार वाघमारे यांनी मानले.



## एक दिवस दाखल्याच्या उपक्रमास गारवाडकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. ४ एप्रिल-**

१०० दिवसांचा कृती आराखडा अंतर्गत प्रांताधिकारी विजया पांगारकर यांच्या संकल्पनेतून तहसीलदार सुरेश शेजूळ यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या एक दिवस दाखल्यांचा या उपक्रमास गारवाड व परिसरातील नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिल्याची माहिती मंडळ अधिकारी शरद खंडागळे यांनी दिली.

राज्य शासनाने १०० दिवसाचा कृती आरखडा राबविण्याच्या सूचना दिल्या होत्या त्यास अनुसरून प्रांताधिकारी विजया पांगारकर यांनी तालुक्यात एक दिवस दाखल्याचा उपक्रम राबविण्याची संकल्पना आखली व त्यानुसार तालुक्यातील खेडेगावात हा राबविण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार तहसीलदार सुरेश शेजूळ यांच्या मार्गदर्शनाखाली गारवाड. मगरवाडी या दुष्काळी गावामध्ये हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी तलाठी निलेश कुंभार, सचिन पाटील, रोहित गायकवाड, करिष्मा जाधव, अश्विनी नागटीळक, सरपंच साठे, चिराग मगर, दादासो लोंढे,नंदकुमार मगर, ग्रामविकास अधिकारी विजय देशमुख, उमेश मोहिते उपस्थित होते. जेष्ठ नागरिक प्रमाणपत्रासाठी जेष्ठ नागरिकांची गर्दी होती. यावेळी ८० वर्षाच्या गोपाबाई मगर यांनी जेष्ठ नागरिक प्रमाणपत्र साठी अर्ज दाखल करून सर्वांचे लक्ष वेधले

# विठ्ठलाला साकडे घालून खंडपीठ रथयात्रा कोल्हापूरकडे मार्गस्थ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ एप्रिल-**

उच्च न्यायालय खंडपीठ कोल्हापुर येथे व्हावे. या मागणीसाठी पंढरपूर ते कोल्हापूर या खंडपीठ रथयात्रेचा शुभारंभ शुक्रवारी पंढरपुरातून श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर नामदेव पायरी येथे विठ्ठलाला साकडे घालून करण्यात आला.पुढेहि रथयात्रा छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह महापुरुषांना अभिवादन करून कोल्हापूरकडे मार्गस्थ झाली.



या रथयात्रेमध्ये मोठ्या संख्येने वरिष्ठ विधीज्ञ, विधीज्ञ,पक्षकार बंधू, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी मोठ्या संख्येने सामील झाले होते. दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे नेते दीपक चंदनशिवे, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष मस्के यांनी रथयात्रेचे स्वागत करून पाठिंबा दर्शवला.

यावेळी पंढरपूर आधिवक्ता संघाचे संघाचे अध्यक्ष ॲड. राजेश चौगुले, उपाध्यक्ष ॲड. महेश कसबे, सचिव ॲड. अभयसिंह देशमुख, सांगोला अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड. मारुती ढाळे, मंगळवेढा अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड. राजू शेख, माळशिरस आधिवक्ता संघाच्या अध्यक्षा ॲड. सुहासिनी देव, खंडपीठ कृती समिती कोल्हापूर निमंत्रक ड. सर्जेराव खोत उपस्थित होते.

पश्चिम महाराष्ट्रातील अनेक गोरगरीब जनतेची मुंबई उच्च न्यायालयामध्ये न्याय प्रकरने प्रलंबित आहेत. सदरच्या प्रकरणांमध्ये हजर राहणे येथील गोरगरीब लोकांना गैरसोयीचे तसेच आर्थिक दृष्ट्या न परवरणारे असल्याने उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ कोल्हापूर येथे व्हावे. ही गेल्या ४० वर्षापासूनची ६ जिल्ह्याची मागणी आहे. खंडपीठासाठी अवश्यक निकष व सर्व पात्रता पूर्ण केले असूनही या बाबत अद्याप निर्णय झालेला नाही. खंडपीठाच्या न्याय आणि रास्त मागणीसाठी पंढरपूरसह कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या सहा जिल्हातील वकीलांसह विविध संस्था, संघटना, पत्रकार व लोकप्रतिनिधींच्या सामुहीक लढा सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून पंढरपूर अधिवक्ता संघ व कोल्हापूर खंडपीठ कृती समिती यांच्या संयुक्त विद्यमानाने कोल्हापूर येथे खंडपीठ व्हावे या मागणी शुक्रवारी पंढरपूरच्या विठ्ठलाला साकडे घालून खंडपीठ रथयात्रा कोल्हापूरकडे मार्गस्थ झाली आहे. ही रथयात्रा सांगोला, कवठेमहाकाळ, मिरज, सांगली, जयसिंगपूर मार्गे प्रवास करून कोल्हापूर येथील साडेतीन शक्तीपीठा पैकी एक असलेल्या अंबाबाई चरणी साकडे घालून लवकरात लवकर कोल्हापूर येथे खंडपीठ व्हावे, असा आशीर्वाद घेणार असल्याची माहिती वकील संघाच्या वतीने देण्यात आली आहे.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड,
परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## निंबोणी मरीआई चौक ते सलगर बु.रस्त्याच्या दुरुस्तीला १० कोटी मंजूर

### आ.समाधान आवताडे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.४ मार्च**

मंगळवेढा तालुक्यातील निंबोणी मरीआई चौक ते सलगर बुद्रूक हा ९ किमी चा रस्ता अत्यंत खराब झाला होता त्या रस्त्यावरून दळणवळण जास्त होते मात्र खराब रस्त्यामुळे वाहतुकीस अडथळा येत होता ही बाब लक्षात घेऊन आमदार समाधान आवताडे यांनी केंद्रीय मंत्री श्री नितीनजी गडकरी व राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे पत्राद्वारे या रस्त्याला दुरुस्तीसाठी निधीची मागणी केली होती, त्या पत्राला अनुसरून केंद्रीय मंत्री श्री नितीनजी गडकरी यांनी या रस्त्यासाठी दहा कोटी रुपये मंजूर केले असल्याची माहिती आमदार समाधान आवताडे यांनी दिली.

मंगळवेढा तालुक्याच्या दक्षिण भागाला जोडणारा हा प्रमुख रस्ता असून या रस्त्यावरून तालुक्याच्या दक्षिण भागातील सर्व गावातून दळणवळण होत आहे त्यामुळे हा रस्ता तात्काळ दुरुस्त होणे गरजेचे होते त्यामुळे आमदार समाधान आवताडे यांनी तात्काळ या रस्त्यासाठी निधी देण्याची मागणी केली होती त्या मागणीची दखल घेत मंगळवेढा खोमनाळ भाळवणी निंबोणी सलगर बुद्रूक प्रजिमा ७३ अंतर्गत २० ते २९ किमी मध्ये सुधारणा करणे मध्ये शासनाकडून दहा कोटी रुपये मंजूर झाला असून या कामाच्या निविदा काढून लवकरच काम सुरू करण्यात येईल असे आमदार समाधान आवताडे यांनी सांगितले.

## संक्षिप्त वृत्त...



### दुष्काळी भागाला दुष्काळमुक्त करण्याचे माझे स्वप्न : पालकमंत्री गोरे

**सांगोला, दि. ४ एप्रिल-**

माण खटाव, माळशिरस, जत, सांगोला सह आदी दुष्काळी भागाला दुष्काळमुक्त करण्याचे माझे स्वप्न असून ग्रामविकास खात्याच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरा मोहरा बदलून विकासासाठी प्रयत्नशील असल्याचे आश्वासन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले. सांगोला तालुका व शहर यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक, सांगोला येथे आयोजित नागरी सत्कार समारंभात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी आ. शहाजी पाटील, माजी खा. रणजीतसिंह नाईक-निंबाळकर, माजी आ.दीपकआबा साळुंखे पाटील, आ. डॉ. बाबासाहेब देशमुख, भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार, माजी अध्यक्ष श्रीकांत देशमुख, माजी नगराध्यक्ष मारुतीआबा बनकर, उद्योगपती बाळासाहेब एरंडे, राजश्री नागणे उपस्थित होते. पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे सांगोला शहरात फुलांचा वर्षाव करत, ढोलताशांच्या निनादात भव्य मिरवणूक काढून स्वागत करण्यात आले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



### भाविकांच्या सुविधेसाठी पाच आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना : प्रांताधिकारी

**पंढरपूर, दि. ४ एप्रिल-**

चैत्री यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. यात्रेत भाविकांच्या सोयी, सुविधा, स्वच्छता तसेच मुबलक पाणीपुरवठा याला प्राधान्य देण्यात आले आहे. पाच आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना केले असून हे कक्ष २४ तास कार्यरत राहणार असल्याची माहिती प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिली. चैत्री वारीत भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा तात्काळ मिळाव्यात आरोग्याच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी ६५ एकर, चंद्रभागा वाळवंट, नगरपालिका, पत्राशेड, विठ्ठल-रुक्मिणी मंदीर, तसेच मुख्य आपत्कालीन मदत व प्रतिसाद केंद्र तहसिल कार्यालय, पंढरपूर येथे कार्यान्वित करण्यात आले आहे. भाविकांना काही अडचणी आल्यास आपत्ती व्यवस्थापन कक्षात संपर्क साधावा, असे आवाहन प्रांताधिकारी इथापे यांनी केले आहे.



### बोलेरो जीप चोरास अमरावतीतून पकडले; पंढरपूर शहर पोलीसांची कामगिरी

**पंढरपूर, दि.४ एप्रिल-**

पंढरपूर शहरात महिंद्रा बोलेरो जीपची चोरी करणाऱ्या चोरास अमरावती जिल्हयातून पंढरपुर शहर पोलीसांनी गजाआड केले. शहरात श्री विठ्ठलाच्या दर्शनकारीता आलेल्या भाविकांची चार चाकी बोलेरो प्लस( एम.एच.११एके२१९८) ही चोरीस गेल्याची तक्रार पंढरपुर शहर पोलीस ठाण्यात मंगळवारी (ता.१) नोंदवण्यात आली. गोपनिय बातमीदारामार्फत तसेच काही तांत्रीक पध्दतीने तपास केला असता सदरचा गुन्हा हा आरोपी महंमद मुदस्सीर महंमद युनूस (वय २८ वर्षे, धंदा मजुरी रा. उत्तमचंद प्लॉट, तारफेल अकोला जि. आकोला) याने केला असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पंढरपूर शहर पोलिसांनी आरोपीचा शोध घेत त्यास ताब्यात घेतले. त्याच्याकडून वाहन ताब्यात घेत ते जप्त करुन पंढरपुर पोलीस ठाण्यात जमा केले. ही कामगीरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितमकुमार यावलकर, पंढरपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, पंढरपूर शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक आशिष कांबळे, पोसई राजेश गोसावी, सपोफौ शरद कदम, पोह सुरज हेंबाडे, पोह प्रसाद औटी, पोह सचिन हेंबाडे, पोह विठ्ठल विभुते, पोशि शहाजी मंडले, पोशि समाधान माने आदींनी पार पाडली.

### महिलेला धडक प्रकरणी कारचालकाविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

महिलेला धडक दिल्याप्रकरणी कारचालकाविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत छाया गोविंद गाजुल (वय ५५, रा. सिध्दी भवन, जुना विडी घरकुल, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शांतीलाल विश्राम पटेल (रा. भवानी पेठ, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३ एप्रिल रोजी सायंकाळी अक्कलकोट रोडवरून छाया गाजुल या रस्ता ओलांडत असताना शांतीलाल पटेल यांनी त्यांच्या ताब्यातील चारचाकी गाडी नं. एमएच १४ जेई ५४७७ ही निष्काळजीपणे चालवून गाजुल यांना धडक देऊन जखमी केले. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

# जिल्ह्यात ६ तालुक्यातून ११ टँकरची मागणी

## पाण्याचे दुर्भिक्ष; माळशिरस तालुक्यात चार टँकरने पाणीपुरवठा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

उन्हाचा पारा चढल्याने पाणी पातळी घटली आहे. त्यामुळे माळशिरस तालुक्यातील गारवाड, बचेरी, सुळेवाडी, मगरवाडी या चार गावांतील दहा हजार लोकांना टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. तर एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच आणखी ११ टँकरची मागणी वाढली आहे. शिवाय येत्या काही दिवसांत टँकरची संख्या आणखी वाढण्याची शक्यता जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने वर्तविली आहे.

**टँकरने पाणीपुरवठा सुरू**

| | |
|---|---|
| एकूण गावे | - ४ |
| वाड्यावस्त्या | - ३९ |
| बाधित लोकसंख्या | - ९,८९१ |
| बाधित जनावरे | - ९,६३५ |

माळशिरस तालुक्यातील चार गावे, ३९ वाड्या, वस्त्यांवरील नऊ हजार ८९१ लोकसंख्या आणि नऊ हजार ६३५ पशुधनास टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. या परिसरातील पाणी पातळी घटल्याने विहीर, बोर कोरडे पडले आहेत. त्यामुळे येत्या काही दिवसांत या गावांच्या आजूबाजूच्या गावांनाही टँकरने पाणीपुरवठा करावा लागणार आहे. त्या अनुषंगाने ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून पूर्वतयारी करण्यात येत आहे.

> माळशिरस तालुक्यातील चार गावे, ३९ वाड्या, वस्त्यांतील दहा हजार नागरिकांना टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. उन्हामुळे पाणी पातळी खालावत असल्याने एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवडयातच ११ टँकरची मागणी वाढली आहे. येत्या काही दिवसांत टँकरची मागणी आणखी वाढणार आहे.
> **- संजय धनशेट्टी,** कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा

दरम्यान, जिल्ह्यात सन २०१२-१३ मध्ये साडेसहाशे पेक्षा जास्त टँकर सुरू होते. मात्र, त्यानंतर जिल्ह्यात जलयुक्त शिवार, पाणी आडवा, पाणी जिरवा योजना, गाळमुक्त धरण, जलजीवन मिशन योजनाअंतर्गत बरीच कामे पूर्ण झाली आहेत. तसेच, गतवर्षी चांगला पाऊस पडल्याने यंदाच्या वर्षी कमी प्रमाणात पाणीटंचाई भासत आहे.

मात्र,उन्हाळ्यांच्या अखेर पाणीटंचाई भासेल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

**जिल्ह्यात ११ टँकर मागणी**

अक्कलकोट तालका २ - वसंत नाईक नगर व सुलेर जवळगे ,
दक्षिण सोलापूर १ - दोड्डी ,
उत्तर सोलापूर १ - रानमसले ,
करमाळा २- केम व वरकुटे ,
मंगळवेढा ३- येड्राव, लक्ष्मी दहिवडे व आंधळगाव ,
माळशिरस २ - शिंगोर्णी व कोथळे ,

## वागदरीत ग्रामदैवत परमेश्वराचा रथोत्सव उत्साहात

### कुस्ती स्पर्धेने झाली सांगता; दगडी चाकाचा रथ हजारो भाविकांनी ओढला

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ४ एप्रिल-**

हर हर महादेव, परमेश्वर महाराज की जय.. चा जयघोष करत हजारो भाविकांच्या उपस्थितीमध्ये वागदरीचे ग्रामदैवत श्री परमेशवर रथोत्सव उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

वागदरी पंचक्रोशीतील भाविकासह तुळजापूर, उमरगा, लातुर, आळंद (कर्नाटक), उस्मानाबाद आदि भागातून भाविक मोठया संख्येने उपस्थित होते. वागदरीत श्री परमेश्वर यात्रा गुढीपाडव्यापासून सतत पाच दिवस चालते. पाच दिवस लहान रथ उचई दररोज रात्री ९ वाजता गावातील प्रमुख मार्गावरून वाजत गाजत फिरविला जातो. त्यानंतर पाचव्या दिवशी ठेर ओढणे मोठा रथोत्सव झाला. यावेळी हजारो भाविकांनी दगडी चाकाचा भव्य रथ ओढला.

दरम्यान गुरुवारी पहाटे श्रीच्या मूर्तिस महाभिषेक करण्यात झाला. दुपारी २ वाजाता रथावर कळसारोहण करण्यात आले. प्रारंभी गावातील प्रमुख मार्गावरून कळसाची सवाद्य भव्य मिरवणुक काढण्यात आली.



बसवेश्वर मंदिरात जाऊन अभिषेक घालण्यात आला. उचई मंदिराजवळ आल्यानंतर संध्याकाळी ६.२१ वाजता पंचक्रोशितील हजारो भक्त गणाच्या उपस्थिती मध्ये रथ ओढण्यात आला. परमेश्वर महाराज की जय चा जयघोष करीत भक्तांनी रथावर गोड पदार्थांची उधळण केली.

या उत्सवाची सांगता जंगी कुस्त्याने झाली. कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्र कर्नाटकामधील नामवंत मल्लांनी सहभाग घेतला.

## महिला तलाठ्यासह महसूल सहायक लाचलुपतच्या विभागाच्या जाळ्यात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ४ एप्रिल-**

नागरिकांना सेवा देण्याऐवजी त्यांच्याकडून लाच घेणाऱ्या महसूल विभागातील दोन कर्मचाऱ्यांना अखेर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) सापळ्यात अडकवण्यात यश आले. शेतजमिनीच्या वाटपासाठी १७ हजार रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी तलाठी आणि महसूल सहाय्यकाविरुद्ध गंभीर स्वरुपाची कारवाई करण्यात आली आहे.

तलाठी ऐश्वर्या धनाजी शिरामे आणि महसूल सहाय्यक रविंद्र आगतराव भड यांनी एका तक्रारदाराकडून त्याच्या पत्नीच्या नावे असलेल्या शेतजमिनीच्या वाटप प्रस्तावाला मंजुरी मिळवून देण्यासाठी लाचेची मागणी केली. सुरुवातीला २० हजार रुपयांची बोली लावण्यात आली. मात्र पडताळणीदरम्यान ती रक्कम १७ हजार रुपयांवर आली. यातून हे स्पष्ट दाखवते की, शासकीय कार्यालयांतून कामे करुन घेण्यासाठी दर ठरवले जात आहेत. ३ एप्रिल रोजी सापळा कारवाई दरम्यान तलाठी शिरामे लाच घेताना रंगेहाथ पकडल्या गेल्या. महसूल सहाय्यक भड यांनीदेखील या लाच मागणीला संमती दर्शवून तक्रारदाराला वारंवार पाठपुरावा करण्यास भाग पाडले. हेही तपासात स्पष्ट झाले आहे. या धक्कादायक कारवाईने महसूल विभागातील भ्रष्टाचाराचा चेहरा पुन्हा एकदा उघड झाला आहे. सामान्य शेतकऱ्यांचे काम करुन देण्यासाठी लाच मागणारे अधिकारी नागरिकांचा विश्वास पारखा करत आहेत. अशा अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई होणे आवश्यक असून, महसूल खात्याच्या कामकाजावर कठोर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ही यशस्वी कारवाई सोलापूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे/खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपअधीक्षक गणेश कुंभार यांच्या देखरेखीखाली केली. पोलीस निरीक्षक उमाकांत महाडिक आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ही कारवाई अचूकपणे पार पाडली.

## अन्नछत्र मंडळातर्फे सदलापूरच्या बनसोडे बंधूंचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि.४ एप्रिल -**

सदलापूर (ता.अक्कलकोट) येथील विकास बनसोडे व धरती बनसोडे या एकाच घरातील भाऊ बहिणीने दिल्लीतील स्पर्धेत यश मिळवले आहे. त्यांची अमेरिका येथे होणाऱ्या अंतरराष्ट्रीय स्पर्धेत निवड झाली आहे. त्याबद्दल श्री. स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ न्यासातर्फे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या हस्ते बनसोडे बंधू-भगिनीचा सत्कार करण्यात आला.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले ग्रुपचे बनसोडे बंधू-भगिनी सदस्य आहेत. सध्या अक्कलकोट तालुका व शेजारच्या तुळजापूर, उमरगा व कर्नाटक राज्यातील सिमेलगतच्या तालुक्यात यात्रेनिमित्त आयोजित कुस्ती स्पर्धेत ही ते दोघे चमकताना दिसत आहेत. त्यामुळे त्यांचा गल्ली पासून दिल्लीपर्यंत डंका सुरू आहे. चांदीची गदा पटकविणारे एकाच घरातील या बहिण बंधूना मिळालेल्या यशाबद्दल सर्व स्तरातून स्वागत व कौतुक होत आहे.



> **भोसले पिता-पुत्र यांच्या मदतीमुळे तालुक्यातील कुस्तीगीरांना अच्छे दिन**
>
> तालुक्यातील ७७ कुस्तीगीरांना दरमहा श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाकडून कुस्तीगीरांच्या वजन गटा प्रमाणे खुराक दिला जात आहे. खुराकापासून अनेक कुस्तीगीरांना सराव सोडवा लागणार होता. मात्र श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या मुळेच पुनश्च जोमाने कुस्तीगीर सराव करीत असून, त्याचेच हे यश आहे.
> **- मल्लेशप्पा बनसोडे, (कुस्तीगीरांचे पालक) सदलापूर,**

पै. कु.धरती बनसोडे हिने तिसरे नॅशनल फायर ब्रिगेड स्पर्धा दिल्ली येथील कुस्ती स्पर्धेत ६५ किलो वजन गटात सुवर्ण पदक व गोळा, थाळी फेक स्पर्धेत सिल्वर मिडल मिळून अमेरिका येथे होणाऱ्या अंतरराष्ट्रीय स्पर्धेत निवड झालेली आहे. तुळजापूर तालुक्यातील अचलेर, होर्टी, आरळी, येथील स्पर्धेत पै.कु. विकास बनसोडे यांनी निकाली कुस्तीत विजय मिळविला आहे. या गावांच्या कुस्ती स्पर्धेत चांदीची गदा बनसोडे बंधूनी पटकविली आहे.

पै.बनसोडे बंधू-भगिनींच्या विजयाबद्दल श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले, उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, न्यासाचे विश्वस्त, वस्ताद पै. मौला शेख (बादोला), पै. महेश कुलकर्णी सर्व सदस्य, सेवेकरी, कर्मचारी यांच्यासह तालुक्यातून सर्वस्तरातून स्वागत व कौतुक होत आहे. या प्रसंगी निखील पाटील, ऋषी लोणारी, अभियंता अमित थोरात, किरण पाटील, निखील पाटील, अतिश पवार, गोटू माने, सतीश महिंद्रकर, शहाजी यादव, बाळासाहेब घाडगे, नामा भोसले, संभाजीराव पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, एस के स्वामी, महांतेश स्वामी, सिद्धाराम कल्याणी, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, महादेव अनगले, अनिल गवळी, कल्याण देशमुख, धनंजय निंबाळकर, विशाल घाडगे, रोहित कदम, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## स्व. ब्रम्हानंद मोरे प्रतिष्ठानतर्फे आज विविध सामाजिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ४ एप्रिल-**

लोकनेते स्व. ब्रह्मानंद मोरे यांच्या २६ व्या पुण्यतिथीनिमित्त अक्कलकोट तालुक्यातील कुरनूर येथे सामाजिक बांधिलकीतून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती लोकनेते स्व.ब्रह्मानंद मोरे समाजसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब मोरे यांनी दिली आहे. शनिवार दि. ५ एप्रिल रोजी सकाळी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. याचे उद्घाटन श्री प्रभूशांतलिंगेश्वर महाराज,हत्तीकणबस यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पंचायत समितीचे माजी सभापती विलास गव्हाणे हे असणार आहेत. त्याच दिवशी सायंकाळी बालकिर्तनकार प्रति इंदुरीकर महाराज तथा हभप माऊली काकडे महाराज यांचा कीर्तन सोहळा आयोजित करण्यात आला आहे.यासह प्रतिष्ठानकडून वयोवृद्ध शेतकरी सन्मान सोहळा व क्रीडा पुरस्कार वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. समाधान आवताडे असणार आहेत. तर आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, माजी नगराध्यक्ष बसलिंगप्पा खेडगी, राष्ट्रवादीचे दिलीप सिध्दे, मल्लिनाथ साखरे, प्रभाकर मजगे,आनंद तानवडे,मोतीराम राठोड,महेश हिंडोळे आदींची प्रमुख उपस्थिती असणार आहे. सर्व कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष विनोद मोरे यांनी केले आहे.

## चिमुकल्या ब्रह्मच्या उपचारासाठी झटतोय सारा गाव

### शिरभावी ग्रामस्थांसह 'आपुलकी' ने जमा केले अडीच लाख रूपये

**आणखी मदतीचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ४ एप्रिल-**


दि.२५ मार्च रोजी सकाळी सांगोला तालुक्यातील चिंचोली धायटी रस्त्यावर मोटरसायकलला पिकअपने जोराची धडक दिल्यामुळे झालेल्या अपघातात शिरभावी (ता. सांगोला) येथील धनंजय क्षीरसागर व त्यांच्या पत्नी जागीच ठार झाल्या. तर ब्रह्म हा त्यांचा तेरा वर्षीय मुलगा गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी सांगलीच्या



उषःकाल हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले. त्याच्या उपचारासाठी मदतीची गरज होती म्हणून शिरभावी ग्रामस्थ व सांगोल्यातील आपुलकी प्रतिष्ठान यांनी सोशल मीडियावरून आवाहन केले व या आवाहनाला समाजातील दानशूर व्यक्तींकडून चांगला प्रतिसाद मिळाला.

आपुलकी प्रतिष्ठान यांच्याकडे १ लाख २१ हजार १२१ रुपये जमा झाले. तर शिरभावी ग्रामस्थांकडे १ लाख २९ हजार ३०० रुपये जमा झाले. ही सर्व रक्कम मंगळवारी सायंकाळी शिरभावी येथे क्षीरसागर कुटुंबियांकडे सुपूर्द केली. यावेळी शिरभावी ग्रामस्थ व आपुलकी प्रतिष्ठानचे सदस्य उपस्थित होते. यातून ब्रह्मची प्रकृती सुधारावी हाच प्रयत्न आहे.

> भाऊ ब्रह्म धनंजय क्षीरसागर याची प्रकृती सुधारत असून त्याच्यावर उषःकाल हॉस्पिटल सांगली येथे उपचार सुरू आहेत. त्याच्या उपचारासाठी मोठा खर्च होणार आहे. समाजातील दानशूर व्यक्तींनी मो.नंबर ७०५७५२८६५० वर मदत करून सहकार्य करावे ही विनंती.
> **-प्रतीक्षा क्षीरसागर (बहीण)**



## बोरी उमरगेच्या उपसरपंचपदी लक्ष्मीबाई बिराजदार बिनविरोध

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ४ एप्रिल**

तालुक्यातील बोरी उमरगे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी लक्ष्मीबाई लक्ष्मण बिराजदार यांची बिनविरोध निवड झाली. मुदत संपल्यानंतर दत्तात्रय कल्याणी उमरजे यांनी राजीनामा दिला होता. यामुळे रिक्त झालेल्या या पदावर ही निवड करण्यात आली.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून संजय पाटील, सहाय्यक म्हणून ग्रामविकास अधिकारी व्ही. पी. शिंदे यांनी काम पाहिले. यावेळी सरपंच निर्मला बिराजदार, सदस्य दत्तात्रय उमरजे, बसवराज साखरे, नीलव्वाबाई तात्यासाहेब बिराजदार, लक्ष्मीबाई अशोक तेलुणगी, शांताबाई कल्लप्पा गुळोळ्ळी यांच्यासह दुधनी बाजार समितीचे उपसभापती सिद्धाराम बाके, नागेश बिराजदार, शिवराज बिराजदार, दत्तात्रय हत्तुंडे, विठ्ठल बिराजदार, गजानन बिराजदार, लक्ष्मीकांत कोळी, कृष्णप्पा पाटील उपस्थित होते.